

# ज्या प्रकारे तूम्ही दोष काढाल

Look beyond the veil of investigative judgment

एड्रियन एबेन्स

# ज्या प्रकारे तुम्ही दोष काढाल

## एड्रियन एबेन्स

www.fatheroflove.info

2020 Copyright © 2019, 2020, Adrian Ebens

The moral right of the author has been asserted. All rights reserved. No part of this publication may be reproduced for commercial profit, including transmitted in any form by any means, electronic, mechanical, photocopying, recording or otherwise, without the prior written permission of the publisher and copyright holders. Please note the author has highlighted sections of the verses with bold to emphasise a specific point gathered from those texts. Unless otherwise identified, Scripture quotations are taken from the New King James Version. Copyright © 1982 by Thomas Nelson, Inc. Used by permission. All rights reserved. All website links and quoted content are current as of November 2020. This book and all other Father of Love publications are available from our website fatheroflove.info to order additional copies please email adrian@life-matters.org ISBN: 978-0-6488114-3-5 This book was Proofread by Lorelle Ebens Special thanks to Danutasn Brown, Gary Hullquist, Ruben Olschewsky, Gavin Devlin and Glenn Coopman for their contribution to this book. Designed by Shane Winfield/Advent Design Cover Photo by iStockphoto Typeset 11/14.5 Myriad Pro Light Printed in Australia

May, 2025

हे पुस्तक भाऊ जोएल सालवी ह्यांनी मराठीत भाषांतरित केले आहे.

# अनुक्रमणिका

**अध्याय 1**

आपण सावध राहायला हवे! . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 04

**अध्याय 2**

न्यायाचा दिवस . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 09

**अध्याय 3**

न्याय आणि न्यायनिर्णय . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .14

**अध्याय 4**

दोषी ठरवणाऱ्या न्यायाचा उगम . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 19

**अध्याय 5**

समज, दृष्टिकोन आणि वास्तविकता . . . . . . . . . . . . . . . . . . . . 25

**अध्याय 6**

आपल्यासाठी जमिन शापित आहे . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 28

**अध्याय 7**

पहा, हा मनुष्य! . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 32

**अध्याय 8**

पित्याचा न्याय करणे . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 35

**अध्याय 9**

पित्याचे प्रकटीकरण . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 39

**अध्याय 10**

मीही तुला दोषी ठरवीत नाही . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .45

**अध्याय 11**

नियम आध्यात्मिक आहेत . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 50

**अध्याय 12**

हृदयाच्या पाटीवर कोरलेले . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .... 54

**अध्याय 13**

माझे विचार तुमचे विचार नाहीत . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 60

**अध्याय 14**

हे परमेश्वरा, तुमचे मार्ग पवित्रस्थानात आहेत . . . . . . . . . . . . . . . . . . . 64

**अध्याय 15**

पुस्तके उघडली गेली आणि न्यायसभा चालू झाली . . . . . . . . . . . . . . . . . 71

**अध्याय 16**

तू आपली पहिली प्रीती सोडली आहेस . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 83

**अध्याय 17**

चमकती नदी की अग्निमय ज्वाला?. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 91

**अध्याय 18**

दुष्टशक्तीचे भाष्य . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 97

**अध्याय 19**

पुनरागमनापूर्वीचा न्याय: योग्य संदर्भात . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 103

**अध्याय 20**

याकोबाच्या संकटाचा काळ . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 112

**अध्याय 21**

एका माणसाच्या अपराधामुळे न्यायदंड आला . . . . . . . . . . . . . . . . 120

**अध्याय 22**

ख्रिस्ताचे न्यायासन . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 127

**अध्याय 23**

पवित्रस्थानाची शुद्धता आणि प्रायश्चित्ताचा दिवस. . . . . . . . . . . . . 135

**अध्याय 24**

मध्यस्थाशिवाय . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 148

**अध्याय 25**

क्रोनोस आणि अनुग्रहकाळाचा शेवट . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 153

**अध्याय 26**

आध्यात्मिक मंदिराचे शुद्धीकरण आणि परिपूर्णता . . . . . . . . . . . . . . . . 164

## धडा 1

# आपण सावध राहायला हवे!

डिसेंबर २४ च्या रात्री संपूर्ण जगभरातील कोट्यवधी मुलांचा आनंद आणि उत्सुकता आपल्याला मोजता येणार नाही. झगमगत्या ख्रिसमस झाडे प्रत्येक कोपऱ्यावर शोभून दिसतात, आणि मोठ्या "वेलकम सांता" च्या पाट्या उत्तर ध्रुवावरून येणाऱ्या या गूढ व्यक्तिमत्त्वाचे स्वागत करतात, जो त्यांना गिफ्ट्स देणार आहे.

हीच निरागस मुले ज्या प्रकारे ख्रिसमसचा अनुभव घेतात, तोच अनुभव प्रेषित योहान याने प्रकटीकरण पुस्तकात घेतला. लहानपणी ख्रिसमसचा गोडवा मनाला आनंद देतो, पण जसजशी मोठी होतात, तसतसे सांताच्या गोष्टी केवळ एक कल्पना आहे हे समजल्यावर तीच भावना कडवट वाटू लागते.

नाताळची प्रथा मानवतेबद्दल बरेच काही प्रकट करते. पालक आपल्या मुलांना खोट्या गोष्टींवर विश्वास ठेवायला का लावतात? अशी फसवणूक का करतात, जरी त्यांना माहित असते की एक दिवस मुलांना खरी गोष्ट समजणारच आहे?

ऑस्ट्रेलियामध्ये ख्रिसमसचा अनुभव अधिक विचित्र असतो. डिसेंबरमध्ये तिथे उन्हाळा असतो, तरीही लोक हिवाळ्यासारखे चित्रण करतात—हिरवेगार झाडे, बर्फाळ वातावरण, आणि उष्णतेसाठी जाड कपडे घातलेला लालसर सांता. काही वेळा ख्रिसमसच्या दिवशी तापमान ३५ अंश सेल्सिअसपर्यंत जाते, तरीही सांता चाहत्याच्या आकांक्षा, भावना आणि त्या भेटवस्तू व गोड गोड पदार्थांच्या आशेमुळे ह्या परंपरा काही बदलत नाहीत.

ख्रिसमस हा केवळ सण नाही, तर तो मानवी स्वभाव आणि मानसशास्त्र दर्शवतो. उदाहरणार्थ, सांताच्या प्रसिद्ध गाण्यात एक विचित्र गोष्ट आहे:

***सांताक्लॉज इस कमिंग टू टाउन***

*तू सावध राहायला हवे!,*

*रडू नकोस,*

*हट्टीपणा करू नकोस,*

*कारण सांताक्लॉज शहरात येत आहे!*

*तो एक यादी बनवत आहे*

*तो ती दोनदा तपासत आहे*

*त्याला समजेल कि कोण मस्तीखोर आहे*

*सांताक्लॉज शहरात येत आहे*

*तुम्ही झोपलेले असताना तो तुम्हाला पाहतो*

*आणि तुम्ही जागे असलेले त्याला माहित पडते*

*तुम्ही वाईट आहात की चांगले हे त्याला माहिती आहे*

*म्हणून त्याच्यासमोर चांगले बना..*

ह्या भेटवस्तू देणाऱ्याच्या शेपटात एक डंख आहे. तो प्रत्यक्षात आपल्या प्रत्येक कृतीची यादी ठेवतो. त्याला सर्वव्यापकतेचे वरदान आहे, त्यामुळे तो आपल्याला झोपेत असताना आणि जागे असताना पाहू शकतो. तो त्याची यादी किमान दोनदा तपासतो, हे पाहण्यासाठी की आपण चांगले वागलो आहे की वाईट.

लहानपणापासूनच आपल्याला शिकवले जाते की आपल्यावर सतत लक्ष ठेवले जात आहे आणि आपल्या प्रत्येक कृतीची नोंद उत्तर ध्रुवावर घेतली जात आहे. संपूर्ण संदर्भ हा भीतीचा आहे, कारण ते म्हणतात तू सावध राहायला हवे! तुझ्यावर नजर ठेवली जात आहे आणि जर तू वाईट वागत असशील तर तुला चांगली भेट मिळणार नाही, अशी भीती निर्माण केली जाते.

काही कथांमध्येतर, वाईट वागल्यास चांगल्या भेटीऐवजी कोळसा किंवा त्याहूनही वाईट काहीतरी मिळते.

सांताच्या संकल्पनेतील अंतर्गत विरोधाभास बहुतांश लोकांच्या लक्षात येत नाही. हा आनंदी, हसरा म्हातारा, जो खेळणी आणि भेटवस्तू आणतो, प्रत्यक्षात एक जागतिक पातळीवरील गुप्तचर यंत्रणा चालवतो. तो भेटवस्तूंचा उपयोग आपल्या वर्तनात बदल घडवून आणण्यासाठी, आपल्याला एक चांगला नागरिक बनवण्यासाठी, आणि एका ठराविक चौकटीत ठेवण्यासाठी तो असे करतो!

ही संकल्पना ख्रिस्ती धर्मातही दिसते. लॉर्ड केम्स, १८व्या शतकातील एक विचारवंत, म्हणतो की ख्रिस्ती धर्म हा प्रेम, सहनशीलता आणि बंधुभाव शिकवतो, पण तरीही इतिहासात सर्वात जास्त छळ ख्रिस्ती धर्माच्या नावाने झाला आहे.

नक्कीच, केम्स हा विरोधाभास पाहणारा पहिला किंवा शेवटचा व्यक्ती नव्हता. असा प्रश्न उपस्थित होतो की, ज्या येशूच्या धर्माने प्रेम, करुणा आणि दयाळूपणाचे शिक्षण दिले, त्याच धर्माचे काही अनुयायी इतक्या नियंत्रक आणि सक्तीच्या वर्तनाचा अवलंब का करतात?

ख्रिस्ती इतिहासात खोलवर जाऊन पाहिल्यास, आपण ऑगस्टिनसारख्या महान व्यक्तिमत्त्वाला शोधू शकतो, ज्याने सक्तीच्या वापराच्या तत्त्वाचे समर्थन करण्यासाठी युक्तिवाद मांडले.

"जेव्हा ऑगस्टिन (जो ख्रिस्ती धर्मशास्त्राचा पहिला विचारवंत होता ज्याने छळाचे तात्त्विक समर्थन विकसित केले) ह्याला टीकाकारांनी आव्हान दिले की, येशूने सक्तीचा वापर केलेले एक जरी उदाहरण दाखवावे, तेव्हा त्याने पुढीलप्रमाणे व्याख्यान मांडले.

हे होते प्रसिद्ध वचन – प्रेषितांची कृत्ये 9:1-18 मधील, पौलाचे दमास्कसला प्रवासाचे. मंडळींचा छळ करण्याच्या उद्देशाने प्रवास करत असताना, पौल (तेव्हा शौल म्हणून ओळखला जात असे) जमिनीवर कोसळला कारण त्याने येशूचा आवाज ऐकला आणि एका तेजस्वी प्रकाशामुळे तो आंधळा झाला. ऑगस्टिनच्या मते, पौलाचे हे रूपांतर स्पष्टपणे सक्तीमुळे झाले होते, कारण ख्रिस्ताने "आपली शक्ती वापरून पौलाला खाली पाडले" आणि त्याचबरोबर "त्याला शारीरिक आंधळेपणाचा धक्का दिला" (ही अवस्था तीन दिवस टिकली).

त्यामुळे पौल "शारीरिक बळाच्या सक्तीखाली सुवार्तेकडे वळला," आणि याच माध्यमातून येशूने कधीही शारीरिक बळाचा वापर केला नाही, हा युक्तिवाद चुकीचा ठरतो."

ऑगस्टिनची ही व्याख्या लक्ष वेधून घेते, कारण येशूने स्वतः सांगितले आहे की, "दुष्टाचा प्रतिकार करू नका," म्हणजेच इतरांना जबरदस्तीने चांगले बनवण्याचे अधिकार आपल्याला दिलेले नाहीत. तरीसुद्धा, ऑगस्टिनने याच गोष्टीवर "न्याय्य युद्ध" (Just War) या संकल्पनेचा पाया रचला, ज्याचा उद्देश शांतता राखणे आणि दुष्टांचा नाश करणे होता.

शांतता, कायदा आणि सुव्यवस्था टिकवण्यासाठी, या तत्त्वांवर चालणाऱ्या राष्ट्रांनी नागरिकांवर देखरेख ठेवणे आणि सार्वजनिक हिताला बाधा आणणाऱ्यांना शिक्षा देणे आवश्यक ठरते. ऑगस्टिनने लिहिले, "ख्रिस्ताची मंडळी अधार्मिक लोकांवर न्यायीपणाचा छळ करते" (ऑगस्टिन, बोनिफेसला लिहिलेले पत्र)

ऑगस्टिनच्या या “न्याय्य छळ” संकल्पनेचे ऐतिहासिक परिणाम काय होते? मध्ययुगीन मंडळीने त्याच कल्पनांवर आधारित धर्मपरिवर्तन (Inquisitions), धर्मयुद्ध (Crusades), आणि लाखो तथाकथित विधर्म्यांचा संहार घडवला. त्यावेळी ख्रिस्ताच्या प्रेमाने नव्हे, तर शिक्षा आणि मृत्यूच्या भीतीने मंडळीला प्रेरित केले जात होते.

आजच्या काळात आपल्या सरकारी प्रणाली बदलल्या आहेत, पण आपले धार्मिक तत्त्वज्ञान आणि धोरणे किती बदलेली आहेत? ख्रिस्ती इतिहास पाहिल्यास, लोकांनी पवित्र शास्त्रामधील हाडेस (Hades) आणि शेओल (Sheol) या काही संकल्पनांचा आधार घेतला आणि त्यावरूनच आपल्या कल्पनेतून “नरक” नावाची एक अत्यंत भयानक आणि यातनामय जागा निर्माण केली–जिथे देवाच्या शत्रूंना (जे आपलेही शत्रू ठरतात) त्यांना कायमच्या यातना भोगायला लागतात.

आज काही बदल झाले आहेत काय? नाही, अजूनही आपण न्याय आणि मृत्यूच्या कल्पनांमध्ये गुंतलेले आहोत, जरी त्या कल्पनांचा संदर्भ बदलला असला तरी. याचे स्पष्ट उदाहरण म्हणजे आपली सुड घेण्याची भावना. कित्येक कादंबऱ्या आणि चित्रपटांमध्ये हा सूड घेण्याचा विचार वारंवार वापरला जातो, तोही अत्यंत हिंसक आणि रक्तरंजित पद्धतीने.

पवित्र शास्त्रात, प्रेषित पौल एक वेगळाच दृष्टिकोन मांडतो. ऑगस्टिनप्रमाणे बाह्य सक्ती नव्हे, तर अंतर्गत प्रेरणा माणसाला ख्रिस्ताकडे वळवते.

*“ख्रिस्ताची प्रीती आम्हाला गळ घालते कारण आम्हास खात्री आहे की, ज्याअर्थी एक आपल्या सर्वांसाठी मरण पावला तर आपण सर्वजण मेलो आहोत.” – 2 करिंथकर 5:14*

ख्रिस्ताच्या शिकवणीनुसार, देवाचे अमर्याद प्रेम माणसाला आतून बदलते आणि इतरांवरही प्रेम करायला शिकवते. मात्र, हे सहजसाध्य नाही. गलतीकरास मध्ये पौल स्पष्ट करतो की, जसे एक लेकरू मोठा होईपर्यंत शिक्षक आणि पालकांच्या नियमाच्या अधीन असतो, तसेच परिवर्तनाआधीच्या आत्म्याची स्थिती असते.

*“परंतु काळाची पूर्णता झाल्यावर परमेश्वराने आपल्या पुत्राला पाठविले; ते स्त्रीपासून जन्मलेले, नियमांच्या अधीन असे जन्मले होते. जे आपण नियमांच्या अधीन होतो, त्या आपल्याला खंडणी देऊन सोडवावे आणि पुत्र म्हणून दत्तक घ्यावे. कारण तुम्ही त्यांचे पुत्र आहात, म्हणूनच परमेश्वराने त्यांचा आत्मा आमच्या हृदयात पाठविला आहे, त्याद्वारेच आपण, “अब्बा, पिता अशी त्यांना हाक मारतो.” आता आपण दास नसून परमेश्वराची लेकरे झालो आहोत, जर लेकरे आहोत, तर परमेश्वराने आपल्याला त्यांचे वारसही केले आहे.” – गलतीकरास 4:4-7*

जोपर्यंत ख्रिस्ताचा आत्मा आपल्यात येत नाही आणि आपण खऱ्या अर्थाने देवाला “अब्बा पिता” असे हाक मारत नाही, तोपर्यंत माणूस गुलामासारखा बाह्य नियमांनी नियंत्रित वाटतो. आत्मिक परिवर्तन न झालेल्या व्यक्तीला स्वतःच्या सुरक्षेसाठी इतरांवर नियंत्रण ठेवण्याची गरज वाटते आणि परिणामी तो स्वतःही नियंत्रणाखाली जातो. त्यामुळे अशा लोकांनी निर्माण केलेली समाजव्यवस्था हळूहळू हुकूमशाहीकडे झुकते, जरी ते त्याविरुद्ध आवाज उठवत असले तरी.

हीच कारणे आहेत की, जे लोक “नवीन जागतिक हुकूमशाही व्यवस्थेच्या” विरोधात जोरदार भाष्य करतात, तेच प्रत्यक्षात अशी व्यवस्था घडवण्यास हातभार लावतात. त्यांच्या सातत्याने या विषयावर बोलण्यामुळे लोकांमध्ये असुरक्षितता आणि भीती वाढते आणि समाज अशा व्यवस्थेकडे अधिक सहजपणे वळतो.

आपण ज्या जगात राहतो, ते ख्रिस्ताच्या प्रेमाच्या प्रतिसादात मानवी समाजाने घेतलेल्या निर्णयांचे परिणाम आहे. दोन हजार वर्षांपूर्वी ख्रिस्ताने न्याय, प्रेम आणि जीवनाचे खरे स्वरूप दाखवले होते, जे आपले विचारसरणी पूर्णपणे बदलू शकले असते. पण चौथ्या शतकात, ख्रिस्ती धर्म एका सार्वत्रिक राजकीय मंडळीमध्ये रूपांतरित झाले आणि राज्यशासनाशी जोडले गेले.

त्यामुळे, कोणतेही सरकार असले तरी, विचार आणि श्रद्धा नियंत्रित करण्याची हाव या व्यवस्थेत कायम राहते, कारण सत्ता मिळवून सुरक्षित वाटण्याची तीव्र इच्छा माणसात आहे. आज तंत्रज्ञान, शिक्षण आणि सामाजिक अभियांत्रिकीच्या वाढत्या प्रभावामुळे आपण इतिहासातील सर्वाधिक देखरेखीच्या आणि नियंत्रणाच्या युगात जगत आहोत.

ऑगस्टिनपासून अक्विनासपर्यंत, आणि सांताक्लॉसच्या यादींपर्यंत, शिक्षा आणि भीतीद्वारे समाजावर नियंत्रण ठेवण्याची गरज आपल्यात खोलवर रुजली आहे.

या पुस्तकात आम्ही वेगळा दृष्टिकोन मांडणार आहोत. परंतु त्याआधी, आपण दैवी न्यायाच्या संकल्पनेचा इतिहास उलगडून पाहू. जर सक्तीने लोकांना ख्रिस्ती बनवणे देवाची इच्छा असल्याचे आपल्या मनात खोलवर रुजले असेल, तर त्याचा देवाच्या न्यायावरील आपल्या समजुतीवर आणि पवित्र शास्त्राच्या वचनावर काय परिणाम झाला असेल?

# धडा 2

# न्यायाचा दिवस

माझ्या आठवणीत एक खास प्रसंग आहे, जेव्हा मी अमेरिकेच्या वायव्येकडील ख्रिस्ती लोकांच्या एका गटाशी संवाद साधत होतो. मी त्यांना देवाच्या प्रेमाबद्दल आणि त्याच्या शाश्वत दयेबद्दल अशा प्रकारे सांगितले की, त्यांनी कधीही यापूर्वी त्या दृष्टीकोनातून विचार केला नव्हता. माझ्या सादरीकरणानंतर, एका तरुणीने मला विचारले, “जर तुम्ही शिक्षेची भीती काढून टाकली, तर पापी माणूस पश्चात्ताप का करेल? पापी हरवले आहेत हे समजून घेण्यासाठी शिक्षेची भीती आवश्यक नाही काय?”

मी तिचे बोलणे ऐकले आणि मला आतून खूप वाईट वाटले. ही एक सुशिक्षित आणि प्रामाणिक तरुणी होती, पण तिच्या विचारांमध्ये ऑगस्टीनच्या शिकवणींचा प्रभाव स्पष्टपणे जाणवत होता. आणि हेच विचार १५०० वर्षांहून अधिक काळ ख्रिश्चन धर्माने प्रस्थापित केले आहेत. २०व्या शतकातील महान प्रचारकांपैकी एक, बिली ग्राहम, याने हे विचार जितक्या स्पष्टपणे समजले, तितक्याच स्पष्टपणे ते मांडले.

बायबल सांगते की, देव हा न्यायाचा, क्रोधाचा आणि संतापाचा देव आहे. येशूने वारंवार न्यायाच्या दिवसाची जाणीव करून दिली: *“मी तुम्हाला सांगतो की न्यायाच्या दिवशी प्रत्येकाला त्याच्या प्रत्येक निरर्थक शब्दाबद्दल जाब द्यावा लागणार आहे.” –मत्तय १२:३६.*

*“मानवपुत्र त्यांचे देवदूत पाठवेल आणि पाप व दुष्टाई करणाऱ्या सर्वांना त्यांच्या राज्यातून बाहेर काढेल. त्यांना जळत्या भट्टीत टाकण्यात येईल जिथे रडणे आणि दातखाणे चालेल.” –मत्तय १३:४१-४२.*

*नवीन करारातील प्रेषितांनीही न्यायाच्या दिवशी येणाऱ्या शिक्षेची जाणीव करून दिली. प्रेषित पौल म्हणतो, “कारण त्यांनी असा एक दिवस ठरविला आहे, त्या दिवशी ते त्यांनी नियुक्त केलेल्या मनुष्याच्या द्वारे या जगाचा न्याय नीतीने करतील. त्यांना त्यांनी मरणातून जिवंत करून या गोष्टींबाबत प्रत्येकाला खात्री करून दिली आहे.” –प्रेषितांची कृत्ये १७:३१.*

*जसे माणसांना एकदाच मरणे व त्यानंतर न्यायाला तोंड देणे हे नेमून ठेवले आहे –इब्री ९:२७.*

*पेत्र म्हणतो, “पण एवढे लक्षात ठेवा की, त्यांना त्यांचा हिशोब त्या परमेश्वराला द्यावा लागेल जे जिवंतांचा आणि मेलेल्यांचा न्याय करण्यास सिद्ध आहेत.” –१ पेत्र ४:५.*

प्रेषित योहानाने हे दृश्य अशा प्रकारे रंगवले: *“तेव्हा पृथ्वीवरील राजे, राजपुत्र, सैन्याचे उच्चाधिकारी, श्रीमंत तसेच बलवान लोक, सर्व लहान थोर माणसे, गुलाम आणि स्वतंत्र लोक, सर्वजण डोंगराच्या गुहांमध्ये व खडकांमध्ये दडून बसले. ते डोंगरटेकड्यांना उद्देशून ओरडून विनवू लागले, “आम्हावर पडून जे राजासनावर बसले आहेत, त्यांच्या नजरेपासून आणि कोकऱ्याच्या क्रोधापासून आम्हाला लपवा! कारण त्यांच्या क्रोधाचा महान दिवस आला आहे, त्यात कोणाचा निभाव लागेल?” –प्रकटीकरण ६:१५-१७.*

पवित्रशास्त्रामध्ये बऱ्याच ठिकाणी न्यायाचा उल्लेख आहे, आणि त्या न्यायापासून कोणीही सुटणार नाही. जर पवित्रशास्त्रामधून न्यायाचे संदर्भ काढून टाकले, तर पवित्रशास्त्राचा फारसा भाग उरणार नाही.

देवाने आपले प्रेम, दया आणि क्षमा मानवजातीला दिली आहे. क्रूसावरून, देवाने संपूर्ण जगाला संदेश दिला, “मी तुजवर प्रेम करतो.” परंतु जर हे प्रेम जाणूनबुजून नाकारले गेले, तर न्यायाशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही.

बिली ग्राहम यांनी दिलेले पवित्रशास्त्रामधील संदर्भ वाचताना असे वाटते की, देवाचा क्रोध चुकीच्या वाटेवर गेलेल्या लोकांवर कोसळेल. आणि जसे उत्तर ध्रुवावरील ख्रिसमसच्या वृद्ध माणसासारखे, स्वर्गातील देव प्रत्येक माणसाच्या कृतींचा हिशोब ठेवतो. जो कोणी त्याच्या पुत्राचा स्वीकार करत नाही, त्याच्यावर तो बळाचा वापर करेल आणि त्याला न्यायाच्या शिक्षेला सामोरे जावे लागेल.

समाजात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी बळाची गरज लागते, असे वाटते. बिली ग्राहम देखील म्हणतात:

“जर अशा प्रकारचा देव असता की जो कोणालाही शिक्षा करत नाही, तर जग अराजकतेने भरून गेले असते. ते जग बेफिकीर, बेशिस्त आणि विनाशाकडे नेणारे ठरले असते. निश्चितता नसलेल्या अशा जगात राहणे अशक्य झाले असते. जीवनाला अर्थ मिळण्यासाठी, ते एका नियमावर आणि नियम देणाऱ्या संस्थेवर आधारित असले पाहिजे.”

जर कोणी नियमांचे पालन केले नाही, तर शिक्षा न देता समाज कसा योग्य पद्धतीने चालवता येईल? देवाने आदाम आणि हव्वेला इशारा दिला नव्हता का की, जर त्यांनी चांगल्या आणि वाईटाच्या ज्ञानाच्या झाडाचे फळ खाल्ले, तर ते मरतील? इस्राएल राष्ट्रातील अपराध्यांना कोणती शिक्षा द्यायची याचे स्पष्ट उल्लेख मोशेच्या पुस्तकांमध्ये आहेत. त्यामुळे दुष्कृत्यांना शिक्षा होणे हे तार्किक वाटते.

ख्रिस्ती धर्म काय सांगतो, जे नियमांचे पालन करत नाहीत त्यांना कोणती शिक्षा मिळेल? कॅथोलिक कॅटेकिझम सांगते:

“येशू वारंवार 'गेहेन्ना' किंवा 'न विझणाऱ्या अग्नी'चा उल्लेख करतो, जो त्यांच्या आयुष्याच्या शेवटपर्यंत विश्वास ठेवण्यास नकार देणाऱ्या लोकांसाठी राखीव आहे. जिथे आत्मा आणि शरीर दोन्ही गमावले जातात. येशू घोषित करतो की, 'तो आपल्या देवदूतांना पाठवेल, आणि ते सर्व दुष्कर्मी लोकांना गोळा करून अग्नीच्या भट्टीत टाकतील.' आणि तो निकाल जाहीर करेल, 'माझ्यापासून निघून जा, शापितांनो, अनंतकाळच्या अग्नीत!' मंडळींची शिकवण आहे की नरक खरोखर अस्तित्वात आहे आणि तो अनंतकाळपर्यंत राहील. मृत्यूनंतर, जे लोक मर्त्य पापांच्या स्थितीत असतात, त्यांचे आत्मे नरकात जातात आणि तेथे त्यांना 'अनंतकाळच्या अग्नी'ची शिक्षा भोगावी लागते. नरकातील सर्वांत मोठी शिक्षा म्हणजे देवापासून कायमचे वेगळे होणे, आणि हेच खरे दुःख आहे, कारण देवामध्येच खऱ्या जीवनाचा आनंद आणि शांती आहे, ज्यासाठी माणूस निर्माण केला गेला आहे आणि ज्यासाठी तो तळमळतो.”

नरकाच्या ज्वाळांमध्ये शाश्वत यातना म्हणजे लोकांना देवाच्या नियमांना शरण जाण्यास भाग पाडण्याचा अंतिम मार्ग. अशी शिक्षा आणि वेदनेची भीती निर्माण करण्यासाठी सतत देखरेख, तपासणी आणि न्याय आवश्यक ठरतो—कोण स्वर्गात देवासोबत राहण्यास पात्र आहे आणि कोणाला नरकात शिक्षा भोगावी लागेल.

"माकड पाहतो, माकड करतो"  हे वाक्य आपण ऐकले असेल.  आपल्याला जसा देव समजतो, तसेच आपण वागतो. जर आपली देवाची कल्पना अशी असेल की तो लोकांना कायमची शिक्षा देतो, तर आपणही तसेच वागू लागतो. इतिहास साक्ष आहे की, अशा विचारसरणीमुळे अनेक अत्याचार झाले आहेत—फ्रेंच क्रांती, स्टालिनचे हत्याकांड, माओची सांस्कृतिक क्रांती, पोल पॉटच्या हत्या आणि इतर अनेक घटनांमध्ये हेच पुन्हा पुन्हा दिसून आले आहे.

अशा सततच्या देखरेखीच्या वातावरणात वाढताना, मी गोष्टी लपवण्याची सवय लावून घेतली. आई-वडील, शिक्षक आणि इतर कोणाच्याही नजरांपासून वाचण्यासाठी मी नकळतच काही गोष्टी गुप्त ठेवायला लागलो. शिक्षेची भीती असल्यामुळे लोकांच्या नजरेतून सुटण्याचे मार्ग शोधणे माझे स्वभाव झाले.

आजही हीच भीती वेगळ्या स्वरूपात दिसते–डिजिटल युगात आपली खाजगी माहिती लीक होण्याची भीती. आपण ऑनलाईन कुठे जातो, काय बोलतो, यावर लक्ष ठेवले जाते. अनेकांना हे अनुभव आले आहे की, आपण ज्या गोष्टी खाजगीत बोलतो, त्या नंतर जाहिराती किंवा व्हिडिओंच्या स्वरूपात समोर येतात. समाज आपल्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवतो–कधी वस्तू विकण्यासाठी, कधी लोकांचे वर्तन ठरवण्यासाठी आणि कधी त्यांना शिक्षा देण्यासाठी.

या पार्श्वभूमीवर पावित्रशास्त्रामधील काही गोष्टीही याच दृष्टिकोनातून वाचल्या जाऊ शकतात. उदाहरणार्थ, दानीएल ७ मधील दृश्य पहा:

*"जसे मी पाहिले, "सिंहासने मांडली गेली आणि प्राचीन पुरुष आपल्या आसनावर बसला आहे. त्याची वस्त्रे हिमासारखी शुभ्र होती; त्याच्या मस्तकावरील केस लोकरीप्रमाणे पांढरे होते. त्याचे सिंहासन अग्निज्वालायुक्त होते, आणि त्याच्या सिंहासनाची चाके प्रज्वलित केलेल्या अग्नीप्रमाणे होती. अग्नीची नदी निघून वाहत होती जी त्याच्यामधून बाहेर येत होती. हजारोच्या हजार लोक त्याची सेवा करीत होते; कोट्यावधी लोक त्याच्यासमोर उभे होते. न्यायालयाचे कामकाज सुरू झाले आणि पुस्तके उघडली गेली. – दानीएल ७:९-१०*

हे दृश्य एक मोठे न्यायालय दाखवते, जिथे प्रत्येकाच्या कृतींची नोंद तपासली जाते आणि त्यांना त्यांचे बक्षीस किंवा शिक्षा ठरवली जाते.

काहींना वाटेल की, येशू आपल्याला आधार देईल. पण मग त्याचेच हे शब्द वाचा:

*"मी तुम्हाला सांगतो की न्यायाच्या दिवशी प्रत्येकाला त्याच्या प्रत्येक निरर्थक शब्दाबद्दल जाब द्यावा लागणार आहे. कारण तुमच्या शब्दांवरूनच तुम्ही निर्दोष ठराल, किंवा तुमच्या शब्दांवरूनच तुम्ही दोषी ठराल. " – मत्तय १२:३६-३७*

*“अरुंद दाराने प्रवेश करा, कारण नाशाकडे नेणारा दरवाजा रुंद व पसरट आहे. पुष्कळ लोक त्याच दरवाजातून प्रवेश करतात. तरी जीवनाकडे नेणारा दरवाजा लहान असून मार्गही अरुंद आहे आणि अगदी थोडक्यांना तो सापडतो.” – मत्तय ७:१३-१४*

याच विचारसरणीत, तरुण वयातील मार्टिन लूथर, जेव्हा त्याने पहिल्यांदा धार्मिक विधी पार पाडला, तेव्हा देवाच्या वैभवाच्या कल्पनेने भारावून गेला.

"मी स्वतःशी विचार केला, ‘एवढ्या महान देवासमोर मी कोण? पृथ्वीवरील राजपुत्रासमोरही लोक थरथर कापतात, मग मी देवासमोर कसा उभा राहू? देवदूत त्याला घेरून असतात. त्याच्या एका इशाऱ्यावर पृथ्वी हलते. मग मी, एक साधा पापी, देवाकडे काही मागण्याचे धाडस कसे करू शकतो?’"

ही भीती यातना देते. लूथरला असे वाटले की, देव कधीच संतुष्ट होणार नाही.

"मी जे काही विचारले, केले किंवा प्रार्थना केली, त्याने देव संतुष्ट होईल असे मला वाटत नव्हते. मी देवावर प्रेम करत नव्हतो, उलट मी त्या न्यायप्रिय देवाचा तिरस्कार करत होतो, जो पाप्यांना शिक्षा करतो."

हा संपूर्ण न्याय आणि शिक्षा करण्याचा दृष्टीकोन जर देवानेच निवडला असेल, तर मग देवानेच आपल्या पुत्राला बलिदान करण्याचा निर्णय का घेतला?

ख्रिस्ती धर्म म्हणतो की, देवाच्या न्यायाने पाप्यांना शिक्षा करणे आवश्यक आहे, आणि म्हणूनच देवाने आपल्या पुत्राला बलिदान दिले. जेणेकरून देवाचा क्रोध शांत होईल आणि आपली पापे माफ होतील.

पण सगळ्यात मोठा प्रश्न आहे—शेवटी, हा नियम कोणी ठरवला की न्यायासाठी मृत्यूच का आवश्यक आहे?

## धडा 3

# न्याय आणि न्यायनिर्णय

इतिहासाचा अभ्यास करणाऱ्यांसाठी, राजा हा देवाच्या इच्छेनुसार राज्य करतो (Divine Right of Kings) आणि लोकशाहीसह कायद्याच्या अधीन असलेले राज्य (Rule of Law) यामधील संघर्ष दोन वेगवेगळ्या प्रकारच्या सत्ताकेंद्रित व्यवस्थांचे प्रतिनिधित्व करतो. कदाचित हे योगायोग नसेल की जुलियस सीझर आणि ऑलिव्हर क्रॉमवेल यांच्या जीवनावर आधारित दोन वेगवेगळ्या चित्रपटांमध्ये एकाच अभिनेत्याने भूमिका साकारली—रिचर्ड हॅरिस.

ऑलिव्हर क्रॉमवेलने इंग्लंडच्या संसदेला नेतृत्व दिले आणि राजा चार्ल्स पहिला याला लोकांविरुद्ध केलेल्या देशद्रोहाच्या आरोपाखाली फाशी देण्यात आली. दुसरीकडे, जुलियस सीझरने रोमन प्रजासत्ताकाचा अंत करून रोमन साम्राज्याची मुहूर्तमेढ रोवली. त्याच्या सैनिकांची निष्ठा आणि लष्करी विजय हेच त्याच्या सत्तेचे प्रमुख आधार होते.

कोणतेही राज्य राजेशाही असो किंवा लोकशाही, एक गोष्ट मात्र समान राहते—कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी आणि सत्ता टिकवून ठेवण्यासाठी बलप्रयोग केला जातो.

- ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीनुसार, “समाजातील कायद्याचा अधिकार आणि प्रभाव, विशेषतः व्यक्ती आणि संस्थांच्या वर्तणुकीवर निर्बंध घालण्यासाठी  असतात. याचा अर्थ असा की समाजातील सर्व सदस्य (सरकारी अधिकारी देखील) सार्वजनिकरित्या जाहीर केलेल्या कायद्याच्या नियमांचे आणि प्रक्रिया पद्धतींचे पालन करण्यास अनुकूल  असतात.

कायदा**:** अमेरिकेतील ‘लायब्ररी ऑफ काँग्रेस’च्या थॉमस जेफरसन इमारतीत "कायदा" नावाचे एक मोठे भित्तीचित्र आहे. या चित्रात एक स्त्री (कायद्याचे प्रतिक) दाखवली आहे, जिने एका हातात *ताडपत्ता* धरलेला आहे—जो योग्य वर्तन करणाऱ्यांसाठी बक्षीसाचे प्रतिक आहे, आणि दुसऱ्या हातात *तलवार* आहे—जी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना शिक्षा करण्याचे प्रतीक आहे.

याच चित्रात तिच्या भोवती सहा वेगवेगळे व्यक्तिरेखात्मक प्रतिक आहेत. उजव्या बाजूला फसवणूक (Fraud), संघर्ष (Discord) आणि हिंसा (Violence) दाखवली आहे—जी कायद्याच्या अनुपस्थितीत समाजात होणाऱ्या अत्याचाराचे प्रतीक आहे. तर डाव्या बाजूला कष्टकरी वृत्ती (Industry), शांतता




(Peace) आणि सत्य (Truth) दाखवले आहे—जेव्हा कायद्याचे योग्य पालन होते, तेव्हा समाजात स्थिरता आणि सुव्यवस्था राहते, हे यातून सुचवले आहे.

मध्ययुगीन युगात राजाला देवाच्या प्रतिनिधीप्रमाणे मानले जात असे. त्यामुळे, राजा हा *दैवी अधिकाराने राज्य करणारा* (Divine Right to Rule) असल्याचे लोक मानत.

फ्रान्समधील प्रभावशाली बिशप जॅक- बेनिन बॉसुए (1627–1704) हा या संकल्पनेचा प्रमुख विचारवंत होता. त्याच्या मते, राजा हा पवित्र व्यक्ती आहे, त्याचा अधिकार परमेश्वराने दिलेला आहे, आणि तो संपूर्णपणे सर्वोच्च आहे. तसेच, तो पारंपरिक नियम आणि प्रथेच्या आधारावर राज्य करतो.

याच मानसिकतेच्या आधारावर मध्ययुगीन काळातील पवित्रशास्त्राचे भाषांतरकर्ते न्याय (Justice) आणि कायद्याच्या संकल्पनेची व्याख्या करत होते.

" निती आणि न्याय तुझ्या राजासनाचा पाया आहेत. कराराचा विश्वास आणि सत्य तुझ्यासमोर आहेत." —स्तोत्रसंहिता ८९:१४

"ढग आणि काळोख त्याच्याभोवती आहेत. निती व न्याय त्याच्या सिंहासनाचा पाया आहेत. अग्नी त्याच्यापुढे चालतो, आणि प्रत्येक बाजूने त्याच्या शत्रूंना नष्ट करून टाकतो. त्याच्या विजांनी जग प्रकाशित केले; पृथ्वी हे पाहून थरथर कापली. परमेश्वरासमोर, सर्व पृथ्वीच्या प्रभूसमोर पर्वत मेणासारखे वितळले." —स्तोत्रसंहिता ९७:२-५

असं दिसतं की देवाच्या महिमेचा पाया सामर्थ्यावर आहे.

"आकाशाकडे बाहू उभारुन मी हे वचन देत आहे. मी सनातन आहे हे सत्य असेल तर या गोष्टी खऱ्या होतील. माझी लखलखाती तलवार परजून मी शत्रूंना शासन करीन. ते याच शिक्षेला पात्र आहेत. माझे शत्रू ठार होतील. त्यांचा पाडाव होईल ते कैद होतील. माझ्या बाणांची टोके त्यांच्या रक्ताने माखतील आणि माझे तलवारीचे पाते शत्रू सैन्याचा शिरच्छेद करील." —व्यवस्थाविवरण ३२:४०-४२

बहुतेक लोक असं मानतात की देवाची सार्वभौम सत्ता, आणि लोकांवर राज्य करणाऱ्या प्रत्येक नेत्याचा न्याय, बळाच्या सामर्थ्यावर अवलंबून असतो. न्याय म्हणजे चांगल्या आणि वाईट गोष्टींची पारख करून चांगल्यांना बक्षीस आणि वाईटांना शिक्षा देणं.

म्हणूनच, मृत्यूच्या शिक्षेचा धाकच जीवन टिकवतो, असंही म्हणता येईल. ख्रिस्ती विचारधारेतही याचा संदर्भ सापडतो:

"देवाचा न्याय हा त्याच्या शुद्ध आणि नीतिमान स्वभावावर आधारित आहे आणि अनंतकाळचे जीवन मिळवण्यासाठी आवश्यक असलेली अट कधीही बदललेली नाही. जसं एखादा न्यायाधीश गाडी चालवताना स्पीड लिमिट मोडणाऱ्यासाठी नियम बदलत नाही, तसं देवही आपल्या न्यायाच्या नियमात बदल करत नाही. आदामच्या पापामुळे, देवाच्या आज्ञेचा भंग केल्यामुळे, मृत्यू हा दंड निश्चित झाला. कोणतीही तडजोड न करता, पापांची क्षमा आणि अनंत जीवन मिळवणं अशक्य आहे, जोपर्यंत देवाच्या न्यायाची पूर्ण पूर्तता होत नाही. जर देवाने एखाद्या व्यक्तीला वाचवण्यासाठी आपल्या न्यायात तडजोड केली असती, तर तो देव राहिला नसता."

ख्रिस्ती शिकवणीतील मध्यवर्ती कल्पना अशी आहे की देवाच्या न्यायाच्या उल्लंघनाबद्दल मृत्यूशिक्षा मिळणं हाच खरा न्याय आहे. ही कल्पना अशा विश्वासावर आधारित आहे की देवाच्या सिंहासनाचा पाया मृत्यूच्या धोक्यावर आहे. त्याचा न्याय हे नियम तोडणाऱ्यांवर शिक्षेचा निर्णय देण्यात आहे.

पण, स्तोत्रसंहिता ८९ मध्ये असं म्हटलं आहे की दया देवाच्या पुढे असते. जर नियम तोडणाऱ्यासाठी मृत्यू हीच शिक्षा असेल, तर मग या न्यायाच्या संकल्पनेत दयेचं स्थान काय? आपण "दयाळूपणा" (Mercy) या शब्दाचा मूळ अर्थ पाहूया.

"Mercy" (मध्य इंग्रजी *merci*, लॅटिन *merx* म्हणजे "मूल्य, मोबदला") म्हणजे दयाळूपणा, क्षमा आणि सद्भावना.

दयेला नेहमीच काहीतरी मोबदला द्यावा लागतो. म्हणूनच, जर न्यायाच्या कर्जाची किंमत भरली गेली असेल, तर दया देता येते. न्याय टिकवण्यासाठी त्याची पूर्तता होणं आवश्यक आहे. त्यामुळे, जर योग्य मोबदला दिला गेला असेल, तर  न्यायीपण  राहते आणि दयाही दिली जाऊ शकते. इथूनच ख्रिस्ती तारण सिद्धांत 'दंडात्मक प्रतिस्थापन' (Penal Substitution) उदयास आला.

दंडात्मक प्रतिस्थापन म्हणजे तारणाचा असा सिद्धांत, जो सांगतो की ख्रिस्ताने स्वतःच्या बलिदानाने पाप्यांच्या जागी शिक्षा भोगली, त्यामुळे देवाने योग्य न्याय पूर्ण करून पाप क्षमा करू शकतो.

"दयाळूपणा" या शब्दाचा मूळ अर्थ न्यायाच्या मोबदल्याशी जोडलेला आहे. प्रोटेस्टंट विचारधारेनुसार, हे कर्ज फक्त येशूच्या मृत्यूमुळेच फेडले जाऊ शकते. तर, रोमन कॅथोलिक परंपरेनुसार, एखादी व्यक्ती चांगली कर्म करून आपल्या आत्म्याच्या तारणासाठी योगदान देऊ शकते.

संक्षेपात, आपण पाहतो की, बायबलमध्ये आणि मानवाच्या दृष्टीने न्याय म्हणजे कठोर शिक्षा—कधी कधी मृत्यू देखील—ही कायद्याच्या पालनासाठी आवश्यक गोष्ट मानली जाते.

या प्रणालीसाठी सतत देखरेख, निर्णय, शिक्षा आणि मृत्यू आवश्यक आहेत. पण यामुळे खरोखरच भयमुक्त समाज निर्माण होऊ शकतो का? जर देव स्वतः मृत्यूचा नियंता आणि सर्वोच्च न्यायाधीश असेल, तर मग तो स्वतः मृत्यूचे प्रत्यक्ष स्वरूप नाही का? जर देव आपल्या प्रत्येक कृतीवर लक्ष ठेवून त्या आपल्या दिव्य निकषांवर तपासत असेल, तर मग त्याच्या राज्यात राहणारे लोक मृत्यूच्या भीतीपासून मुक्त कसे राहू शकतील? या विचारसरणीनुसार, देव कायमच न्याय, शिक्षा आणि मृत्यूशी जोडला जातो.

या पार्श्वभूमीवर, मी आपल्यासमोर तीन बायबल वचने ठेवू इच्छितो, जी या पुस्तकाच्या पुढील चर्चेसाठी एक आधार ठरतील—

" पिता कोणाचा न्याय करीत नाही, तर न्याय करण्याचे सर्व काम त्याने पुत्राकडे सोपवून दिले आहे." —योहान ५:२२

"तुम्ही देहानुसार न्याय करता; मी कुणाचा न्याय करीत नाही." —योहान ८:१५

"प्रीती सहनशील आहे, उपकारशील आहे, प्रीती हेवा करीत नाही; प्रीती बढाई मारीत नाही, फुगत नाही. प्रीती गैरशिस्तपणे वागत नाही, स्वहित पाहत नाही, चिडत नाही, अपकार स्मरत नाही." —१ करिंथकर १३:४-५

ही तीन वचने स्पष्टपणे न्याय आणि मृत्यूच्या धोक्यावर आधारित शिक्षेच्या संकल्पनांना प्रश्न विचारतात. येशू स्पष्टपणे सांगतो की, ना त्याचा पिता, ना तो स्वतः कोणाचा न्याय करतो, दोष लावतो, परीक्षा घेतो किंवा शिक्षा देतो. बायबलमधील प्रेमाविषयीचा हा प्रसिद्ध परिच्छेद आपल्याला सांगतो की, प्रेम चुका लक्षात ठेवत नाही. जो प्रीती करीत नाही, तो देवाला ओळखत नाही कारण देव प्रीती आहे. प्रीतीच्या ठायी भिती नसते. इतकेच नव्हे तर पूर्ण प्रीती भीती घालवून देते. भीतीमध्ये शासन आहे आणि भीती बाळगणारा प्रीतीमध्ये पूर्ण झालेला नाही. (१ योहान ४:८, १८).

सांताक्लॉज चांगल्या आणि वाईट लोकांची यादी ठेवतो, पण देव तसे करत नाही—तो कोणाच्याही चुका मोजत नाही. जर देव चुका लक्षातच ठेवत नसेल, तर मग आपण समजलेला संपूर्ण न्यायसंस्था आणि शिक्षा यांचा पाया चुकीचा नाही का? येशू म्हणतो, "तुम्ही बाह्य गोष्टी पाहून न्याय करता." बायबल पुढे म्हणते—

"दुष्टांनी आपले दुष्टमार्ग सोडून द्यावे अनीतिमानांनी त्यांचे विचार मनातून काढावे. त्यांनी याहवेहकडे वळावे, म्हणजे ते याहवेह त्यांच्यावर दया करतील, आपल्या परमेश्वराकडे धाव घ्यावी, म्हणजे ते त्यांना मुक्तपणे क्षमा करतील. “जे माझे विचार आहेत, ते तुमचे विचार नाहीत, माझे मार्ग, ते तुमचे मार्ग नाहीत.” असे म्हणतात. “कारण आकाश पृथ्वीहून जसे उंच आहे, तसे माझे मार्ग तुमच्या मार्गांहून उच्च आहेत आणि माझे विचार तुमच्या विचाराहून उच्च आहेत." —यशया ५५:७-९ (KJV)

आपण देवाच्या न्यायाला खरोखर समजतो का? या बायबल वचनांना आणि त्यांच्या विरुद्ध जाणाऱ्या इतर अनेक वचनांना एकत्र समजावून घेता येईल का? जर प्रेम चुका लक्षात ठेवत नसेल, तर मग न्यायप्रणाली दोष नोंदवण्यावर का आधारलेली आहे? हे दोन्ही विचार परस्परविरोधी वाटतात. त्यामुळे, प्रार्थनेने या विरोधाभासाचा उलगडा करून देवाचा खरा न्याय आणि त्याची दया आपल्यासमोर उलगडणे हे आपले काम आहे.

## धडा 4

# दोषी ठरवणाऱ्या न्यायाचा उगम

येशूच्या जीवनातून आणि त्याच्या शब्दांमधून आपल्याला खऱ्या आणि तेजस्वी प्रकाशात परमेश्वराचे स्वरूप कसे आहे हे समजते. जेव्हा येशू म्हणाला की तो किंवा त्याचा पिता कुणाचाही न्याय करत नाहीत, किंवा कुणालाही  दोषी ठरवत नाहीत, तेव्हा लगेचच एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो—जर ते कुणावरही दोषारोप करत नसतील, तर मग जग न्याय आणि आरोपाने भरलेले का आहे? लोक इतके एकमेकांचा न्याय का करतात आणि हा सर्व प्रकार कधी सुरू झाला?

जेव्हा आदाम आणि हवा यांनी फळ खाल्ले आणि परमेश्वर त्यांना एदेनच्या बागेत भेटायला आला, तेव्हा ते घाबरले आणि परमेश्वराच्या भीतीने लपले. त्यांना माहीत होते की त्यांनी चुकीचे कृत्य केले आहे आणि त्याबद्दल त्यांना परमेश्वराच्या न्यायाची आणि शिक्षेची भीती वाटत होती. परमेश्वराने विचारले असता, आदाम म्हणाला:

*"जी स्त्री तू मला सोबतीला दिलीस तिने त्या झाडाचे फळ मला दिले आणि ते मी खाल्ले."* — उत्पत्ति 3:12 (NIV)

आदामने असा निष्कर्ष काढला की देवानेच अशा स्त्रीची निर्मिती केली, जिने त्याला चुकीच्या मार्गावर नेले. त्यामुळे, त्याने आपल्या कृतींसाठी देवालाच जबाबदार धरले. आदामाला वाटले की परमेश्वर त्याच्यावर रागावला आहे आणि त्याला मारण्यासाठी आला आहे, कारण देवाने आधीच सांगितले होते—" *"तू ते फळ खाशील त्या दिवशी तू निश्चित मरशील"* (उत्पत्ति 2:17)

आपल्याला हेही माहीत आहे की आदामाला मृत्यूची भीती वाटत होती, कारण बायबल असे सांगते:

*"आणि ज्याअर्थी लेकरे रक्तमांसाची आहेत, त्याअर्थी तेही रक्तमांसाचे भागीदार झाले; यासाठी की त्यांच्या मरणाद्वारे सैतानाकडे जे मृत्यूचे सामर्थ्य होते, ते त्याचे सामर्थ्य मोडून काढावे. मृत्यूच्या भयामुळे सर्व आयुष्यभर दास्यत्वाच्या गुलामगिरीत राहणाऱ्यांची त्यांना सुटका करता येईल." -इब्रीलोकांस* 2:14–15

माणसाला नैसर्गिकरीत्या मृत्यूची भीती वाटते. ही भीती आपल्याला आदामकडून वारसाहक्काने मिळाली आहे. आदामाला वाटले की देव त्याला नष्ट करणार आहे, कारण त्याने त्याच्या आज्ञेचे उल्लंघन केले होते.

त्यामुळे, त्याने असा निष्कर्ष काढला की दोष परमेश्वराचाच आहे आणि त्या चुकीसाठी शिक्षा म्हणून देवानेच मृत्यू पत्करायला हवा. तो हे थेट बोलला नाही, पण बायबल आपल्याला सुरुवातीपासून काय घडले हे सांगते:

*"पृथ्वीवरील ते सर्व लोक ज्यांची नावे जगाच्या उत्पत्तीपासून वधलेल्या कोकराच्या जीवनाच्या पुस्तकात लिहिलेली नाहीत ते त्या पशूची उपासना करतील."* — प्रकटीकरण 13:8

आपल्याला कशावरून खात्री पटेल की आदामाला खरंच असे वाटत होते की देव आणि त्याचा पुत्र दोषी आहेत?

*"कारण दैहिक मन परमेश्वरविरोधी आहे; ते परमेश्वराच्या नियमाच्या अधीन होत नाही आणि कधीही होणार नाही." —रोमकरांस* 8:7

जेव्हा आदामाने परमेश्वराच्या आज्ञेचे उल्लंघन केले, तेव्हा तो पापात पडला आणि त्याचे मन देवाच्या विरोधात गेले. त्याला देवाच्या नियमांचे पालन करता आले नाही. त्याचे मन आता दोष आणि आरोपांनी भरले गेले. कारण त्याने स्वतःला सैतानाच्या अधीन केले होते आणि त्यामुळे तो सैतानासारखा विचार करू लागला.

सैतानाची विचारसरणी काय आहे? येशूने जेव्हा यहूदी नेत्यांशी संवाद साधला, जे त्याला मारण्याचा प्रयत्न करत होते, तेव्हा त्याने असे सांगितले:

*"तुम्ही तुमचा पिता सैतानापासून आहात आणि तुमच्या पित्याची इच्छा पूर्ण करावयास पाहता. तो आरंभापासून घात करणारा व सत्याला धरून न राहणारा आहे, कारण त्याच्यामध्ये सत्य नाही. तो जेव्हा लबाड बोलतो तेव्हा तो त्याची जन्मभाषा बोलतो, कारण तो लबाड आहे व लबाडांचा पिता आहे." — योहान 8:44*

सैतानाने सुरुवातीपासूनच देवाच्या पुत्राचा वध करण्याची इच्छा धरली होती. त्याला ख्रिस्ताच्या जागी बसायचे होते आणि स्वतःला देवासारखे बनवायचे होते.

*“पहाटेच्या ताऱ्या, सूर्योदयाच्या पुत्रा! तू स्वर्गातून कसा पडला आहेस, तू, ज्याने एकेकाळी राष्ट्रांना खाली पाडले, तू पृथ्वीवर फेकला गेला आहेस! तू तुझ्या अंतःकरणात म्हणाला, ‘‘मी स्वर्गात चढून जाईन; मी माझे सिंहासन परमेश्वराच्या ताऱ्यांपेक्षा उंच करेन; मी लोकसभेच्या पर्वतावरील सिंहासनावर बसेन,*

*झाफोनच्या सर्वात उंच पर्वतावर मी स्थानापन्न होईन. मी ढगांच्या शिखरांवर जाईन; मी स्वतःला सर्वोच्च परमेश्वरासारखे करेन.'' — यशया 14:12–14*

यहूदी नेत्यांच्या वचनांत आणि त्यांच्या कृतींत आपल्याला सैतानाचा आत्मा स्पष्ट दिसतो. त्यांनी येशूविषयी दाखवलेला द्वेष आणि त्याला ठार मारण्याची इच्छा सैतानाच्या मूळ इच्छेशी जुळते. सुरुवातीपासूनच सैतानाला देवाच्या पुत्राचा नाश करून त्याच्या जागी बसायचे होते आणि स्वतःला परमेश्वराच्या बरोबरीचे सिद्ध करायचे होते.

सैतानानेच आरोप आणि दोषारोपाचा आत्मा सुरू केला. बायबल त्याला "दोषारोप करणारा" म्हणते.

*"तो प्रचंड अजगर, म्हणजे दियाबल किंवा सैतान म्हटलेला, सर्व जगाला फसविणारा प्राचीन सर्प, याला त्याच्या सर्व दूतांसह पृथ्वीवर लोटून देण्यात आले. तेव्हा स्वर्गातून आलेली एक उच्च स्वरातील वाणी मी ऐकली. ती म्हणाली, "परमेश्वराचे तारण, सामर्थ्य व त्यांचे राज्य आणि त्यांच्या ख्रिस्ताचा अधिकार यांचा उदय झाला आहे; कारण आमच्या बंधुजनावर आरोप ठेवणाऱ्याला स्वर्गातून पृथ्वीवर ढकलून दिले आहे. तो रात्रंदिवस आमच्या परमेश्वरासमोर त्यांच्यावर दोषारोप करीत असे!" — प्रकटीकरण 12:9–10*

सैतानाचा हा आत्मा आदामच्या मनात शिरला आणि त्याने स्वतःच्या पापासाठी देवाला दोष दिला. त्याने हवेला पापात पाडल्याबद्दल जबाबदार ठरवले. आदाममुळे न्याय आणि दोषारोपाचा आत्मा जगात आला. त्याने देवाची क्षमा मागितली नाही, कारण त्याला वाटले की त्याचे पाप क्षमेच्या योग्य नाही. नोहासारखे (उत्पत्ती 6:8) त्याने देवाच्या कृपेचा स्वीकार केला नाही. (ख्रिस्ताचा आत्मा) पश्चात्ताप आणि विश्वासाऐवजी त्याच्या मनात आरोप आणि अविश्वास (सैतानाचा आत्मा) भरलेला होता.

प्रेषित पौल याचा सारांश अशा शब्दांत मांडतो:

*"परमेश्वराचे वरदान एका मनुष्याने केलेल्या पापाच्या परिणामासारखे नाही आणि एकाच्या पापामुळे न्याय दंड मिळाला, परंतु वरदान अनेक अपराधानंतर आले आणि आपल्याला नीतिमान गणण्यात आले." —रोमकरांस 5:16*

हे वचन नीट समजून घ्यायला हवे, कारण अनेक लोक याचा अर्थ देवाने आदामाला दोषी ठरवले असा घेतात. अल्बर्ट बार्न्सच्या भाष्याप्रमाणे:

*"न्याय म्हणजे शिक्षा किंवा जाहीर दंड. येथे त्याचा अर्थ असा आहे की, देवाने आदामाच्या गुन्ह्यामुळे त्याच्यावर शिक्षेचा न्याय दिला, ज्यामुळे तो आणि त्याचे संपूर्ण वंश संकटात सापडले."*
*— उत्पत्ती 2:17; उत्पत्ती 3:17–19*

बायबलच्या अनेक भाषांतरमध्ये असे दिसते की आदामच्या अपराधामुळे देवाने त्याला दोषी ठरवले.

*"परमेश्वराचे वरदान एका मनुष्याने केलेल्या पापाच्या परिणामासारखे नाही आणि एकाच्या पापामुळे न्याय दंड मिळाला, परंतु वरदान अनेक अपराधानंतर आले आणि आपल्याला नीतिमान गणण्यात आले."—रोमकरांस 5:16*

*"आणि पाप करणाऱ्या एकामुळे जसा परिणाम झाला, तशी देणगीची गोष्ट नाही; कारण एका अपराधामुळे दंडाज्ञेसाठी न्याय आला, पण अनेक अपराधांमुळे निर्दोषीकरणासाठी कृपादान आले."*
*—रोमकरांस 5:16*

हे भाषांतर असे दर्शवतात की आदामच्या अपराधामुळे देवाने त्याला दोषी ठरवले. पण आपण लक्षात ठेवायला हवे की येशूने सांगितले होते की पिता कोणालाही दोषी ठरवत नाही (योहान 5:22), त्यामुळे हा अर्थ चुकीचा असू शकतो.

यंगच्या लिटरल ट्रान्सलेशनमध्ये असे स्पष्ट केले आहे:

*"आणि पाप केलेल्या एका व्यक्तीमुळे जसे मुक्त दान आले तसे नाही, कारण न्याय खरोखरच एका व्यक्तीकडून दोषारोपासाठी आहे, पण दान हे अनेक अपराधांमधून 'नीतिमान' असण्याच्या घोषणेसाठी आहे." —रोमकरांस 5:16 (YLT)*

या वचनातून आपण पाहतो की न्याय हा एका व्यक्तीकडून दोषारोपाकडे गेला. येथे वापरलेला ग्रीक शब्द *आणि* (ἐκ) याचा अर्थ आहे उगम, मूळ स्थान, जिथून काहीतरी सुरू होते — Strong's Concordance.

याचा अर्थ असा होतो की न्याय आदाममधून आला आणि त्याने दोषारोप निर्माण केला. आदाम हा न्याय आणि दोषारोपाचा उगमबिंदू आहे. याच्या उलट, ख्रिस्त आपल्याला कृपा आणि धार्मिकता मुक्तपणे देतो.

बहुतेक ख्रिस्ती लोकांनी या वचनाचा खरा अर्थ समजून घेतलेला नाही.

आधी रोमकरांस च्या 5 व्या अध्यायातही आपण हीच समस्या पाहतो.

परंतु परमेश्वर आम्हावरील **स्वतःच्या प्रीतीचे प्रमाण** असे देतात की, आम्ही पापी असताना, ख्रिस्त आम्हासाठी मरण पावले. त्यांच्या रक्ताने आपल्याला नीतिमान ठरविले, तर किती विशेषकरून **परमेश्वराच्या सर्व भावी क्रोधापासून** त्यांच्याद्वारे आपला उद्धार होईल!
—रोमकरांस 5:8–9

आता प्रश्न असा आहे—आपण कोणाच्या क्रोधापासून वाचतो?

आपण  वेगवेगळ्या भाषांतरांकडे पाहूया:

*"तर आता त्याच्या रक्ताने नीतिमान ठरवण्यात आल्यामुळे आपण विशेषेकरून त्याच्या द्वारे देवाच्या क्रोधापासून तारले जाणार आहोत." —रोमकरांस 5:9 (NASB)*

*"तर आता त्याच्या रक्ताने नीतिमान ठरविण्यात आल्यामुळे आपण किती अधिक प्रमाणात त्याद्वारे देवाच्या क्रोधापासून तारले जाणार आहोत!." —रोमकरांस 5:9 (NIV)*

NASB मध्ये "देवाच्या" हा शब्द तिरक्या अक्षरात (italics) आहे, म्हणजेच तो मूळ ग्रीक मजकुरात नव्हता. पण NIV आणि इतर भाषांतरांमध्ये तो थेट समाविष्ट केला आहे.

मूळ ग्रीक वचनात "देव" हा शब्दच नाही.

जर वचन 9 मध्ये "देवाचा  क्रोध" असेल, तर वचन 8 मधील "परमेश्वराने स्वतःचे प्रेम दाखवले" असे वचन  आपल्याला  गोंधळात टाकणारे भासेल. कोणावर प्रेम करणे आणि त्याच वेळी त्याच्यावर रागावणे शक्य आहे का? कोणाएकाला वाचवणे आणि त्याच वेळी नष्ट करणे, असे एकाच वेळी करता येईल का? New King James आणि King James भाषांतरामध्ये  हे  वचन योग्य प्रकारे दिले आहे: "आता आपण त्याच्या रक्ताने निर्दोष ठरलो आहोत, तर आपण कोपापासून वाचू." पण कोणच्या कोपापासून? वचन 10 मध्ये स्पष्ट आहे की *आम्हीच* देवाचे शत्रू होतो. आणि रोमकरांस 5:16 मध्ये स्पष्ट सांगितले आहे की दोषारोप आदामामधून आला. म्हणून ख्रिस्ताच्या द्वारे आपण आदामाकडून आलेल्या दोषारोपापासून मुक्त होतो.

आता रोमकरांस 8:1 आपल्याला  अधिक स्पष्ट होते:

*"म्हणून ख्रिस्त येशूमध्ये असणाऱ्यांना दंडाज्ञा नाही. ते देहाप्रमाणे नाही तर आत्म्याप्रमाणे चालतात." —रोमकरांस 8:1*

जेव्हा आपण ख्रिस्तामध्ये असतो, तेव्हा दोष लावणारा आत्मा आपल्यात राहू शकत नाही, कारण ख्रिस्त दोष लावत नाही. जेव्हा आपण त्याचा आत्मा स्वीकारतो, तेव्हा आपणही दोष लावणे थांबवतो.

येशूने हेच शिकवले:

*"इतरांचे दोष काढू नका म्हणजे तुमचे दोष काढण्यात येणार नाहीत." —मत्तय 7:1*

बहुतेक लोक असा विचार करतात की ख्रिस्त आपल्याला *देवाच्या न्यायापासून* वाचवतो.
ही कल्पना पूर्णपणे चुकीची आहे, कारण येशूने स्पष्ट सांगितले की पिता कोणालाही दोष देत नाही (योहान 5:22). म्हणूनच, जेव्हा आपण ख्रिस्तामध्ये असतो, तेव्हा दोष देणारा आत्मा आपल्यामधून जातो आणि त्याऐवजी पित्याचा व ख्रिस्ताचा आत्मा आपल्यात येतो—जो इतरांवर दोष ठेवत नाही, आणि त्यामुळे आपणही दोष देणे थांबवतो.

तुला हे स्पष्ट दिसते का?

आपल्याला हे जाणवत असेल कि आदामाने सुरुवातीपासूनच देवाच्या पुत्राचा न्याय केला आणि त्यावर दोष लावला, आणि दोषारोप करणे हा खून करण्याच्या आधीचा टप्पा आहे, म्हणूनच *जगाच्या स्थापनेपासून कोकरू मारले गेले.*

जर आपण रोमकरांस 5:16 चा चुकीचा अर्थ घेतो, तर आपण आदामसारखे विचार करतो. आपण देवाला दोष देणारा समजतो, पण प्रत्यक्षात आम्हीच दोषारोप करणारे आहोत. आपण स्वतःच्या विचारसरणीला देवावर लादतो आणि त्याला आपल्या सारखा समजतो.

*तुम्ही वाईट गोष्टी करता आणि तरीही मी गप्प राहिलो. मी तुझ्यासारखा आहे असे तुला वाटले... —स्तोत्र 50:21*

## धडा 5

# समज, दृष्टिकोन आणि वास्तविकता

अलीकडेच मी एक  ऑनलाईन शोध घेतला—"तू ती व्यक्ती नाहीस, जी मी समजत होतो/होते"—आणि त्यानंतर काही लोकांच्या प्रतिक्रिया वाचल्या. अनेक लोकांनी व्यक्त केलेला राग, दु:ख आणि निराशा पाहिली. त्यांना कळलं की ज्या व्यक्तीसोबत ते नात्यात होते, ती खरंतर तशी नव्हती, जशी त्यांनी समजली होती. त्यांची कल्पना आणि वास्तविकता यामध्ये मोठा फरक होता.

जे प्रसंग एकत्र येऊन दोन लोकांमध्ये प्रेम निर्माण करतात, त्यांची व्याख्या प्रत्येक व्यक्ती वेगवेगळ्या पद्धतीने करतो. हसणे, भेटवस्तू देणे आणि स्पर्श याचा अर्थ स्त्रीला वाटतो की समोरील व्यक्ती तिची खरोखरच काळजी घेतो. पण कधी कधी हे फक्त त्या पुरुषाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी असते. अर्थात, हे उलट्याही प्रकारे होऊ शकते. कोणत्याही नात्यात गैरसमज आणि फसवणूक होऊ शकते.

हे बहुतांश वेळा तेव्हाच घडते, जेव्हा आपण एखाद्या व्यक्तीच्या खूप लवकर जवळ जातो आणि त्याच्या/तिच्या खऱ्या स्वभावाचा अंदाज घेण्याआधी त्याच्यावर विश्वास ठेवतो.

ही सर्व मते वाचताना मला एक वेगळीच कथा सापडली. ही कथा स्वर्गीय पित्याला मानवजातीशी संवाद साधताना येणाऱ्या अडचणी दाखवते:

"त्या पोलिस अधिकाऱ्याला, ज्याने मला रुग्णालयात नेले— माझी भीती होती की तो माझ्यावर ओरडेल, माझ्यावर दोष लावील, माझ्या आत्महत्या करण्याच्या प्रयत्नाला स्वार्थी आणि भ्याड म्हणेल. पण त्याऐवजी, त्याने मला पुढच्या सीटवर बसवले आणि रेडिओवर लागलेलं गाणं मला आवडतंय का, हे विचारलं. तो माझ्याशी असा वागला जणू त्याने माझे अश्रू पहिलेच नाही."

पोलिस अधिकारी जवळ येताच या महिलेला वाटलं की तो तिला दोष देईल, शिक्षा करेल. पण त्याच्या वर्तनाने तिची धारणा बदलली. तिने पाहिलं की तो माणूस खरंतर प्रेमळ आणि दयाळू आहे.

ही कथा वेगळीही असू शकली  असती. समजा, जेव्हा पोलिस अधिकाऱ्याने तिला गाडीत बसण्यास सांगितलं, तेव्हा तिला वाटलं असतं की तो तिला शिक्षा करणार आहे. कदाचित ती त्याच्यावर ओरडली असती, त्याला दूर जाण्यास सांगितलं असतं. तिच्या पोलिसांबद्दल असलेल्या कल्पनांमुळे तिने त्याचं वर्तन चुकीच्या अर्थाने घेतलं असतं, आणि परिणामी परिस्थितीही वेगळी घडली असती.

समजा, ती घरी गेली आणि आपल्या मुलीला सांगू लागली की "तो भयंकर पोलिस मला त्रास द्यायला आला होता." तिने आपल्या मुलीच्या मनातही पोलिसांविषयी नकारात्मक धारणा रुजवली असती. अशा प्रकारे, चुकीची समजूत पुढच्या पिढीतही जात राहते.

जेव्हा आदामने ते फळ खाल्ले, तेव्हा त्याने गैरसमज केला की देव त्याच्या पत्नीस तिच्या अपराधासाठी मारून टाकणार आहे. त्याने देवाच्या शब्दांचा असा अर्थ घेतला की— "तू ज्या दिवशी त्या झाडाचे फळ खाशील त्याच दिवशी तू नक्कीच मरशील" — म्हणजे देवच त्यांना मारेल (उत्पत्ती 2:17).

त्या हिब्रू शब्दांचा खरा अर्थ – "**मरशील**" असा आहे. पण जेव्हा हवेने सर्पासमोर देवाचे शब्द सांगितले, तेव्हा तिने त्याचा अर्थ थोडासा बदलून "**त्या झाडाला स्पर्शही करू नका, नाहीतर तुम्ही मराल**" असे म्हटले (उत्पत्ती 3:3). याच समजुतीमुळे आदामने असा निष्कर्ष काढला की देवाच्या न्यायानुसार त्याच्या पत्नीला मृत्यूला सामोरे जावे लागेल. पूर्ण निराशेत, त्याने ठरवले की त्यानेही तिच्या बरोबर तिच्या परिणामांचा सामना करायचा.

आदामने जाणीवपूर्वक देवाविरुद्ध बंड केले नाही, परंतु त्याचा निर्णय देवाच्या चरित्राविषयी चुकीच्या समजुतीवर आधारित होता. त्याला आपल्या कृतीचे पूर्ण परिणाम आणि ते देवाच्या चरित्रावर कसे परिणाम करतील, हे समजले नाही. त्याने देवाकडून मार्गदर्शनाची वाट पाहिली नाही. आणि जेव्हा त्याने फळ खाल्ले, तेव्हा सैतानाने त्याच्या मनावर अधिक प्रभाव टाकला. आता त्याने स्वतःच न्यायनिवाडा करत असा निष्कर्ष काढला की देवाने त्यांना दोषी ठरवले आहे, पण खरोखर दोष लावणारा कोण होता? आदामानेच देवाला दोषी ठरवले! त्याने स्वतःच्या विचारसरणीप्रमाणे देवाविषयी गैरसमज करून घेतला. पण त्याची समज वास्तविकता नव्हती.

आदामाने देवाला न्याय करणारा, दोषी ठरवणारा आणि शिक्षा देणारा समजले. त्याला असे वाटले कारण त्याने स्वतःच्या मनात देवासोबत हेच केले होते:

1. त्याने देवाला अन्यायी ठरवले.
2. त्याने देवाला मृत्युदंडास पात्र ठरवले.

जेव्हा त्याने देवाला पाहिले, तेव्हा त्याला वाटले की देवही त्याच्याशी तसेच करणार! हे एक महत्त्वाचे तत्त्व आहे –

आपल्या आयुष्यातील महत्त्वाच्या लोकांविषयीच्या चुकीच्या समजुती आरशासारख्या असतात - जेव्हा आपण त्यांच्यासोबत असतो, तेव्हा त्या आपल्या वागण्यात दिसून येतात.

आदामाच्या मनात असलेल्या चुकीच्या समजुतीमुळे त्याच्या मनात बंडखोरी रुजली. आणि या विचारसरणीमधून नकळत देवाच्या पुत्राला मारण्याची इच्छा निर्माण झाली. जेव्हा देवाचा पुत्र त्याला भेटायला आला, तेव्हा आदामाला त्याच्या मनातील कल्पनेनुसार भीती वाटू लागली. त्याला वाटले की येशू ख्रिस्तच त्याचा द्वेष करतो, दोषी ठरवतो आणि त्याला मारू इच्छितो. जर आपल्याला "न्याय" कशासाठी आवश्यक आहे आणि त्याचा अर्थ काय आहे" हे जाणून घ्यायचे असेल, तर ही संकल्पना समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

काइन मध्ये ह्याचे उदाहरण आपल्याला दिसते. त्याने आपल्या भावाचा खून केला, आणि नंतर भीतीने म्हणाला की "जर मी कोणाच्या हाती सापडेन तर तो मला ठार मारून टाकेल" (उत्पत्ती 4:14).

मानसशास्त्राच्या अभ्यासात ह्या प्रक्रीयेला "मानसिक प्रक्षेपण" (Psychological Projection) म्हणतात.

"मानसिक प्रक्षेपण म्हणजे मनुष्य आपल्या अवचेतन प्रेरणा आणि भावनांना स्वतःकडून नाकारतो आणि त्याऐवजी त्या दुसऱ्या व्यक्तीवर आरोप करतो."

जेव्हा देवाचा पुत्र बागेत आदामाकडे आला, तेव्हा आदामाच्या मनात न्याय, दोषारोप आणि मृत्यूचे विचार भरलेले होते. त्याने स्वतःच्या विचारसरणीचा प्रक्षेपण देवावर केला आणि त्यालाच दोषी ठरवले. पण याची त्याला जाणीवही नव्हती. त्याने स्वतःच्या मनातील प्रवृत्ती नाकारल्या आणि त्या देवाच्या पुत्रावर लादल्या.

मग आदामला हे कसे समजावून सांगता येईल? त्याला देव आणि त्याच्या पुत्राबद्दलच्या चुकीच्या समजुतीतून बाहेर कसे आणता येईल?

आदम, जो इतरांना दोषी ठरवण्याचा मानवातील पहिला स्रोत होता, त्याने ही वृत्ती आपल्या मुलांना दिली आणि त्यांनी ती पुढच्या पिढ्यांना दिली. त्यामुळे सर्व माणसं इतरांवर दोषारोप लावतात, कारण या बाबतीत सर्वांनी पाप केले आहे. हा दोषारोप जगातील सर्व प्रकारच्या वाईट गोष्टींना कारणीभूत ठरतो.

आदमाला त्याची खरी स्थिती दाखवण्यासाठी कोणती प्रक्रिया आवश्यक होती? त्याच वेळी, देवाची दया आणि क्षमा—जी तो कोणत्याही किंमतीशिवाय त्याला देण्यास पूर्णतः तयार होता (यशया ५५:१) —ही त्याला कशी समजावून सांगता आली असती? माणसाच्या मनातील देवाविषयीच्या खोलवर रुजलेल्या चुकीच्या समजुती कशा बऱ्या करता येतील?

## धडा 6

# आपल्यासाठी जमिन शापित आहे

तुम्ही कधी हातात वेगवेगळे बिया धरल्या आहेत का? तुम्हाला प्रत्येक बियेतून काय निर्माण होईल हे ओळखता येते का? यासाठी एक प्रशिक्षित नजर लागते, जी अचूकपणे ओळखू शकते की एखादी विशिष्ट बि कोणता परिणाम देईल. जर आपल्याला त्या बी मधील क्षमता माहीत नसेल, तर आपल्याला ती पेरावी लागते, पाणी घालावे लागते आणि ती कशी वाढते हे पाहावे लागते. तिचे फूल किंवा फळ आल्यावर, त्याचा स्वाद घेऊन आणि त्याचा परिणाम अनुभवून आपण ओळखू शकतो की ते चांगले आहे की वाईट (मत्तय ७:१६-२०).

आदामामध्ये असलेल्या वाईट बियेला वाढू द्यावे लागले आणि त्याने तिचे आध्यात्मिक फळ चाखले पाहिजे, म्हणजेच त्याला त्याच्या बी चे स्वरूप आणि गुणधर्म समजून घेता येईल आणि ते चांगले आहे की वाईट हे त्याला ओळखता येईल.

*नंतर परमेश्वर देव आदामाला म्हणाला, तू तुझ्या पत्नीची वाणी ऐकली आहे आणि ज्या झाडाचे फळ खाऊ नकोस अशी आज्ञा दिलेली होती, त्या झाडाचे फळ तू खाल्ले आहेस. म्हणून तुझ्यामुळे भूमीला शाप आला आहे. तू तिजपासून अन्न मिळवण्यासाठी आपल्या आयुष्याचे सर्व दिवस कष्ट करशील; जमीन तुझ्यासाठी काटे व कुसळे उत्पन्न करील आणि शेतातील वनस्पती तुला खाव्या लागतील. तू माघारी जमिनीमध्ये जाशील तोपर्यंत तू आपल्या निढळाच्या घामाने भाकर खाशील, तू मरणाच्या दिवसापर्यंत अतिशय काम करशील. कारण मातीमधून तू निर्माण झालेला आहेस; आणि मातीमध्ये तू परत जाशील." – (उत्पत्ती ३:१७-१९)*

जमिनीवर आलेला हा शाप देवाकडून आलेला नव्हता; हा शाप आदामच्या हृदयातच होता आणि त्याच्या भूमीवरील अधिकारामुळे शापांने जमिनीत प्रवेश केला. पण आदामाला हे ठाऊक नव्हते की त्याचे हृदय शापांनी भरलेले होते.

जेव्हा सैतान ईयोबाच्या स्वभावाबाबत देवाशी वाद घालत होता, तेव्हा त्याला खात्री होती की तो ईयोबामधील शाप बाहेर काढू शकतो. सैतानाने देवाला असे सांगितले:

*“तू त्याच्या भोवती, त्याच्या घरासभोवती, आणि त्याच्या सर्वस्वाच्या प्रत्येक बाजूस कुंपण घातले आहेस ना? तू त्याच्या हातांच्या कामांस यश दिले आहेस, आणि भूमीत त्याचे धन वाढत आहे. पण जर तू आपला हात पुढे करून त्याच्याजवळ असणाऱ्या सर्वस्वावर टाकशील तर तो आत्ताच तुझ्या तोंडावर तुझा त्याग करील.” - (ईयोब १:१०-११)*

देवाने ईयोबाला मोठ्या प्रमाणात आशीर्वाद दिला होता. सैतानाला आशा होती की, जर तो ईयोबावर संकटे आणू शकला, तर आदामकडून वारशाने मिळालेला शाप तो ईयोबाच्या तोंडून बाहेर काढू शकेल.

जेव्हा ईयोबाने सर्व काही गमावले, अगदी आपल्या मुलांनाही, तेव्हा त्याच्या पत्नीच्या तोंडून हा शाप बाहेर आला:

*"नंतर त्याची पत्नी त्यास म्हणाली, “तुम्ही अजूनही तुमची सात्विक्ता धरून ठेवली आहे का? तुम्ही देवाचा त्याग करा आणि मरा,” - (ईयोब २:९)*

मानवी स्थितीबद्दल बोलताना पवित्र शास्त्रात पौल स्पष्टपणे लिहितो:

*"पवित्र शास्त्रात असे लिहिले आहे की, ‘नीतिमान कोणी नाही, एकही नाही. ज्याला समजते असा कोणी नाही, जो झटून देवाचा शोध करतो असा कोणी नाही, ते सगळे बहकले आहेत, ते सगळे निरुपयोगी झाले आहेत; सत्कर्म करणारा कोणी नाही, एकही नाही. त्यांचा घसा एक उघडलेले थडगे आहे. ते आपल्या जीभांनी कपट योजतात, त्यांच्या ओठांखाली सर्पाचे विष असते. त्यांचे तोंड शापाने व कडूपणाने भरले आहे.” – (रोमकरांस ३:१०-१४)*

देवाला ठाऊक होते की आदामाच्या हृदयातील शाप आणि कटूता त्याने लावलेल्या बीजांमध्ये प्रकट होतील, मग त्या त्याच्या शब्दांच्या बिया असोत, त्याच्या संततीच्या बिया असोत किंवा वनस्पतींच्या बिया असोत. या सर्व गोष्टी त्याच्या हृदयातील शाप प्रकट करतील.

परमेश्वराने प्रितीने आदामला वेळ दिला, जेणेकरून तो आपल्या आत असलेल्या बियांचे परिणाम पाहू शकेल. हा वेळ देण्यासाठी, देवाच्या आत्म्याला आदामासोबत राहावे लागले, त्याच्या दैनंदिन कटूतेला सहन करावे लागले आणि त्याला पुरेसा वेळ द्यावा लागला, जेणेकरून तो आपल्या आत असलेल्या बियांचे सत्य समजून घेऊ शकेल.

आदामाने आपल्या पत्नीत एक बी पेरले, जी त्याच्याच एका बरगडीतून तयार झाली होती, आणि तो स्वतः मातीपासून बनवला गेला होता. ह्याच मातृभूमीतून काईन जन्माला आला, जो आपल्या आई-वडिलांच्या प्रतिरूपात होता. जेव्हा आदामाने देवाला सांगितले की, "तू दिलेल्या स्त्रीमुळे हे घडले," तेव्हा त्याने प्रत्यक्षात स्वर्ग आणि पृथ्वी दोन्हीला दोष दिला. हवा ज्या पृथ्वीपासून बनली होती, तिला त्याने शाप दिला. त्यामुळे आदामाचेच बीज हवेमध्ये रुजले आणि त्याचे परिणाम उघड होऊ लागले.

जेव्हा आदामाने आपल्या रक्ताने माखलेल्या पुत्र अबेलाकडे पाहिले, तेव्हा त्याने स्वतःच्या शापाचे फळ प्रत्यक्ष पाहिले.  काईनमध्ये त्याच्या पित्याचेच विचार आणि स्वभाव वाढले होते—ज्याने स्वतः देवावर आरोप केला होता, त्यानेच पुढे तो आपल्या भावावर केला, त्याला दोषी ठरवले आणि शेवटी त्याचा वध केला. आदामाला आता आपल्याच कृतीचे परिणाम प्रत्यक्ष दिसत होते.

आता प्रश्न असा होता की, आदाम या घटनेतून शिकेल का? की तो अजूनही काईनला दोष देत राहील आणि वाईटपणाचा हा प्रसंग पुढे सुरूच राहील?

बागेतील प्रत्येक जिवंत प्राणी आणि झाडे आदामाच्या शापाखाली होती. त्याचा आवाज संपूर्ण बागेत पसरला होता. त्याच्या तोंडून बाहेर पडणारे शब्द निसर्गाच्या प्रत्येक कणाशी भिडत होते. (स्तोत्रसंहिता १९:३-४). त्याने जिथे आशीर्वादाचे शब्द बोलायला हवे होते, तिथे त्याच्या तोंडून शापाचे शब्द बाहेर पडत होते, आणि त्याचा परिणाम संपूर्ण सृष्टीवर होत होता.

*"आशीर्वाद देण्याची आज्ञा मला मिळाली आहे; याहवेहने आशीर्वाद दिला आहे आणि मी तो बदलू शकत नाही." – (गणना २३:२०)*

काईनाने अबेलाला मारण्याआधीच, देवाने आदामाला त्याच्यातील शापाचे प्रतिबिंब दाखवले होते. येशूने अंजीराच्या झाडाला शाप देऊन आपल्या शिष्यांना शिकवले की, यहूदी राष्ट्राने स्वतःच शाप स्वीकारला आहे, आणि जर त्यांनी पश्चात्ताप केला नाही, तर तो त्यांचा विनाश करेल. त्याचप्रमाणे, देवाने वध झालेल्या कोकराच्या प्रतिकाद्वारे आदामाला दाखवले की तो स्वतःच शापाखाली आहे, आणि जर त्याने पश्चात्ताप केला नाही, तर त्याचा नाश अटळ आहे.

*"याहवेह परमेश्वराने आदामासाठी आणि त्याच्या पत्नीसाठी चर्मवस्त्रे( कातडी वस्त्रे) केली आणि त्यांना ती घातली." – (उत्पत्ती ३:२१)*

ही कातडाची वस्त्रे मिळवण्यासाठी एका निष्पाप प्राण्याचा बळी द्यावा लागला. काही काळानंतर, अबेलाने आपल्या मेंढ्यांमधून प्रभूसाठी बलिदान अर्पण केले. त्याने हे बलिदान अर्पण करण्याची

पद्धत आपल्या वडिलांकडून शिकली होती. देवाने आदामाला शिकवले की कोकरा बळी देण्याची कृती म्हणजे प्रत्यक्षात तो देवाच्या पुत्रासोबत काय करतो आहे, हे त्याला समजून सांगण्याचा मार्ग होता.

*"यज्ञ किंवा अन्नार्पणे यांची इच्छा तुम्हाला नाही परंतु तुम्ही माझे कान उघडले आहेत; होमार्पण आणि पापार्पण यांनी तुम्हाला संतोष होत नाही." – (स्तोत्रसंहिता ४०:६)*

*"तुमच्या पूर्वजांना मी इजिप्त देशातून बाहेर आणले तेव्हा मी त्यांना केवळ होमार्पणे व यज्ञार्पणे याविषयीच आज्ञा दिली नव्हती, पण मी अशी आज्ञा दिली होती की: माझ्या आज्ञा पाळा, म्हणजे मी तुमचा परमेश्वर होईन व तुम्ही माझे लोक व्हाल. मी सांगतो ते सर्व पालन करा, म्हणजे तुमचे कल्याण होईल.'" – (यिर्मया ७:२२-२३)*

देवाला बलिदान हवे होते असे मुळीच नव्हते; उलट, त्याने दयाळूपणे आदामाला त्याच्या अंतःकरणात काय चाललं आहे हे दाखवलं. त्यामुळे आदामाला पश्चात्ताप करण्याची संधी मिळाली. त्या बळी दिलेल्या कोकरामध्ये आदामाने स्वतःच्या चुकीच्या विचारसरणीचं फळ पाहिलं–त्याचा न्याय करण्याचा आणि दोषारोप लावण्याचा स्वभाव शेवटी मृत्यूकडे, आणि तेही निष्पाप्याच्या मृत्यूकडे नेणारा ठरला.

आदामाच्या मनात असलेल्या चुकीच्या विचारांचं प्रत्यक्ष प्रकट रूप त्या कोकराच्या मृत्यूमध्ये दिसलं. त्या बळीमधूनच हे स्पष्ट झालं की त्याच्या अंतःकरणात न्याय करणे, दोषारोप करणे आणि शेवटी देवाच्या पुत्राचा वध करण्याची प्रवृत्ती होती.

## धडा 7

# पहा, हा मनुष्य!

जेव्हा देवाचा पुत्र रक्ताने माखलेल्या अवस्थेत लोकांसमोर आणला गेला–फटके मारलेला, अपमानित केलेला, मारहाण सहन केलेला–तेव्हा पिलाताने फक्त त्या दिवशी यरुशलेहेमध्ये असलेल्या लोकांनाच नाही, तर संपूर्ण मानवजातीला उद्देशून म्हटले: *"हा तो मनुष्य!" (योहान १९:५).*

जेव्हा आपण देवाच्या प्रिय पुत्राकडे पाहतो–जो त्याच्यावर आरोप करणाऱ्यांसमोर निश्चयाने उभा होता आणि ज्याच्या मृत्यूसाठी लोक आक्रोश करत होते–तेव्हा आपल्याला आपल्या स्वतःच्या स्वभावाची खरी ओळख पटते. ख्रिस्ताच्या खटल्यामध्ये, त्याच्यावर लावण्यात आलेल्या आरोपांमध्ये आणि त्याच्या मृत्यूमध्ये आपण पाहतो की सैतानाने आदामाच्या हृदयात पेरलेले वाईट बीज पूर्णपणे उगवून आले आहे.

ख्रिस्त, जो स्त्रीपासून जन्मलेला (गलतीकर ४:४) आणि मातीपासून बनलेला होता, तो आपल्यासाठी शापित ठरला, जेणेकरून आपण आपल्या अंतकरणात असलेल्या वाईटाचा स्पष्ट शोध घेऊ शकू. देवाला हेच हवे होते की, आपण आपल्या पापांची आणि त्याच्यावरील अविश्वासाची जाणीव करून घ्यावी आणि पश्चात्ताप करावा. त्याने आपल्यासाठी चांगल्या योजना आखल्या आहेत, यावर आपण विश्वास ठेवावा. त्यामुळे आपण योग्य गोष्टीसाठी प्रार्थना करू शकतो आणि त्याच्याकडे दया मागणाऱ्या प्रत्येकाला ती मिळेल, यावर ठाम राहू शकतो.

"परमेश्वराने ख्रिस्ताद्वारे जगाशी समेट घडवून आणत होता" (२ करिंथकर ५:१९) जसे देवाने आदामाला निष्पाप कोकरू बळी द्यायला सांगितले, जेणेकरून त्याला स्वतःच्या मनात काय आहे हे समजू शकेल, तसेच देवाने स्वतःचा पुत्र आपल्या हाती सोपवला, जेणेकरून आपण आपली खरी स्थिती ओळखू शकू आणि पश्चात्ताप करू.

जेव्हा हताश आणि पडलेल्या स्थितीतील माणूस क्रूसाजवळ येतो, तेव्हा त्याला वाटते की हा न्याय त्याच्यावरील पापांसाठी दिला गेला आहे, आणि त्यामुळे त्याला समाधान वाटते.

*परमेश्वर राज्य करतो; पृथ्वी उल्लास करो; द्वीपसमूह हर्ष करो! ढग व अंधार त्याच्याभोवती आहेत; नीती व न्याय त्याच्या राजासनाचा आधार आहेत. त्याच्यापुढे अग्नी चालतो, आणि त्याच्या सभोवतालचे शत्रू जाळून टाकतो. –स्तोत्रसंहिता ९७:१-३*

*आपल्याबद्दल ख्रिस्त शाप झाला आणि त्याने आपल्याला नियमशास्त्राच्या शापापासून खंडणी भरून सोडवले; "जो कोणी झाडावर टांगलेला आहे तो शापित आहे" असा शास्त्रलेख आहे" –गलतीकरांस ३:१३*

परमेश्वराचा बोध शहाण्या लोकांसाठी जीवनाचा स्रोत आहे (नीतिसूत्रे १३:१४), पण जे मनाने कटू आणि शापाने भरलेले असतात, त्यांच्यासाठी तोच नियम शिक्षा ठरतो.

*"तरीपण नियमशास्त्र पवित्र आहे, आणि आज्ञा पवित्र, यथान्याय व उत्तम आहे. तर मग जे उत्तम ते मला मरण असे झाले काय? कधीच नाही! पाप ते पापच दिसावे, म्हणून जे उत्तम त्याच्या योगे ते माझ्या ठायी मरण घडवणारे असे झाले, आणि आज्ञेच्या योगे पाप पराकाष्ठेचे पापिष्ट व्हावे म्हणून असे झाले." –रोमकर ७:१२-१३*

आदामाने स्वतःहून पाप व मृत्यूचा नियम स्वीकारला, जो अपराधासाठी शिक्षा आणि मृत्यूची मागणी करत होता. पण आपल्या भ्रमात त्याने हा नियम परमेश्वराचा आहे असे समजून घेतले.

*"न्याय करण्याच्या मिषाने, उपद्रव योजून अन्याय करणाऱ्या न्यायासनाचा तुझ्याशी काही संबंध असेल काय?" –स्तोत्रसंहिता ९४:२०*

माणूस स्वाभाविकपणे सर्व गोष्टी आदामाच्या दोषारोपाच्या आणि शिक्षा करण्याच्या दृष्टिकोनातून पाहतो. त्यामुळे ख्रिस्ताच्या वधस्तंभालाही परमेश्वराची कठोर शिक्षा आणि मृत्यूची मागणी असे समजले जाते, जणू त्याने आपल्या पुत्राला आपल्या अपराधांसाठी बळी दिला. पण प्रत्यक्षात परमेश्वर आपल्या मर्यादित समजुतीनुसार आपल्याला त्याच्या अमर प्रेमाची आणि क्षमतेची जाणीव करून देत होता. त्याला इच्छा होती की आपण अंधकारातून बाहेर येऊ आणि हे समजून घेऊ की तो आपल्याला दोषी ठरवत नाही, तर आपणच स्वतःला आपल्या पापांमुळे मृत्यूसाठी योग्य ठरवतो. आपल्या स्वतःच्या दोषभावनेमुळे आणि इतरांना शिक्षा द्यायच्या वृत्तीमुळे हे स्पष्ट होते.

येशूच्या मृत्यूद्वारे आपण माणसातील खऱ्या स्वभावाची आणि आपल्या अस्तित्वातील शापाची ओळख घेतो. माणूस आपल्या समस्या सोडवण्यासाठी न्याय, दोषारोप आणि शिक्षा यांचाच अवलंब करतो.

जर मानवजातीने खरोखरच क्रूसाचा धडा शिकला असता—जो आपल्या पापी स्वभावाचे खरे स्वरूप उघड करतो—तर मागील २००० वर्षांचा इतिहास वेगळा असता. पण दुर्दैवाने, ख्रिस्ताने ज्या सत्याचे प्रकटीकरण केले, त्यालाच पुन्हा न्यायाच्या कटघऱ्यात उभे केले जात आहे. बहुतांश लोक देवाच्या लोकांना आणि त्यांच्या संदेशाला नाकारत आहेत, आणि या नकारात ते पुन्हा एकदा देवाच्या पुत्रालाच नाकारत आहेत.

आता आपण पाहू की न्यायाची ही प्रक्रिया कशी घडते—कसे आपण तो देवाचा न्याय आहे असे समजतो, पण प्रत्यक्षात आपणच इतरांवर केलेला न्याय देवावर लादत असतो.

जसे परमेश्वराने क्रूसावरील घटनेतून आपल्याला दाखवले की, माणूस खरेतर कसा आहे, आणि तो स्वतःच्या प्रतिमेला एक कठोर न्यायाधीश म्हणून पाहण्यास तयार आहे. पण हे सर्व आपल्याला स्वतःच्या चुकीच्या समजुती ओळखून पश्चात्ताप करण्याची संधी मिळावी यासाठी आहे.

## धडा 8

# पित्याचा न्याय करणे

*आणखी तो म्हणाला, "कोणाएका मनुष्याला दोन मुलगे होते; त्यांपैकी धाकटा बापाला म्हणाला, 'बाबा, मालमत्तेचा माझा वाटा मला द्या.' तेव्हा त्याने आपल्या मिळकतीची त्यांच्यात वाटणी केली. मग फार दिवस झाले नाहीत तोच धाकटा मुलगा सर्वकाही जमा करून दूर देशी निघून गेला; आणि तेथे त्याने चैनबाजी करून आपली मालमत्ता उधळून टाकली." – लूक १५:११-१३*

ही गोष्ट अनेक पालकांच्या मनाला लागू शकते. मित्र-मैत्रिणींच्या संगतीत असताना मुलं आपल्या पालकांकडे वेगळ्या नजरेने पाहू लागतात. पालक आपल्या मुलांना वाईट प्रसंगांपासून वाचवण्याचा प्रयत्न करतात, पण मुलांना तोच प्रयत्न बंधन आणि नियंत्रण वाटतो. काही पालक खरोखरच मुलांवर कठोर नियंत्रण ठेवतात, पण येशूने सांगितलेल्या या गोष्टीत तसं नव्हतं.

धाकट्या मुलाने वडिलांकडे आपला हिस्सा मागितल्यावर तो खरं तर त्यांच्याशीच एक प्रकारचा निर्णय घेतो. त्याच्या या मागणीचा अर्थ असा आहे की, "माझा हिस्सा मिळायला तुमच्या मरणाची वाट पाहण्यापेक्षा, मला तो आत्ताच द्या!"

या गोष्टीत वडील रागावून काहीही बोलत नाहीत, ना त्याला दोष देतात. उलट, ते दोन्ही मुलांना आपली संपत्ती वाटून देतात. ग्रीक भाषेत "बायोस" हा शब्द वापरला आहे, ज्याचा अर्थ "जीवन" असा होतो. वडिलांना हे समजत होतं की त्यांचा धाकटा मुलगा अजून अपरिपक्व आहे आणि बाहेरच्या जगात त्याला अनेक अडचणींना सामोरं जावं लागेल. तरीसुद्धा, ते आपल्या मुलाला संपूर्ण प्रेमाने आणि समजूतदारपणाने त्याच्या इच्छेप्रमाणे वागू देतात, जरी त्यासाठी त्यांना स्वतःच्या भावना बाजूला ठेवाव्या लागत असल्या तरी.

मुलगा या भेटीसाठी कोणतेही आभार मानत नाही, त्यामुळे त्याला तिचे खरे मूल्य कळत नाही. म्हणूनच तो बेधडकपणे पैसे खर्च करतो, कारण त्याला त्यामागची किंमत समजत नाही. वडिलांसाठी हा मोठा त्याग होता, पण मुलाने त्याची कदर केली नाही.

काही काळाने त्याचे सगळे पैसे उडून जातात आणि त्याला आपल्या चुकीच्या निर्णयांचे परिणाम भोगावे लागतात. परिस्थिती खूपच बिकट झाल्यावर त्याला घराची आठवण येते.

*नंतर तो शुद्धीवर येऊन म्हणाला, 'माझ्या बापाच्या कितीतरी मोलकर्‍यांना भाकरीची रेलचेल आहे! आणि मी तर येथे भुकेने मरतो आहे. मी उठून आपल्या बापाकडे जाईन व त्याला म्हणेन, बाबा, मी स्वर्गाविरुद्ध व तुमच्याविरुद्ध पाप केले आहे; आता तुमचा मुलगा म्हणवून घ्यायला मी योग्य नाही; आपल्या एका मोलकर्‍याप्रमाणे मला ठेवा.' — लूक १५:१७–१९*

या वाक्यांमधून आपल्याला मुलाच्या विचारसरणीचा अंदाज येतो. त्याला वाटतं की, आता तो वडिलांच्या प्रेमाचा अधिकारी राहिलेला नाही आणि त्याला त्यांच्याशी एक नोकर म्हणूनच वागावं लागेल. तो घरी असताना त्याला वडील जणू एक कठोर मालक असल्यासारखे वाटायचे. त्याला असं वाटलं होतं की, वडील त्याच्यावर बंधनं घालत आहेत आणि त्याचं स्वातंत्र्य हिरावून घेत आहेत, म्हणूनच त्याने घर सोडण्याचा निर्णय घेतला.

मात्र, जेव्हा तो परत येतो, तेव्हा त्याची वडिलांबद्दलची तीच चुकीची धारणा स्पष्ट होते. त्याच्या मनात माफी मागण्याचा विचारही येत नाही. तो फक्त स्वतःच्या चुकांबद्दल आणि त्याला मिळणाऱ्या शिक्षेबद्दल विचार करतो. खरं तर, न्याय तोच स्वतःवर करत असतो – आणि ते पण स्वतःच्याच विरोधात. त्याला हे कळून चुकतं की, वडिलांशिवाय तो राहू शकत नाही, पण त्याच वेळी त्याला असं वाटतं की, आपल्या चुकीची शिक्षा भोगल्याशिवाय त्याला परत स्वीकारलं जाणार नाही. परिस्थिती बदलली असली तरी त्याच्या दृष्टीने वडील अजूनही एक कठोर मालकच आहेत.

*"मग तो उठून आपल्या बापाकडे गेला. तो दूर आहे तोच त्याच्या बापाने त्याला पाहिले. त्याला त्याचा कळवळा आला आणि धावत जाऊन त्याच्या गळ्यात गळा घालून त्याने त्याचे मुके घेतले." — लूक १५:२०*

मुलाला वाटत होतं की त्याच्या चुकीमुळे वडिलांनी त्याला दूर लोटलं असेल, पण सत्य याच्या अगदी उलट होतं. वडील तर रोज त्याची वाट पाहत होते, त्याच्या परतीची आस लावून बसले होते. त्यांनी त्याच्यावर कधीच राग धरला नव्हता किंवा त्याचा तिरस्कार केला नव्हता. उलट, त्यांनी त्याला माफ केलं होतं, कारण त्यांचं त्याच्यावर अनंत प्रेम होतं.

कल्पना करा, वृद्ध पिता आनंदाश्रूंनी डोळे भरून, स्वतःच्या मुलाकडे धावत जातोय. त्याला घट्ट मिठी मारतोय, प्रेमानं चुंबन घेतोय. तिथे ना राग आहे, ना शिक्षा, ना आरोप—फक्त निस्वार्थ प्रेम आहे. पण मुलगा अजूनही त्याच्या वडिलांविषयीच्या जुन्याच समजुतीत अडकलेला आहे.

*"मुलगा त्याला म्हणाला, 'बाबा, मी स्वर्गाविरुद्ध व तुमच्याविरुद्ध पाप केले आहे; आता तुमचा मुलगा म्हणवून घेण्यास मी योग्य नाही." — लूक १५:२१*

मुलाने स्वतःच्या चुकीची जाणीव तर केली, पण त्याच्या मनात भीती होती. त्याला वाटत होतं की त्याला आता एक मुलगा म्हणून नव्हे, तर फक्त एक नोकर म्हणूनच स्वीकारलं जाईल. तो वडिलांच्या प्रेमावर विश्वास ठेवू शकत नव्हता.

*"पण बापाने आपल्या दासांना सांगितले, 'लवकर उत्तम झगा आणून ह्याला घाला, ह्याच्या हातात अंगठी व पायांत जोडे घाला, आणि पुष्ट वासरू आणून कापा; आपण खाऊ आणि आनंदोत्सव करू; कारण हा माझा मुलगा मेला होता, तो पुन्हा जिवंत झाला आहे; हरवला होता, तो सापडला आहे.' मग ते आनंदोत्सव करू लागले." — लूक १५:२२–२४*

वडिलांनी मात्र मुलाला एका नोकरासारखं नव्हे, तर आपल्या लाडक्या मुलासारखंच स्वीकारलं. त्यांच्यासाठी त्याच्या चुकांपेक्षा त्याचा परत येणं महत्त्वाचं होतं. त्यांनी त्याला प्रेम दिलं, सन्मान दिला, आणि मोठ्या आनंदात त्याचं स्वागत केलं. मुलाला अजूनही हे समजून घ्यायला वेळ लागणार होता—की त्याच्या वडिलांचं प्रेम अटींना  लागू नव्हतं, ते नुसत्या कर्मांवर अवलंबून नव्हतं, ते प्रेम निखळ आणि शाश्वत होतं.

इथे धाकट्या मुलाची गोष्ट संपते. आपण त्याला वडिलांच्या मेजाशी बसलेला पाहतो—सुंदर वस्त्र घातलेला आणि त्याच्या स्वागतासाठी आनंदसोहळा सुरू आहे. पण त्याने वडिलांचे प्रेम स्वीकारले का? की त्याच्या मनात अजूनही गुलामगिरीचं बंधन होतं? हा निर्णय आता वाचकावर सोपवलेला आहे. तुम्ही काय करणार? वडिलांचे प्रेम स्वीकारणार का, की मनाच्या एका कोपऱ्यात अजूनही स्वतःला गुलाम समजणार? स्वर्गातील आपल्या वडिलांनी कधीच तुमचा न्याय केला नाही. त्यांनी तुम्हाला तुमचं आयुष्य दिलं आहे, आणि ते तुम्ही कसं वापरावं, याचा कोणताही आग्रह धरला नाही. त्यांनी तुम्हाला कधीच दोष दिला नाही—तरीसुद्धा तुम्ही त्यांना कडक शिस्त लावणारा मालक समजता का? जेव्हा तुम्ही त्यांच्याकडे परत जाता, तेव्हा त्याचे उबदार आलिंगन तुम्हाला जाणवते का? त्यांच्याशिवाय राहणं अशक्य आहे, हे तुम्हाला कळतंय का? तुम्ही त्याचे मुलं आहात—हे तुम्ही स्वीकारणार का?

*"आता मी म्हणतो की, वारस जोपर्यंत बाळ आहे तोपर्यंत तो सर्वांचा धनी असूनही त्याच्यामध्ये व गुलामामध्ये काही भेद नसतो; पण बापाने ठरवलेल्या मुदतीपर्यंत तो पालकांच्या व कारभाऱ्यांच्या स्वाधीन असतो. तसे आपणही बाळ होतो तेव्हा जगातील प्राथमिक शिक्षणाच्या दास्यात होतो; परंतु काळाची पूर्णता झाली, तेव्हा देवाने आपल्या पुत्राला पाठवले; तो स्त्रीपासून जन्मलेला, नियमशास्त्राधीन जन्मलेला असा होता. ह्यात उद्देश हा होता की, जे*

*नियमशास्त्राधीन होते त्यांना त्याने खंडणी भरून सोडवावे, आणि आपल्याला पुत्राचा हक्क मिळावा. तुम्ही पुत्र आहात, म्हणून देवाने “अब्बा! बापा!” अशी हाक मारणाऱ्या आपल्या पुत्राच्या आत्म्याला तुमच्याआमच्या अंतःकरणांत पाठवले आहे. म्हणून तू आतापासून गुलाम नाहीस तर पुत्र आहेस; आणि पुत्र आहेस तर ख्रिस्ताच्या द्वारे देवाचा वारसही आहेस." — गलतीकर ४:१–७*

मोठ्या मुलालाही त्याच न्यायबुद्धीच्या प्रश्नांचा सामना करावा लागतो. त्याचं मनही त्याच्या धाकट्या भावासारखंच विचार करतं, पण त्याची स्थिती वेगळी असल्यामुळे त्याची प्रतिक्रिया वेगळी असते.

*त्याचा वडील मुलगा शेतात होता; तो घराजवळ आला तेव्हा त्याने गायनवादन व नृत्य ह्यांचा आवाज ऐकला. तेव्हा त्याने एका चाकरास बोलावून विचारले, ‘हे काय चालले आहे?’ त्याने त्याला सांगितले, ‘तुमचा भाऊ आला आहे; आणि तो तुमच्या वडिलांना सुखरूप परत मिळाला म्हणून त्यांनी पुष्ट वासरू कापले आहे.’ तेव्हा तो रागावला व आत जाईना; म्हणून त्याचा बाप बाहेर आला व त्याची समजूत घालू लागला; परंतु त्याने बापाला उत्तर दिले, ‘पाहा, मी इतकी वर्षे तुमची सेवाचाकरी करत आहे, आणि तुमची एकही आज्ञा मी कधीच मोडली नाही; तरी मला आपल्या मित्रांबरोबर आनंदोत्सव करण्यासाठी तुम्ही कधी करडूही दिले नाही. पण ज्याने तुमची संपत्ती कसबिणींबरोबर खाऊन टाकली तो हा तुमचा मुलगा आला आणि तुम्ही त्याच्यासाठी पुष्ट वासरू कापले.’ त्याने त्याला म्हटले, ‘बाळा, तू तर माझ्याबरोबर नेहमीच आहेस, आणि माझे जे काही आहे ते सर्व तुझेच आहे. तरी उत्सव आणि आनंद करणे योग्य आहे; कारण हा तुझा भाऊ मेला होता, तो जिवंत झाला आहे; हरवला होता, तो सापडला आहे.’’— लूक १५:२५–३२*

मोठ्या मुलानेही वडिलांना कठोर आणि अन्यायकारी समजले. तो वडिलांची सेवा एका मुलासारखी नव्हे, तर गुलामासारखी करत होता. जेव्हा वडिलांनी धाकट्या मुलावर प्रेमाचा वर्षाव केला, तेव्हा त्याने त्यांना उधळपट्टी करणारे आणि अयोग्य निर्णय घेणारे मानले. मोठा मुलगा त्याच ख्रिस्ती समाजाचे प्रतीक आहे, जे देवाची सेवा प्रेमाने नव्हे, तर गुलामासारखी फक्त बक्षिसाच्या अपेक्षेने करतात. ते त्यांच्यापेक्षा पापी आणि भटकलेल्यांचा तिरस्कार करतात. स्वतःच्या चांगल्या आचरणाची तुलना बाहेरच्या पापी लोकांशी करून ते स्वतःला योग्य समजतात, पण प्रेमाने त्यांना स्वीकारायला किंवा त्यांच्या भूतकाळाला माफ करायला तयार नसतात. खरं तर, खरोखर हरवलेला कोण? धाकट्या मुलाला कळलं होतं की तो हरवला आहे, पण मोठ्या मुलाला ते सुद्धा नव्हते.

या दोघांनीही वडिलांकडे प्रेमळ पालक म्हणून न पाहता, एका कठोर स्वामीसारखं पाहिलं. त्यांनी त्यांच्या प्रेमात कुठेही दयेचा विचार केला नाही. वडिलांनी दोघांनाही प्रेम स्वीकारण्याची आणि त्यात समाधान मानण्याची विनंती केली. त्यांना खऱ्या अर्थाने वडिलांच्या प्रेमळ स्वभावाचा अनुभव यायला हवा होता, जेणेकरून त्यांची ही कठोर आणि शिक्षेवर आधारित मानसिकता बदलू शकेल—जी त्यांनी आदामकडून घेतली होती.

## धडा 9

# पित्याचे प्रकटीकरण

जसे आपण आधी पाहिले, रोमकरांस 5:16 सांगते की "ज्या न्यायामुळे शिक्षा होते, त्याची सुरुवात आदामपासून झाली." याचा अर्थ असा की एका माणसामुळे पाप जगात आले आणि त्याच्यामुळे मृत्यूही पसरला.

*"एका माणसाच्या द्वारे पाप जगात शिरले आणि पापाच्या द्वारे मरण शिरले; आणि सर्वांनी पाप केल्यामुळे सर्व माणसांमध्ये अशा प्रकारे मरण पसरले." – रोमकरांस 5:12*

आदामाने केलेले खरे पाप म्हणजे शिक्षेच्या भावनेने न्याय करणे. हे देवाच्या चरित्राच्या पूर्णपणे विरोधात आहे. दोष लावणारा आणि शिक्षा करणारा न्याय माणसाला मृत्यूच्या दिशेने नेत असतो, आणि याच न्यायामुळे मृत्यू जगात आला.

*"बंधूंनो, एकमेकांविरुद्ध बोलू नका. जो बंधूविरुद्ध बोलतो व आपल्या बंधूला दोषी ठरवतो तो नियमाविरुद्ध बोलतो व नियमाला दोषी ठरवतो; आणि जर तू नियमाला दोषी ठरवतोस तर तू नियम पाळणारा नव्हेस, न्यायाधीश आहेस." – याकोब 4:11*

या पापी मनोवृत्तीमुळे माणसं देवाला चुकीच्या नजरेने पाहतात आणि त्याच्यावर स्वतःच्या दोषारोपांच्या भावना लादतात.

*"असे तू केलेस तरी मी उगा राहिलो; मी तुझ्यासारखाच आहे असे तुला वाटले; तथापि मी तुझा निषेध करीन. मी तुझी कृत्ये तुझ्यापुढे मांडीन." – स्तोत्र 50:21*

माणसाच्या या चुकीच्या समजुती दूर करण्यासाठी, स्वर्गीय पित्याने आपला पुत्र जगात पाठवला, जेणेकरून तो आपल्याला खऱ्या देवाचा स्वभाव दाखवू शकेल. येशूने आपल्या कार्याबद्दल असे सांगितले:

*"जे काम तू मला करायला दिलेस ते पुरे करून मी पृथ्वीवर तुझा गौरव केला आहे."*

*–योहान 17:4*

येशूने पित्याची खरी ओळख जगासमोर आणली. तो आपल्या शिष्यांना म्हणाला:

*"येशूने त्याला म्हटले : "फिलिप्पा, मी इतका काळ तुमच्याजवळ असूनही तू मला ओळखत नाहीस काय? ज्याने मला पाहिले आहे त्याने पित्याला पाहिले आहे; तर 'आम्हांला पिता दाखवा' असे तू कसे म्हणतोस?" – योहान 14:9*

येशूने स्पष्ट सांगितले की, " ज्याने मला पाहिले आहे त्याने पित्याला पाहिले आहे." त्यामुळे माणसाने देवाला समजून घेतले नाही तर तो त्याच्या खऱ्या प्रेमाला गमावून बसतो.

*"देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे. देवाने आपल्या पुत्राला जगाचा न्यायनिवाडा करण्यासाठी नव्हे, तर त्याच्या द्वारे जगाचे तारण व्हावे म्हणून पाठवले." – योहान 3:16-17*

देवाने येशूला जगाचा न्याय करण्यासाठी पाठवले नाही, कारण तो स्वतः कोणालाही दोषी ठरवत नाही. त्याने आपला पुत्र पाठवला, जेणेकरून आपण खऱ्या देवाला ओळखून दोषारोपांच्या मानसिकतेतून मुक्त होऊ शकू.

*"जो त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याच्यावर न्याय-निवाड्याचा प्रसंग येत नाही. जो विश्वास ठेवत नाही त्याचा न्यायनिवाडा होऊन चुकला आहे; कारण त्याने देवाच्या एकुलत्या एक पुत्राच्या नावावर विश्वास ठेवला नाही." – योहान 3:18*

जे लोक येशूच्या नावावर किंवा त्याच्या चरित्रावर विश्वास ठेवतात, त्यांना देव दोषी ठरवत नाही, कारण येशूने कधीच कोणावरही न्याय केला नाही किंवा दोष दिला नाही. येशूला ओळखणे म्हणजे हे समजून घेणे की देवही कोणालाही दोषी ठरवत नाही. जे येशूवर विश्वास ठेवत नाहीत, त्यांना हे सत्य समजत नाही की देव कोणावरही दोषारोप करत नाही. त्यामुळे आदामकडून मिळालेल्या वारशामुळे, असे लोक इतरांना दोषी ठरवतात आणि चुकीच्या समजुतीत राहतात की देव पाप्यांना त्यांच्या पापांसाठी शिक्षा करतो.

आपण येशूच्या चरित्रावर विश्वास ठेवला पाहिजे–की तो कोणालाही दोष देत नाही–तेंव्हाच आपण देवाच्या न्यायाच्या भीतीपासून मुक्त होऊ शकतो. हेच एकमेव सत्य आपल्याला दोषारोपांच्या मानसिकतेपासून मुक्त करू शकते, जे आपले जीवन अस्थिर करते. बऱ्याच लोकांचे असे मत आहे की येशू क्रूसावर मरण्यासाठी आला आणि जो कोणी क्रूस स्वीकारणार नाही, त्याला देव

दोषी ठरवेल आणि नरकात टाकेल. जर हे खरं असतं, तर याचा अर्थ असा झाला असता की देवाने जगावर न्याय आणण्यासाठीच आपला पुत्र पाठवला. जर देवाने केवळ एका व्यक्तीलाही क्रूस नाकारल्यामुळे दोषी ठरवलं असतं, तर याचा अर्थ क्रूसामुळे लोकांवर न्याय येतो असाच झाला असता.

*"जे काम तू मला करायला दिलेस ते पुरे करून मी पृथ्वीवर तुझा गौरव केला आहे." – योहान 17:4*

जर येशूचे कार्य पूर्ण झाले होते, तर तो क्रूसावर मरण्याच्या आधीच असे कसे म्हणू शकला?

*"जे मुख्य याजक, मंदिराचे सरदार व वडील त्याच्यावर चालून आले होते त्यांना येशू म्हणाला, “जसे लुटारूवर जावे तसे तुम्ही तलवारी व सोटे घेऊन निघालात काय? मी दररोज मंदिरात तुमच्याबरोबर असे तरी तुम्ही माझ्यावर हात टाकला नाही; पण ही तुमची घटका आणि अंधाराची सत्ता आहे." – लूक 22:52-53*

येशूचे क्रूसावरील मरण अंधाराच्या शक्तीचा परिणाम होते. ही शैतानाच्या सुरुवातीपासूनच्या इच्छेची पूर्तता होती, तसेच हे आदमाच्या पापात पडल्यानंतर देवाच्या पुत्राबद्दल वाटणाऱ्या रागाचे प्रगटीकरण होते.

येशूचा क्रूस माणसाच्या अंतःकरणाचा खरा चेहरा दाखवतो. तो दाखवतो की माणसाच्या मनात देवाविषयी एक नैसर्गिक, नकळत असलेली शत्रुत्वाची भावना आहे (रोमकरांस 8:7). देवाने माणसांना त्याच्या पुत्राचा वध करण्यास परवानगी दिली, जेणेकरून त्यांना त्यांच्या स्वतःच्या आत असलेली दुष्टता स्पष्टपणे दिसावी–तीच दुष्टता जी आदामकडून आपल्याला वारसा मिळाली आहे.

देवाचे प्रेम किती अगम्य आहे! त्याने आपल्या स्वतःच्या पुत्राला यातना भोगू दिल्या, तरीही त्याने आपल्याला दोषी ठरवले नाही. येशूने क्रूसावर असताना जे शब्द उच्चारले, तेच देवाच्या हृदयातील भावना व्यक्त करतात:

*“हे बापा, त्यांना क्षमा कर; कारण ते काय करतात हे त्यांना समजत नाही.” – लूक 23:34*

*"देव ख्रिस्तामध्ये स्वत:बरोबर जगाचा समेट करत होता." तो लोकांच्या पापांचा हिशोब ठेवत नव्हता..." – २ करिंथकर 5:19*

क्रूस आपल्याला दाखवतो की आपण त्याच्या पुत्राचा वध केल्यानंतरही, देव आपल्याला माफ करण्यास तयार होता. येशूने जगासमोर हे स्पष्ट केले की देव न्याय करून शिक्षा देणारा नाही, तर कृपा आणि दया देणारा आहे.

*"आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर व आपल्या वैऱ्याचा द्वेष कर,' असे सांगितले होते, हे तुम्ही ऐकले आहे. मी तर तुम्हांला सांगतो, तुम्ही आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा, [जे तुम्हांला शाप देतात त्यांना आशीर्वाद द्या, जे तुमचा द्वेष करतात त्यांचे बरे करा] आणि जे तुमचा छळ करतात [व तुमच्या पाठीस लागतात] त्यांच्यासाठी प्रार्थना करा. अशासाठी की, तुम्ही आपल्या स्वर्गातील पित्याचे पुत्र व्हावे; कारण तो वाइटांवर व चांगल्यांवर आपला सूर्य उगववतो आणि नीतिमानांवर व अनीतिमानांवर पाऊस पाडतो." – मत्तय 5:43-45*

आपला स्वर्गीय पिता त्याच्या शत्रूवरही प्रेम करतो. जो त्याला शाप देतो, त्याला तो आशीर्वाद देतो. हेच येशूने पृथ्वीवर जगताना दाखवले. येशूने कधीही कोणावर न्याय केला नाही, दोष दिला नाही किंवा शिक्षा केली नाही. त्याऐवजी, आदामाच्या संततीने त्यालाच दोषी ठरवले आणि क्रूसावर ठार मारले.

येशूने स्वतःला न्याय, दोषारोप आणि मृत्यू सहन करू दिले, फक्त आपल्या अंतःकरणातील वास्तविकता प्रकट करण्यासाठी. पण त्याचा हेतू आपल्याला दोषी ठरवणे नव्हता, तर आपण किती मोठ्या अंधकारात आहोत हे दाखवून, त्याने आपल्याला क्षमा आणि कृपेची संधी दिली.

*"शिवाय अपराध वाढावा म्हणून नियमशास्त्राचा प्रवेश झाला; तरी जेथे पाप वाढले तेथे कृपा त्यापेक्षा विपुल झाली." – रोमकर 5:20*

येशू निर्दोष होता. तो लोकांसाठी आनंद आणि आशीर्वादाचा स्रोत होता. त्याने रुग्णांना बरे केले, मृतांना उठवले, मुलांना आशीर्वाद दिला आणि सर्वांना सांगितले की त्यांचा स्वर्गीय पिता त्यांच्यावर प्रेम करतो. तो पापात वावरणाऱ्या लोकांना सावध करत असे, त्यांना पश्चात्ताप करण्यास सांगत असे.

येशूचे निर्मळ जीवन हे एकमेव सत्य प्रमाण आहे की देव कसा आहे. त्याचाच स्वभाव आपल्याला सत्य आणि असत्य यामधला खरा भेद समजावतो. जर आपण देवाबद्दलचे हे प्रगटीकरण स्वीकारले नाही, तर आपण बायबल वाचताना गोंधळून जाऊ. कारण आपल्याला आदामकडून मिळालेली प्रवृत्ती आहे की आपण दोष देवावर टाकतो.

आदामाने फळ खाल्ल्यानंतर देवाने विचारले असता, त्याने दोष देवावरच टाकला. हीच प्रवृत्ती आजही प्रत्येक वाचकाच्या मनात असते. विशेषतः, जुन्या करारातील गोष्टी वाचताना, आपली नैसर्गिक प्रवृत्ती त्यावर न्याय करण्याची असते. येशू आपल्या पृथ्वीवरील जीवनाने दाखवतो की जुन्या करारातील गोष्टी योग्य प्रकारे कशा वाचाव्या. जर आपण हे समजून न घेतले आणि येशूमध्ये प्रकट झालेली देवाची महिमा नाकारली, तर बायबल वाचताना आपल्या डोळ्यावर एक पडदा राहील.

*"तर मग आम्हांला अशी आशा असल्यामुळे आम्ही फार धिटाईने बोलतो; इस्राएल लोकांनी जे नाहीसे होत चालले होते त्या तेजाकडे एकसारखी दृष्टी लावू नये 'म्हणून मोशे आपल्या मुखावर आच्छादन घालत असे,' तसे आम्ही करत नाही. परंतु त्यांची मने कठीण झाली; कारण जुना करार वाचून दाखवण्यात येतो तेव्हा तेच आच्छादन आजपर्यंत तसेच न काढलेले राहते; ते ख्रिस्तामध्ये नाहीसे होते. आजपर्यंत मोशेचा ग्रंथ वाचून दाखवण्यात येतो तेव्हा त्यांच्या अंतःकरणावर आच्छादन राहते; परंतु त्यांचे अंतःकरण प्रभूकडे वळले म्हणजे 'आच्छादन काढले जाते.' प्रभू आत्मा आहे;1 आणि जेथे प्रभूचा आत्मा आहे तेथे मोकळीक आहे. परंतु आपल्या मुखांवर आच्छादन नसलेले आपण सर्व जण आरशाप्रमाणे 'प्रभूच्या वैभवाचे' प्रतिबिंब पाडत आहोत;2 आणि प्रभू जो आत्मा त्याच्या द्वारे, तेजस्वितेच्या परंपरेने, आपले रूपांतर होत असता आपण त्याच्याशी समरूप होत आहोत." – २ करिंथकर 3:12-18*

जेव्हा तुम्हाला समजून घ्यायचे असेल की देव कसा वागतो, तेव्हा नवीन करारातील पहिल्या चार सुवार्तांवर लक्ष द्या. त्या तुम्हाला देवाच्या स्वभावाचा खरा आरसा दाखवतात. येशूने हरवलेल्या दोन मुलांच्या गोष्टीत दाखवले की पिता न्याय करत नाही; उलट, मुलांनीच पित्याचा न्याय केला. पण मग अशा वचनांचे काय?

*"आता सर्वकाही तुम्ही ऐकले; सर्वांचे सार हे की देवाचे भय धर व त्याच्या आज्ञा पाळ; मनुष्यकर्तव्य काय ते एवढेच आहे. सगळ्या बऱ्यावाईट गुप्त गोष्टींचा न्याय करताना देव सगळ्या कृत्यांची झाडाझडती घेईल." – उपदेशक १२:१३-१४*

*"मी तुम्हांला सांगतो की, माणसे जो जो व्यर्थ शब्द बोलतील त्याचा हिशेब त्यांना न्यायाच्या दिवशी द्यावा लागेल. कारण तू आपल्या बोलण्यावरून निर्दोषी ठरशील आणि आपल्या बोलण्यावरून दोषी ठरशील." – मत्तय १२:३६-३७*

*"कारण आपणा सर्वांना ख्रिस्ताच्या न्यायासनासमोर खऱ्या स्वरूपाने प्रकट झाले पाहिजे, ह्यासाठी की, प्रत्येकाला, त्याने देहाने केलेल्या गोष्टीचे फळ मिळावे; मग ते बरे असो किंवा वाईट असो." – २ करिंथकर ५:१०*

ही वचने वाचल्यावर असे वाटते की देव प्रत्येक गोष्टीचा न्याय करतो. पण मग येशूने आपल्या जीवनातून दाखवलेली शिकवण आणि त्याचे शब्द यांच्याशी हे कसे जुळवायचे?

*"पिता कोणाचाही न्याय करत नाही, तर न्याय करण्याचे सर्व काम त्याने पुत्राकडे सोपवून दिले आहे;" – योहान ५:२२*

*"तुम्ही देहबुद्धीने न्याय करता; मी कोणाचा न्याय करत नाही." – योहान ८:१५*

हे नक्की आहे की न्याय होईल. हेही खरे आहे की आपण केलेल्या प्रत्येक कृतीचा आपल्याला सामना करावा लागेल. पण मुख्य प्रश्न असा आहे की न्याय करणार कोण? देव असे करू शकतो का की तो प्रत्येक गोष्टीला न्यायाच्या प्रक्रियेत आणेल, पण कोणावरही स्वतः न्याय करणार नाही?

होय, नक्कीच! न्याय होईल, आणि येशूने स्पष्टपणे दाखवले आहे की तो न्याय कसा होईल.

## धडा 10

# मीही तुला दोषी ठरवीत नाही

तुम्हाला न्यायाच्या दिवशी निर्भय राहायचे असेल, तर हा सर्वात सोपा सल्ला घ्या:

*"इतरांचा न्याय करू नका, म्हणजे तुमचाही न्याय होणार नाही. कारण ज्या पद्धतीने तुम्ही इतरांचा न्याय कराल, त्याच पद्धतीने तुमचाही न्याय करण्यात येईल, ज्या मापाने तुम्ही मापून द्याल, त्याच मापाने तुम्हाला मापून देण्यात येईल." – मत्तय ७:१-२*

पूर्वी मी हे वचन अशा दृष्टीने पाहायचो जणू देव आपल्या यादीत तुमच्या सगळ्या कृतींची नोंद घेत आहे आणि योग्य वेळी तुम्हाला त्याची शिक्षा देणार आहे. आदामकडून आलेल्या अपराधी भावनेमुळे, मला असे वाटायचे की, जो न्याय करतो आणि शिक्षा देतो, त्याचाच देव न्याय करेल आणि शिक्षा देईल. आता हे विचार पुन्हा लिहिताना मला आश्चर्य वाटते की मी इतकी मोठी विसंगती आधी का पाहू शकलो नाही.

पण मग असा न्याय कसा शक्य आहे, जिथे देव न्यायाची प्रक्रिया पूर्ण करतो, पण कुणालाही दोषी ठरवत नाही? चला, यावर येशूने दिलेले उत्तर पाहूया:

*नंतर येशू जैतुनाच्या डोंगराकडे परतले. अगदी पहाटेच येशू पुन्हा मंदिराच्या अंगणात आले, त्यांच्याभोवती सर्व लोक जमले आणि ते बसून त्यांना शिकवू लागले. नियमशास्त्र शिक्षक व परूशी यांनी व्यभिचार करीत असताना धरलेल्या एका स्त्रीला त्यांच्याकडे आणले. त्यांनी तिला समुदायाच्या पुढे उभे केले आणि ते येशूंना म्हणाले, "गुरुजी, या स्त्रीला व्यभिचाराचे कृत्य करीत असतानाच धरले आहे. मोशेच्या नियमशास्त्रामध्ये आम्हास आज्ञा दिली आहे की अशा स्त्रियांना दगडमार करावा. परंतु आपण काय म्हणता?" – योहान ८:१-५*

या स्त्रीला न्यायासाठी येशूकडे आणले गेले होते, पण तिच्याबद्दल बोलण्याच्या त्यांच्या पद्धतीवरून हे स्पष्ट होत होते की त्यांनी आधीच तिचा न्याय करून तिला दोषी ठरवले होते. 'कृत्य करीत असतानाच धरले' या विधानावरून असे वाटते की या पुरुषांना आधीच या घटनेची

कल्पना होती, किंवा तेच कदाचित याचे कारण होते. तरीही नियमशास्त्रानुसार ती अपराधी होती आणि मृत्युदंडास पात्र होती.

*ते या प्रश्नाचा उपयोग त्यांना सापळ्यात पकडावे व दोष ठेवण्यास आधार मिळावा म्हणून करत होते. परंतु येशू खाली वाकून बोटाने जमिनीवर लिहू लागले. ते त्यांना प्रश्न विचारत राहिले, तेव्हा येशू सरळ उभे राहून त्यांना म्हणाले, “तुम्हामध्ये जो पापविरहित आहे त्यानेच तिच्यावर प्रथम दगड टाकावा.” – योहान ८:६-७*

हे लोक येशूला अडचणीत आणू पाहत होते—जर त्याने स्त्रीला सोडून दिले, तर तो नियमशास्त्राच्या विरोधात जाईल, आणि जर तिला मारायला सांगितले, तर तो रोमी कायद्याच्या विरोधात ठरेल. पण येशू शांत राहिला. तो त्यांचे दुष्ट हेतू उघड करू शकला असता, त्यांच्या पापांचे प्रदर्शन करून त्यांना शिक्षा ठोठावू शकला असता, पण त्याने तसे काही केले नाही. त्याने फक्त जमिनीवर लिहिले.

ते त्याच्याकडे उत्तर मागतच राहिले, शेवटी येशू म्हणाला, "जो पापविरहित आहे त्यानेच तिच्यावर प्रथम दगड टाकावा." येशू, जो स्वतः परमेश्वराचा पुत्र होता, त्याने या लोकांच्या अंतःकरणातील गुपिते वाचली. त्याने हे सामर्थ्य एका वेळी प्रकटही केले होते.

*"येशूंनी तिला सांगितले, “जा आणि तुझ्या पतीला इकडे बोलावून आण.” परंतु ती स्त्री म्हणाली, “मला पती नाही.” त्यावर येशू म्हणाले, “मला पती नाही हे जे तू म्हणतेस ते अगदी खरे आहे. कारण वस्तुस्थिती अशी आहे की तुला पाच पती होते आणि जो पुरुष सध्या तुझ्याबरोबर आहे, तो तुझा पती नाही. तू जे काही सांगितले, ते सर्व सत्य आहे.” – योहान ४:१६-१८*

येशूने त्या स्त्रीला पाच नवरे असूनही आणि सहाव्यासोबत विवाह न करता संबंध ठेवत असतानाही तिच्या वर्तनासाठी दोषी ठरवले नाही. त्याने फक्त तिला तिच्या आयुष्याबद्दल माहिती आहे हे सांगितले. त्याचप्रमाणे, येशूने जमिनीवर लिहिले, याचा अर्थ त्याला त्या पुरुषांचे जीवन माहित होते, पण त्याने त्यांनाही दोषी ठरवले नाही. जसे येशूने त्या स्त्रीला विचारले की तिचा नवरा कोठे आहे, हे माहीत असून की ती विवाहबंधनात नाही, तसेच त्याला हे ही माहित होते की ह्या स्त्रीला न्यायदंडासाठी आणणारे पुरुषही पापमुक्त नव्हते. येशू त्यांना पश्चात्तापाची संधी देत होता, पण त्यांना दोषी ठरवत नव्हता.

*"मग ते पुन्हा खाली वाकून जमिनीवर लिहू लागले. ज्यांनी हे ऐकले, ते सर्वजण प्रथम वयस्कर व नंतर एका पाठोपाठ एक असे सर्वजण निघून गेले आणि शेवटी येशू एकटेच त्या स्त्रीसोबत राहिले, ती स्त्री अद्याप तिथेच उभी होती." – योहान ८:८-९*

येशूने धुळीत लिहिलेल्या गोष्टींमुळे त्या पुरुषांच्या मनात खंत निर्माण झाली. त्या शब्दांनी त्यांच्यावर आरोप किंवा न्याय केला नाही, तर त्यांच्या भूतकाळाच्या आठवणींवर प्रकाश दिला, जेणेकरून ते बरे होतील. येशूला त्यांच्या वयाचे ज्ञान होते, म्हणूनच ते वयानुसार निघून गेले. या पुरुषांनी स्वतःला न्यायाच्या प्रक्रियेत ओढले, कारण त्यांनी येशू आणि त्या स्त्रीवर न्याय करायचा प्रयत्न केला होता. हे आपल्याला सुरुवातीच्या काळातील एका प्रसंगाची आठवण करून देते. जेव्हा हवेने सैतानाच्या खोट्या गोष्टींवर विश्वास ठेवून आत्मिक व्यभिचार केला, तेव्हा आदामने स्वतःच्या चुका लपवण्यासाठी देवाच्या पुत्रावर आरोप ठेवला. त्याच्या स्वतःच्या निर्णयामुळे त्याने स्वतःवर न्याय आणला. योहान ८ मधील हा प्रसंग प्रत्यक्ष आयुष्यातील एक प्रतिबिंब आहे, जे आदामच्या वेळेस घडलेल्या गोष्टींचे प्रतीक आहे.

ह्या स्त्रीला आणणाऱ्या पुरुषांनी न्यायाचा निर्णय घेतला, कारण ते स्वतः तिला घेऊन आले आणि तिला येशूच्या समोर उभे केले. येशूने त्यांना न्यायासाठी बोलावले नव्हते, तर त्यांनी येशू आणि त्या स्त्रीला दोषी ठरवण्यासाठी हा प्रसंग रचला होता. परमेश्वर न्याय कसा करतो? तो आपल्याला आपल्या स्वतःच्या निर्णयांचे परिणाम भोगू देतो. जर आपण इतरांवर न्याय करायचा ठरवला, तर जीवनातील परिस्थिती अशा प्रकारे घडतील की आपण स्वतःवरही तसाच न्याय करू.

हे पुरुष त्यांच्या स्वतःच्या विवेकाने दोषी ठरले आणि त्यांनी स्वतःवरच न्याय केला. ते येशूकडून क्षमा मागू शकले असते, पण त्यांनी तसे केले नाही, कारण त्यांनीही त्या स्त्रीवर दया दाखवली नव्हती. जसे त्यांनी इतरांच्या पापांवर न्याय केला, तसेच त्यांनी स्वतःच्या पापांवरही न्याय केला आणि जगाचा प्रकाश असलेल्या येशूपासून क्षमा न पावत दूर निघून गेले.

येशूने त्यांचा न्याय केला नाही किंवा त्यांना दोषी ठरवले नाही. पण जेव्हा ते त्या प्रभूच्या उपस्थितीत आले, जो संपूर्ण जीवनभर त्यांच्यासोबत होता, तेव्हा त्यांना त्यांच्या स्वतःच्या आयुष्याचा आरसा दिसला. ख्रिस्ताच्या प्रकाशात त्यांनी स्वतःच्या चुकीकडे पाहिले आणि स्वतःच स्वतःला दोषी ठरवले. त्यानंतर, त्या आठवणींना विसरण्यासाठी आणि पुन्हा अंधारात जाण्यासाठी त्यांनी येशूच्या सान्निध्यातून दूर जाणे पसंत केले.

*"दुष्कृत्ये करणारा प्रत्येकजण प्रकाशाचा द्वेष करतो आणि प्रकाशाकडे येत नाही, कारण आपली दुष्कृत्ये प्रकट होतील अशी त्याला भीती वाटते." – योहान ३:२०*

ह्याच दरम्यान, ही असहाय्य स्त्री हे ऐकत होती की, "जो निर्दोष आहे, त्याने पहिला दगड मारावा." तिच्या मनात क्षणभर विचार आला की येशूने हे शब्द मृत्युदंडाची घोषणा म्हणून उच्चारले असावेत. तिने आपल्या भूतकाळातील सगळ्या चुका आठवल्या आणि तिला असे वाटले की आता तिचे जीवन संपेल.

*"मग येशू सरळ उभे राहून तिला म्हणाले, "बाई, ते कुठे आहेत? तुला कोणीही दोषी ठरविले नाही काय?" ती म्हणाली "कोणी नाही, प्रभू!" येशू जाहीरपणे म्हणाले, "तर मग मीही तुला दोषी ठरवीत नाही. जा आणि तुझे पापमय जीवन सोडून दे." – योहान ८:१०-११*

येशूने तिला विचारले, "तुझ्यावर आरोप करणारे कोठे आहेत?" हा प्रश्न तिला स्वतःच्या परिस्थितीचा विचार करायला लावणारा होता. ती त्या पुरुषांवर आपला राग काढू शकली असती, ज्यांनी तिला सापळ्यात अडकवले आणि येशूला फसवण्याचा प्रयत्न केला. जर तिने इतरांवर आरोप केले असते, तर तिने स्वतःलाच दोषी ठरवले असते आणि तिच्या आशेचा मार्ग बंद झाला असता.

पण जेव्हा तिने पाहिले की ते पुरुष तिथे नव्हते आणि येशूच्या चेहऱ्याकडे तिने बघितले, तेव्हा तिला धैर्य मिळाले. जेव्हा तिच्या तारणहाराच्या कोमलतेने भरलेल्या चेहऱ्याकडे तिने पाहिले, तेव्हा तिच्या हृदयात विश्वास निर्माण झाला. येशू तिला विचारतो, "कोणीही तुला दोषी ठरवले नाही का?" हा प्रश्न तिच्या हृदयाला भिडला. आता तिने स्वतःच स्वतःच्या बाबतीत निर्णय घ्यायचा होता. तिचा भूतकाळ पुन्हा तिच्यासमोर उभा राहिला, तिच्या आयुष्यातील अंधार पुन्हा तिला खचवू पाहत होता, पण येशूच्या चेहऱ्यावरचे प्रेमळ हास्य तिला स्वतःबद्दल निर्णय देण्यास मदत करत होते. आणि ती उत्तर देते, "कोणी नाही, प्रभू!."

जसे त्या स्त्रीने स्वतःच आपल्या प्रकरणाचा न्याय केला, तसाच न्याय येशूने तिला दिला. त्याने तिला विचारले, "कोणी तुला दोषी ठरवले आहे का?" आणि जेव्हा तिने "नाही, प्रभु" असे उत्तर दिले, तेव्हा त्यानेही तिला सांगितले, "मीही तुला दोषी ठरवत नाही. जा आणि पुन्हा पाप करू नकोस."

परमेश्वर आपल्याला अशाच प्रकारे न्यायासमोर आणतो. आपण स्वतःच आपला न्याय करतो आणि जसे आपण ठरवतो, तसेच आपल्याबरोबर होते. आपण जसे इतरांबद्दल न्याय करतो, तसेच आपल्यासाठीही न्याय ठरतो.

आपल्याला येशूच्या न्यायासनासमोर उभे राहावे लागणार आहे, याचे कारण म्हणजे आदाम आणि त्याच्या संततीनेच न्यायाची गरज भासवली. त्यांनी देवाच्या चरित्राबद्दल चुकीचा निर्णय घेतला आणि त्याला न्यायाधीश ठरवले. ख्रिस्त या न्यायात सहभागी होतो, पण तो अशी कृती करतो की शेवटी प्रत्येक जण स्वतःच स्वतःच्या निर्णयावर येतो.

*"निश्चितच, जेव्हा गैरयहूदी लोकांजवळ नियमशास्त्र नव्हते, तरी जे नियमशास्त्रात आहे ते नैसर्गिकरित्या पाळीत होते, त्यांच्याजवळ नियम नव्हते तरी ते स्वतः नियम असे झाले. ते प्रदर्शित करतात की नियम त्यांच्या अंतःकरणात लिहिलेले आहे; त्यांची विवेकबुद्धीच त्यांना साक्ष देते आणि त्यांचेच विचार त्यांना दोषी किंवा निर्दोष ठरवितात. हे त्या दिवशी घडेल जेव्हा माझ्या शुभवार्तेनुसार परमेश्वर येशू ख्रिस्ताद्वारे प्रत्येकाच्या गुप्त रहस्यांचा न्याय करतील."*

— *रोमकरांस २:१४–१६*

ही आपल्यासाठी खूप चांगली बातमी आहे, फक्त दोन गोष्टी आपण मान्य करायला हव्यात—

1. परमेश्वर आपल्यावर प्रेम करतो आणि आपल्याला क्षमा करतो.
2. येशूच्या जीवनातून आपल्याला पित्याच्या चरित्राचे खरे स्वरूप समजते.

जर आपण बायबलमधील न्यायासंदर्भातील वचने येशूच्या जीवनाच्या प्रकाशात पाहिली नाहीत, तर आपल्याला देव कठोर आणि क्रूर वाटेल. पण जर आपण येशूच्या कृतींवर विश्वास ठेवला, तर आपल्याला समजेल की न्याय म्हणजे शिक्षा नव्हे, तर स्वतःच्या कृतींना सामोरे जाण्याची संधी आहे.

आता एक प्रश्न निर्माण होतो— येशूला त्या पुरुषांचे पाप कसे ठाऊक होते? याचा अर्थ असा नाही का की तो त्यांच्या चुकीच्या गोष्टी कुठेतरी लिहून ठेवत होता? बायबलमध्ये न्यायाच्या वेळी पुस्तकांमध्ये नोंदी असतील, असे म्हटले आहे, आणि प्रत्येकाने आपल्या प्रत्येक शब्दाचा हिशोब द्यायचा आहे, असेही सांगितले आहे. तर मग, देवाने हे सर्व लिहून ठेवले आहे का? आणि त्याचा उपयोग तो न्यायासाठी करणार आहे का?

## धडा 11

# नियम आध्यात्मिक आहेत

या पुस्तकाच्या दुसऱ्या धड्यात आपण कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी देखरेख आणि बळाच्या भीतीचा वापर केल्याने होणारे परिणाम पाहिले. अशा वातावरणात नागरिकांवर जबरदस्तीने कायदा लादला जातो. ते कायदा पाळतात, पण तो चांगला आहे म्हणून नव्हे, तर नियम तोडल्यास शस्त्रधारी संस्था त्यांना शिक्षा करेल या भीतीने.

मी पुन्हा एकदा बायबलमधील एका परिच्छेदाकडे वळू इच्छितो, जो आपण आधी पाहिला होता, आणि मग ख्रिस्ताच्या विधानांशी त्याचा मेळ कसा घालायचा ते पाहू.

*“जसे मी पाहिले, “सिंहासने मांडली गेली आणि प्राचीन पुरुष आपल्या आसनावर बसला आहे. त्याची वस्त्रे हिमासारखी शुभ्र होती; त्याच्या मस्तकावरील केस लोकरीप्रमाणे पांढरे होते. त्याचे सिंहासन अग्निज्वालायुक्त होते, आणि त्याच्या सिंहासनाची चाके प्रज्वलित केलेल्या अग्नीप्रमाणे होती. अग्नीची नदी निघून वाहत होती जी त्याच्यामधून बाहेर येत होती. हजारोच्या हजार लोक त्याची सेवा करीत होते; कोट्यावधी लोक त्याच्यासमोर उभे होते. न्यायालयाचे कामकाज सुरू झाले आणि पुस्तके उघडली गेली.” — दानिएल ७:९-१०*

हे दृश्य एका न्यायालयासारखे दिसते, जिथे पुराव्यांची पुस्तके उघडली जातात. जर हा खरोखरच स्वर्गीय न्यायालय असेल आणि *प्राचीन काळचा* म्हणजेच परमेश्वर पिता हा न्यायाच्या प्रक्रियेतून ठरवत असेल की कोण त्याच्या नियमांचे पालन न केल्यामुळे जगेल आणि कोण मरेल, तर ख्रिस्ताने सांगितलेल्या पुढील शब्दांना चुकीचे म्हणावे लागेल.

*याशिवाय, पिता कोणाचाही न्याय करीत नाही ... — योहान ५:२२*

आत्तापर्यंत आपण एक महत्त्वाचा मुद्दा सोडला होता – स्वर्गाच्या दृष्टिकोनातून कायद्याचा अर्थ.

*“नियमशास्त्र आध्यात्मिक आहे; हे आपल्याला माहीत आहे. पण मी तर पापाला गुलाम म्हणून विकलेला दैहिक प्राणी आहे.’’ — रोमकर ७:१४*

परमेश्वराचा कायदा हा व्यक्तीच्या आत्म्याशी संबंधित आहे. तो एक नातेसंबंधात्मक कायदा आहे, जो सांगतो की परमेश्वराचा आत्मा तुमच्या आत वसलेला असेल, तर त्याचा तुमच्यावर काय परिणाम होईल. तो असा कायदा नाही जो सांगतो की तुम्ही देवाला प्रसन्न करण्यासाठी हेच करायला हवे.

*"परंतु जो कोणी स्वतंत्रतेच्या परिपूर्ण नियमांकडे लक्ष देतो आणि त्यामध्ये स्थिर राहतो, तो ऐकून विसरणारा न होता त्याप्रमाणे कृती करणारा होतो आणि तो जे काही करतो त्या गोष्टीत त्याला आशीर्वाद मिळतो. — याकोब १:२५*

जेव्हा एखादा कायदा फक्त आज्ञापालन लादण्यासाठी वापरला जातो, तेव्हा तो बंधनात टाकणारा ठरतो, स्वातंत्र्य देणारा नाही. पण परमेश्वराचा कायदा हा भविष्यसूचक आहे—जो देवावर प्रेम करतो आणि त्याच्या जीवनाने परिपूर्ण होतो, त्याच्यासाठी हा कायदा नैसर्गिकरित्या कार्यरीत होतो.

*“परंतु मी इस्राएलाच्या लोकांबरोबर करार स्थापित करेन तो असा प्रभू जाहीर करतात, त्या वेळेनंतर मी माझे नियम त्यांच्या मनात ठेवेन, आणि ते त्यांच्या हृदयावर लिहेन मी त्यांचा परमेश्वर होईन, आणि ते माझे लोक होतील.” - इब्रीलोकांस ८:१०*

मग कायदा एखाद्याच्या हृदयावर कसा लिहिला जातो? याचे उत्तर आहे – नाते संबंधांमधून. जेव्हा एखादी व्यक्ती परमेश्वराला ओळखते, त्याच्यावर प्रेम करू लागते आणि त्याच्या आत्म्याची विनंती करते, तेव्हा परमेश्वराचा आत्मा त्या व्यक्तीचे हृदय बदलतो आणि मग हा कायदा त्या व्यक्तीच्या जीवनात स्वाभाविकपणे कार्य करू लागतो. हाच कायदा माणसाला खरी मुक्ती आणि स्वातंत्र्य देऊ शकतो.

पण मग आपण कायद्याकडे का अशा दृष्टीने पाहतो की तो आपल्यावर लादला गेला आहे आणि जर आपण तो मोडला तर देव आपल्याला शिक्षा करेल?

*"पापाने आज्ञांच्या योगे गैरफायदा घेऊन मला फसविले, आणि आज्ञांच्या द्वारे मला ठार मारले.” — रोमकर ७:११*

नियमशास्त्राद्वारे पापाने आपल्याला कसे फसवले जाते? पाप हे स्वतः कोणतीही व्यक्ती नाही जी आपल्याला फसवते, परंतु त्याची उत्पत्ती सैतानामध्ये झाली. पापाच्या माध्यमातून सैतानाने मानवजातीच्या दृष्टीने कायद्याचे स्वरूपच बदलून टाकले. त्याने हे कसे केले?

*“पण सर्प त्या स्त्रीला म्हणाला, “तुम्ही निश्चितच मरणार नाही, कारण परमेश्वराला हे माहीत आहे की ज्या दिवशी ते फळ तुम्ही खाल, त्या दिवशी तुमचे डोळे उघडतील आणि चांगले व वाईट यातील फरक तुम्हाला समजेल आणि तुम्ही परमेश्वरासारखे व्हाल.” — उत्पत्ती ३:४–५*

सैतानाने आदाम आणि हव्वेला असे समजावले की त्यांना जगण्यासाठी देवाची गरज नाही. त्याने त्यांना विश्वास दिला की त्यांचे जीवन त्यांच्यातच आहे आणि ते अमर आहेत. जोपर्यंत ते त्या झाडाचे फळ खात राहतील, तोपर्यंत ते मरणार नाहीत. जर सैतानाने सांगितलेले खरे असेल, तर मग देवाने दिलेल्या आज्ञा मनमानी आणि सक्तीच्या वाटतील. जर माणूस देवाशिवायही स्वतंत्रपणे अस्तित्व टिकवू शकत असेल, तर मग देवाने त्यांना मार्गदर्शन करणे किंवा एखादी गोष्ट करण्यास सांगणे म्हणजे सक्ती वाटेल.

या खोट्या कल्पनेच्या माध्यमातून सैतानाने नियमशास्त्राविषयीच्या आपल्या समजुतीला संपूर्णतः बदलले. जो कायदा मूलतः आशीर्वाद आणि मुक्ती देणारा होता, तो आता नियंत्रण आणि सक्ती वाटू लागला. मानवाने कायद्याकडे अशा दृष्टीने पाहायला सुरुवात केली की तो देवाने जबरदस्ती लादलेला नियमांचा संच आहे, आणि देव त्यावरून ठरवतो की कोण जिवंत राहील आणि कोण नाही.

ही चुकीची समज कायद्याच्या अंमलबजावणीसाठी नजर ठेवणे (surveillance), न्याय करणे आणि शिक्षा देणे यांची गरज निर्माण करते. पौल आपल्याला सांगतो की हा दोषी ठरवणारा न्याय आदामकडून आला आणि ख्रिस्त किंवा त्याच्या पित्याकडून नव्हे (रोमकर ५:१६).

म्हणूनच, सैतानाच्या राज्याची पायाभरणी या एका मोठ्या खोट्यावर झाली आहे–माणूस अमर आहे, किंवा अधिक स्पष्टपणे सांगायचे तर, त्याचा आत्मा अमर आहे. यामुळे देवाने सांगितलेले सत्य–की जर आपण आज्ञा न पाळता त्याच्यापासून दूर गेलो, तर आपण मृत्यू पावू–हे खोटे ठरते. यामुळे अशी स्थिती निर्माण होते की, माणसाचा मृत्यू होण्याचा एकमेव मार्ग म्हणजे देवाने स्वतः त्याचा न्याय करणे आणि शिक्षा करणे. हाच तो मुख्य विचार आहे, जिथून नियंत्रण, न्याय आणि शिक्षा यांचे मूळ आहे. या खोट्या शिक्षणाद्वारे सैतानाने देवाच्या कायद्यात विकृती निर्माण केली आणि अधर्माचे सिंहासन स्थापन केले.

*भ्रष्ट सिंहासन तुमच्याशी संघटित होईल काय, जे अन्यायी कायदे लागू करून दुर्दशा करतात? — स्तोत्रसंहिता ९४:२०*

जर परमेश्वराचा नियम आत्मिक असेल आणि तो जिवंत संबंध कसे कार्य करतात याचे प्रतिबिंब असेल, तर या संबंधांची वाढ आणि विकास होण्यासाठी त्यातील देवाण-घेवाणीची नोंद ठेवण्याची

काही व्यवस्था असणे आवश्यक आहे. कारण नाते म्हणजे परस्परांसोबतच्या आठवणींवर आधारलेली प्रक्रिया असते.

## धडा 12

# हृदयाच्या पाटीवर कोरलेले

मागील धड्यात आपण पाहिले की, देव आपला नियम आपल्या हृदयावर कोरतो आणि त्याच्या प्रेमाची तत्त्वे आपल्या मनात रुजवतो. कारण हा नियम आध्यात्मिक आहे आणि तो आपल्या आत्म्याशी संबंधित आहे.

देवाने जगाची रचना अशा प्रकारे केली आहे की, आपले एकमेकांशी झालेले सर्व संवाद आणि अनुभव आपल्यात साठवले जातात. आपले डोळे, कान आणि इतर संवेदना हे आपल्या आठवणी साठवणारे माध्यम आहेत. प्रत्येकाच्या हृदयात त्याच्या संपूर्ण जीवनाची नोंद असते. याच स्मृतींमुळे आपण एखादा चेहरा किंवा आवाज ओळखतो. याच गोष्टीचा प्रेषित पौल पुढीलप्रमाणे उल्लेख करतो -

*तुम्हीच आमचे पत्र, आमच्या अंत:करणांवर लिहिलेले, सर्व माणसांना कळलेले आणि त्यांनी वाचलेले असे आहात; शाईने नव्हे, तर सदाजीवी देवाच्या आत्म्याने कोरलेले, दगडी पाट्यांवर नव्हे तर 'मांसमय अंत:करणरूपी पाट्यांवर' 'कोरलेले', आमच्या सेवेच्या योगे तयार झालेले ख्रिस्ताचे पत्र, असे तुम्ही प्रसिद्ध आहात. – २ करिंथकर ३:२-३*

जेव्हा पौलाने सुवार्ता प्रचार केला आणि लोकांनी ते स्वीकारले, तेव्हा देवाच्या आत्म्याने त्यांच्या हृदयावर विश्वासाने मिळणाऱ्या न्यायाचा आनंद लिहिला. त्यामुळे त्यांच्यात परिवर्तन घडू लागले, आणि हा बदल त्यांच्या हृदयातच कायमचा कोरला गेला.

येशूने देवाच्या आत्म्याला "देवाची बोटे" असे संबोधले आहे. लक्ष द्या –

*"परंतु मी जर देवाच्या आत्म्याच्या साहाय्याने भुते काढत आहे तर देवाचे राज्य तुमच्यावर आले आहे." — मत्तय १२:२८*

*"परंतु जर मी देवाच्या बोटानी (finger of God) भुते काढतो, तर मग हे स्पष्ट आहे की, देवाचे राज्य तुमच्याकडे आले आहे." — लूक ११:२० (English NKJV)*

येशू स्वतःच्या बोटांनी आपल्या हृदयावर त्याचे जीवन लिहितो. देवाने आपल्याला दिलेल्या संवेदनांद्वारे ही नोंद आपल्या मनात कोरली जाते. आपण जे काही पहिले आहे, ते विसरू शकत नाही; आपण जे काही ऐकले आहे, ते पुसून टाकू शकत नाही. आपण आपल्या चुकीच्या कृती विसरण्याचा प्रयत्न करू शकतो, पण त्या आपल्या हृदयावर कायमच्या उमटलेल्या असतात.

जेव्हा आपल्याला चांगले अनुभव मिळतात, तेव्हा त्या आठवणी गोड राहतात. पण जेव्हा आपण देवाशी आणि एकमेकांशी असलेली नाती दुखावतो, तेव्हा त्या गोष्टी आपल्या हृदयावर खोल कोरल्या जातात.

*"यहूदाचे पातक लोखंडी खचरणीने, हिरकणीच्या टोकाने लिहिले आहे; त्यांच्या हृदयपटावर, त्यांच्या वेद्यांच्या शृंगांवर खोदले आहे." — यिर्मया १७:१*

येथे "हिरकणीचे टोक" म्हणजे एक टोचणारा काटा, जसा आपल्या विवेकबुद्धीचा आवाज. पापाची नोंद लोखंडी लेखणीने का केली जाते? कारण जर आपण चुकीचे काहीतरी करत असल्याची जाणीव होऊनही तेच करत राहिलो, तर त्याचा खोल प्रभाव आपल्या हृदयावर उमटतो आणि अपराधीपणाची भावना निर्माण होते.

पापाचा हा प्रभाव हळूहळू आपले हृदय कठोर करतो, आणि आपण पापाबाबत असंवेदनशील होतो. जितके अधिक पाप करतो, तितके आपले हृदय कठीण होत जाते.– शेवटी ते लोखंडासारखे कठोर होते.

आपल्या हृदयात या गोष्टी देवाने स्वतः कोरलेल्या आहेत, हे आपल्याला लक्षात ठेवायला हवे. आपण कृती करतो, पण देवाच्या आत्म्याने अशी योजना केली आहे की,आपल्या मनात सगळे काही उमटत राहते. देवाने हे आपल्याला आशीर्वाद देण्यासाठीच केले आहे, जेणेकरून चांगल्या आठवणी कायम आपल्यासोबत राहतील. देवाने आपल्याला दु:ख आणि अपराधाच्या ओझ्याखाली जगण्यासाठी असे केले नाही. पण जेव्हा आपण पाप करतो आणि त्याच्या आत्म्याच्या मार्गदर्शनाकडे दुर्लक्ष करतो, तेव्हा त्या आठवणी आपल्या हृदयात कोरल्या जातात. जितके आपण सत्य नाकारतो, तितके आपले मन कठीण होते. शेवटी, फिरऔनप्रमाणे आपले हृदय पूर्णपणे कठोर होऊ शकते, म्हणजेच देवाच्या आत्म्यासाठी संपूर्ण संवेदना शून्य बनते.

यामुळे असे म्हणता येते की, देव पापी व्यक्तीला नष्ट करू शकतो.

*"लोहदंडाने तू त्यांना फोडून काढशील; कुंभाराच्या मडक्यासारखा त्यांचा चुराडा करशील." —स्तोत्र 2:9*

"लोखंडी दंड" म्हणजे कठोरपणाचा परिणाम. जर आपण सतत देवाच्या आत्म्याचा विरोध केला आणि बंडखोरीच्या मार्गाने गेलो, तर आपले अंतःकरण इतके कठीण होते की,आपण स्वतःच्याच विनाशाकडे

जातो. असे कठीण अंतःकरण अनेक अपराधांनी भरलेले असते, आणि अखेरीस देवाचा आत्मा आपल्यापासून पूर्णपणे दूर जातो. हे मन गरम लोखंडाने भाजल्यासारखे संवेदनाहीन होते.

*"आत्मा स्पष्ट म्हणतो की, पुढील काळात विश्वासापासून कित्येक लोक भ्रष्ट होतील; ज्या माणसांची सदसद्विवेकबुद्धी तर डाग दिल्यासारखीच आहे, अशा खोटे बोलणाऱ्या माणसांच्या ढोंगाने ते फुसलावणाऱ्या आत्म्यांच्या व भुतांच्या शिक्षणाच्या नादी लागतील" —1 तीमथ्य 4:1-2*

माझ्या जीवनात असे काही प्रसंग आले, जेव्हा पाप करण्याचा मोह झाला, आणि त्यावेळी अंतःकरणात एक उष्णतेसारखी भावना जाणवली. आत्म्याचा विरोध करणे सोपे नसते; त्यासाठी प्रयत्न करावा लागतो. पण जर आपण हे वारंवार करत राहिलो, तर आपले हृदय हळूहळू कठीण होते आणि शेवटी ठिसूळ होऊन तुटून जाते.

यावरून दिसते की, प्रत्येक व्यक्तीच्या हृदयात त्याच्या जीवनाची एक नोंद तयार होत असते. हि नोंद कोणीही नाकारू शकत नाही, कारण ती आपण स्वतःच लिहिलेली असते. हि नोंद कागदावर नाही, तर आपल्या अस्तित्वातच कोरली जाते. त्याचप्रमाणे, स्वर्गातही आपल्या कृतींची नोंद ठेवली जाते. मात्र ती एखाद्या भौतिक पुस्तकात नसून, ती देवाच्या स्वतःच्या हातांवर कोरलेली असते.

*"पाहा, मी तुला आपल्या तळहातांवर कोरून ठेवले आहे; तुझे कोट नित्य माझ्या दृष्टीसमोर आहेत." —यशया 49:16*

याचे कारण म्हणजे, आपले प्रत्येक कृत्य देवाच्या उपस्थितीत घडते. आपण काय करतो, हे तो पाहतो, अनुभवतो आणि जसे ते आपल्या हृदयात उमटते तसेच त्याच्या हृदयातही कोरले जाते. जसे एखादा पालक आपल्या मुलांची आठवण काळजीपूर्वक मनात ठेवतो, तसेच देव आपल्या आठवणी आपल्या हृदयात जपत असतो—फरक इतकाच की त्याचे प्रेम अमर्याद आहे.

*"पाच चिमण्या दोन दमड्यांना विकतात की नाही? तरी त्यांच्यापैकी एकीचाही देवाला विसर पडत नाही. फार तर काय, तुमच्या डोक्याचे सर्व केसही मोजलेले आहेत. भिऊ नका; तुम्ही अनेक चिमण्यांपेक्षा मूल्यवान आहात." —लूक 12:6-7*

आपला स्वर्गीय पिता आणि तारणारा आपल्या कृतींची नोंद शिक्षा देण्यासाठी ठेवत नाहीत, तर ती प्रेमाने जपतात, कारण त्यांना आपल्याशी सतत जुडून राहायचे असते. आपले जीवन त्याच्या हातात आहे.आणि म्हणूनच तो आपल्याला जपण्यासाठी त्याच्या हृदयात आपली परिपूर्ण नोंद ठेवतो. म्हणूनच, जे लोक हे समजतात त्यांच्यासाठी हे सत्य आहे की, देवाने आधीच आपल्याला स्वर्गीय जागी ख्रिस्त येशूमध्ये स्थान दिले आहे.

*"आणि ख्रिस्त येशूच्या ठायी त्याच्याचबरोबर उठवले व त्याच्याचबरोबर स्वर्गात बसवले" —इफिस 2:6*

आपल्या जीवनाची नोंद जी ख्रिस्ताच्या हृदयात आहे, ती आपण स्वतःच तयार करतो. देव आपल्याला त्याच्या हृदयात हि नोंद कोरू देतो. म्हणूनच आपण देवाच्या तळहातावर कोरलेलो आहोत. देव आपला जीवनवृत्तांत एखाद्या न्यायाधीशासारखा नोंदवत नाही, तर जसे कोणी आपल्याला प्रिय व्यक्तीला आठवणीने जपत असतो, तसेच प्रेमाने आपले संपूर्ण जीवन जपतो.

*"हे परमेश्वरा, माझ्या देवा, तू आमच्यासाठी केलेली अद्भुत कृत्ये व आमच्याविषयीचे तुझे विचार पुष्कळ आहेत; तुझ्यासमोर त्यांची क्रमवार मांडणी करता येणार नाही; मी ते सांगू लागलो तर ते माझ्या गणनेपलीकडे आहेत." —स्तोत्र 40:5*

हीच ती कारणे आहेत की,ख्रिस्त समोर आलेल्या लोकांच्या हृदयातील विचार ओळखू शकत होता. देव आपल्यावर नजर ठेवतो, पण ते आपल्याला न्याय किंवा दोषी ठरवण्यासाठी नाही; तर तो आपल्यावर प्रेमाने लक्ष ठेवतो, आपल्याबद्दल दररोज विचार करतो आणि आपल्याला आशीर्वाद देण्याची इच्छा बाळगतो. जेव्हा व्यभिचाराच्या अपराधात पकडलेली स्त्री ख्रिस्तासमोर आली, तेव्हा तो तिथे उपस्थित असलेल्या लोकांच्या हृदयातील नोंदी वाचू शकत होता आणि तो त्यांना त्याची जाणीव करून देत होता. एकदा त्याच्या उपस्थितीत आल्यानंतर, ते त्या नोंदी लपवू शकत नव्हते किंवा आपल्या स्मरणातून त्या मिटवू शकत नव्हते. ख्रिस्ताने जमिनीवर जे काही लिहिले, ते त्यांच्या हृदयात आधीच देवाच्या बोटांनी कोरले गेले होते आणि त्यांच्या स्वतःच्या संमतीनेच त्यावर शिक्कामोर्तब झाले होते.

म्हणूनच जेव्हा देव स्वर्गात पुस्तके उघडतो, तेव्हा तो प्रत्यक्षात लोकांच्या हृदयात डोकावत असतो. आपण वापरतो तशा भौतिक स्वरूपातील पुस्तकांची त्याला गरज नाही, कारण त्याचा न्याय हा शारीरिक गोष्टींवर नाही, तर हृदय आणि मनाशी संबंधित आत्मिक गोष्टींवर आधारित आहे, ज्या आपल्या कृतीतून प्रकट होतात.

देव आपल्यावर लक्ष ठेवतो, पण ते आपल्याला दोषी ठरवण्यासाठी नव्हे, तर आपल्या भल्यासाठी. तो दररोज आपल्याबद्दल प्रेमाने विचार करतो आणि आपल्याला आशीर्वाद द्यायला इच्छुक असतो. हेच कारण आहे की, आपल्या वागणुकीची नोंद त्याच्या हृदयातच साठवली जाते. जेव्हा आपण देवाविरुद्ध पाप करतो, तेव्हा आपण जणू लोखंडी लेखणीने ख्रिस्ताच्या शरीरात वेदनादायक नोंद काढतो आणि त्याला पुन्हा एकदा क्रूसावर खिळतो.

*"ते जर पतित झाले तर त्यांना* पश्चाताप *होईल असे त्यांचे पुन्हा नवीकरण करणे अशक्य आहे; कारण ते देवाच्या पुत्राला स्वतःपुरते नव्याने वधस्तंभावर खिळतात व त्याचा उघड अपमान करतात." — हिब्रू 6:6*

इतक्या छळानंतरही, देवाच्या लोकांमध्ये सूड घेण्याची भावना होती — त्यांना वाटत होतं, देवाने आता त्यांच्या शत्रूंना नष्ट केलंच  पाहिजे. या सगळ्या इतिहासाकडे पाहताना, आपली क्रूरता, कठोरता आणि राग आपल्याला मानवी मनाचं खरं स्वरूप कळतं. मंडळीमध्ये विचारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सक्ती वापरणाऱ्या सुरुवातीच्या लोकांना जसं की ऑगस्टिन — ह्यांना कल्पनाही नसावी की यामुळे किती भयंकर काळ सुरू होईल.

देवाने हे सगळं होऊ दिलं कारण तो आपल्याला शिकवू इच्छित होता. केवळ सांगून उपयोग झाला नसता. जसं एक मूल आईबाबांच्या सांगण्यावर विश्वास ठेवत नाही, जोपर्यंत तो स्वतः गरम भांडे हाताने स्पर्श करत नाही — तसंच आपल्यासोबत आहे. म्हणूनच देवाने पापाचं बीज वाढू दिलं, जेणेकरून सगळ्या सृष्टीला त्याचा परिणाम कळावा — सैतानाच्या दाव्यांत कोणताही आधार नाही, आणि म्हणूनच देव म्हणतो:

*"याहवेहच्या विरुद्ध ते जे काही कारस्थान करतात त्याचा ते अंत करतील; ते संकट दुसऱ्यांदा येणार नाही." — नहूम 1:9*

फिलदेल्फियाची मंडळी म्हणजे बंधुभावाच्या प्रेमाने भरलेली मंडळी होती. ही मंडळी आकाराने छोटी, शक्तीने दुर्बल असली, तरी सत्यावर ठाम उभी होती आणि तिच्या सदस्यांत प्रेम भरपूर होतं. येशूने त्यांना म्हटलं — "मी तुझ्या शत्रूंना तुझ्या पायांपाशी येऊन नतमस्तक करीन." यामध्ये त्यांच्या अंतःकरणात असलेल्या ओळख मिळवण्याच्या आणि आदर प्राप्त करण्याच्या इच्छेचं प्रतिबिंब आहे. जेव्हा एखादी

मंडळी लहान, दुर्बल आणि सतत दुर्लक्षित असते, तेव्हा मान्यता मिळवण्याची आस अधिक तीव्र होते. येशू अशा लोकांना त्यांच्या  समजूतीनुसार आश्वासन देतो — की त्यांच्या शत्रूंना लवकरच त्यांच्या चुका मान्य कराव्या लागतील आणि अन्याय भरून निघेल. ही न्यायाच्या भाषेत दिलेली दिलासा देणारी प्रतिज्ञा आहे.

1844 पर्यंतच्या काळात, म्हणजे फिलदेल्फियाच्या मंडळीच्या युगात, लोकांना स्वतःच्या अंतर्मनात काय आहे, याची जाणीव नव्हती. त्यांनी पवित्र स्थळ शुद्ध होईल या घटनेचा अर्थ असा लावला की येशू आता परत येणार आणि जगाचा न्याय करणार. म्हणजेच, देव शेवटी आपल्याला योग्य ठरवेल आणि ज्यांनी आपल्यावर अन्याय केला, त्यांना शिक्षा होईल. पण जेव्हा 1844 मध्ये काहीच घडलं नाही, तेव्हा त्या विश्वासू समूहाला जबरदस्त निराशा झाली — ज्याला महान निराशा म्हणून ओळखलं जातं. देव या प्रसंगाचा उपयोग लोकांनी स्वतःच्या न्यायप्रिय वागणुकीकडे नजर वळवावी यासाठी करु इच्छित होता. पण दुर्दैवाने, अनेकांनी विश्वासच सोडून दिला आणि त्यांच्यातील ती दोषपूर्ण वृत्ती – इतरांचा न्याय करणारी, दंडात्मक मनोवृत्ती – तशीच राहिली. ही अंतर्मुख होण्याची वेळ होती, पण ती वाया गेली. म्हणूनच, देवाने अखेरच्या काळात या दोषपूर्ण वृत्तीचं संपूर्ण रूप उघड करून त्यावर उपाय होण्यासाठी लावदिकीया मंडळीची योजना केली.

लावदिकीया म्हणजे लोकांचा न्याय. ही अखेरची मंडळी आहे आणि याच काळात मानवी स्वभावातील "न्याय करण्याची वृत्ती" शिंगाला पोहोचते. देव जगाला संदेश देतो की, न्याय सुरू झाला आहे. याचा अर्थ असा की देव आता त्याच्या न्यायासनावर बसून, ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्यांच्या जीवनाचा आढावा घेतो.

पण लोक हा न्याय कसा समजून घेतात, हे त्यांच्या देवाच्या स्वरूपाबद्दलच्या समजुतीवर अवलंबून असतं. जर कोणी देवाला एक कठोर न्यायाधीश किंवा दोष सिद्ध करणारा हुकूमशाह समजत असतील, तर तो इतरांशीही तसाच वागतो — दोष शोधणारा, शिक्षेची भीती दाखवणारा. लावदिकीया मंडळी स्वतःला “आपण समृद्ध आहोत, काहीच कमी नाही” असं मानते, आणि त्यामुळे इतरांपेक्षा श्रेष्ठ असल्याचा गर्व बाळगते.

न्याय करण्याची जी वृत्ती आपल्या मनात असते, तिच्यामुळंच देवाला आपल्याला आपलं अंतःकरण दाखवावं लागतं. आपण जसा देवाचा विचार करतो—एक असा कठोर न्यायाधीश जो सत्य न मानणाऱ्यांना दोषी ठरवतो आणि शिक्षा करतो—तसाच देव आपल्याला भासतो. पण जे लोक देवाच्या खऱ्या स्वभावाला ओळखतात, त्यांना खात्री असते की देव हा आपल्या विरोधात सैतानाने केलेल्या आरोपांपासून आपलं रक्षण करणारा आहे. हे आरोप कधी आपल्याच मनात येतात—"तू खूप पापी आहेस, तू कधीही बदलू शकणार नाहीस"—तर कधी मंडळीमधून, जेव्हा काही लोक देवाच्या स्वभावावर येणाऱ्या नव्या प्रकाशाला धोकादायक समजतात.

1844 मध्ये सुरू झालेल्या न्यायप्रक्रियेचा खरा हेतू होता, देवाच्या लोकांनी स्वतःच्या मनाकडे बघणं—आपल्या आत काय चाललं आहे ते ओळखणं. कारण खरं तर, आपल्याला असं वाटतं की कठोर न्यायच हवा आहे, आणि हाच मार्ग आहे सगळं एका ठिकाणी आणण्याचा. पण प्रत्यक्षात, 1844 पासून न्यायाचा विषय देवाच्याच स्वभावावर केंद्रित आहे. प्रकटीकरण 14:7 मधले शब्द दोन्ही प्रकारे वाचले जाऊ शकतात:

*तो मोठ्या आवाजात म्हणाला, "परमेश्वराचे भय धरा व त्यांना गौरव द्या! कारण त्यांनी न्यायनिवाडा करावा अशी वेळ आता आली आहे. ज्यांनी आकाश, पृथ्वी, समुद्र आणि पाण्याचे झरे निर्माण केले, त्यांची उपासना करा." - प्रकटीकरण 14:7*

"त्यांनी न्यायनिवाडा करावा अशी वेळ आता आली आहे "—म्हणजे न्याय करणारा कोण? देव? की आपण? येशूने स्वतः म्हटलंय की, देव कोणाचाही न्याय करत नाही. म्हणून मग आपणच त्याचा न्याय करतो. आणि आपण देवाला जसा समजतो, तसंच आपल्याला वाटतं की तो आपल्यावर न्याय करतो.

*"जर काहीजण अविश्वासू होते तर मग काय? त्यांचा अविश्वासूपणा हा परमेश्वराच्या विश्वासूपणाला रद्द करेल का? 4नक्कीच नाही! प्रत्येक मनुष्य लबाड असला तरी परमेश्वर खरेच आहेत. यासंबंधी असे लिहिले आहे" - रोमकरांस 3:3–4*

मग तू देवाचा कसा न्याय करतोस? तुला वाटतं का की देव शिक्षा करणारा आहे? दोषी ठरवणारा आहे? जो पाप्यांचा नाश करतो? की तो येशूसारखा आहे—दयाळू, करुणावान, शत्रूंवर प्रेम करणारा, आणि ज्या लोकांनी आपल्यावर अन्याय केला आहे त्यांच्यावरही भले करणारा? तू देवाला जसा पाहतोस... तसाच तुला न्याय वाटतो.

**धडा 17**

# चमकती नदी की अग्निमय ज्वाला?

दानीएल ७ हे प्रकरण आपल्याला देवाकडे अशा न्यायाधीशासारखं पाहायला लावतं, जो वाईट करणाऱ्यांना शिक्षा देतो आणि नाश करतो. या दृष्टांतात एकामागोमाग येणारी साम्राज्यं दाखवलेली आहेत—जी जगावर सत्ता गाजवतात आणि इतरांना जिंकतात. त्यानंतर एक 'लहान शिंग' समोर येतं, जे रोममधून उगम पावलेल असतं—याचे आपण दोन अध्यायांपूर्वी वर्णन पाहिलं होतं.

*"या शिंगांविषयी मी विचार करीत असता, त्या शिंगांमध्ये आणखी एक लहान शिंग उगवले आणि आधीच्या शिंगांपैकी तीन शिंगांना या नव्या शिंगाने मुळासकट उपटून टाकले. या शिंगाला माणसासारखे डोळे होते आणि बढाई करणारे तोंडही होते." – दानीएल ७:८*

मग या 'लहान शिंगाने' अशी कोणती मोठेपणाची वाक्यं बोलली होती?

"पोप इतक्या मोठ्या दर्जाचा आणि उंच स्थानावर आहे की तो फक्त एक सामान्य मनुष्य नसून, जणू काही तोच देव आहे आणि देवाचा प्रतिनिधी आहे..." (अनुवादित – ल्युसियस फेरारिस, "पापा II," प्रोम्प्टा बायब्लिओथेका, खंड ६, पृ. २५-२९)

पेत्र आणि त्यांचे उत्तराधिकारी (म्हणजे पोप) यांना नियम बनवण्याचा, काही गोष्टी सक्तीने पाळायला लावण्याचा किंवा काही गोष्टींवर बंदी घालण्याचा अधिकार आहे. त्याचप्रमाणे, गरज पडल्यास हे नियम रद्द करण्याचा किंवा त्यापासून सूट देण्याचाही अधिकार त्यांच्याकडे आहे. हेच लोक नियमांचं उल्लंघन झालं आहे का हे ठरवतात, शिक्षा देतात किंवा ती माफ करतात. या न्यायदायित्वामध्ये पाप माफ करण्याचाही अधिकार येतो. कारण पाप म्हणजे एका दैवी राज्याच्या नियमांचं उल्लंघन – आणि या दैवी राज्यात पोप हेच नेमलेले न्यायाधीश आहेत. – The Catholic Encyclopedia, खंड १२, लेख "Pope," पृष्ठ २६५

पोपने स्वतःला पृथ्वीवरील देव मानलं आणि असं जाहीर केलं की, त्यांच्या नियमांचं उल्लंघन करणाऱ्यांना ते न्याय देऊ शकतात आणि दोषी ठरवू शकतात. अंधःकाराच्या युगात पोपशाहीने (Papacy) 'इनक्विझिशन' नावाच्या संस्थेद्वारे लोकांवर लक्ष ठेवण्याचं आणि त्यांच्यावर खटले भरून शिक्षा देण्याचं काम केलं—ज्यामुळे तिच्या सत्तेखालील अनेक देशांमध्ये लाखो लोकांना मृत्युदंड देण्यात आला.

रोमन मंडळींचा देवाबद्दलचा दृष्टिकोन असा होता की, जो कोणी त्यांच्या ठरवलेल्या धर्मसिद्धांतांचे पालन करत नाही, त्याच्यावर देवाचा कठोर न्याय व्हावा. पण त्या काळात, ज्या

काळात त्याने "सर्वोच्च देवाच्या संतांना छळले," (दानीएल ७:२५) त्याच्या शेवटी दृष्टांताचे केंद्र बदलतं आणि स्वर्गातील दृश्य दिसू लागले.

*“जसे मी पाहिले, “सिंहासने मांडली गेली आणि प्राचीन पुरुष आपल्या आसनावर बसला आहे. त्याची वस्त्रे हिमासारखी शुभ्र होती; त्याच्या मस्तकावरील केस लोकरीप्रमाणे पांढरे होते. त्याचे सिंहासन अग्निज्वालायुक्त होते, आणि त्याच्या सिंहासनाची चाके प्रज्वलित केलेल्या अग्नीप्रमाणे होती. अग्नीची नदी निघून वाहत होती जी त्याच्यामधून बाहेर येत होती. हजारोच्या हजार लोक त्याची सेवा करीत होते; कोट्यावधी लोक त्याच्यासमोर उभे होते. न्यायालयाचे कामकाज सुरू झाले आणि पुस्तके उघडली गेली. – दानियेल ७:९-१०*

हे दृश्य जणू एखादं न्यायालय आहे. नोंदणीची पुस्तकं उघडली जातात, आणि स्वर्गातील देवदूत या घटनांचं साक्षीदार होण्यासाठी उपस्थित असतात. पण या सगळ्या दृश्यात ‘प्राचीन पुरुष’ काहीच बोलत नाही. दृष्टांत थेट पुढील प्रसंगाकडे जाते.

*“मग मी सतत त्याच्याकडे पाहत होतो कारण ते शिंग फुशारकीचे शब्द बोलत होते. मी सतत पाहत राहिलो जोपर्यंत चौथ्या पशूचे वध करण्यात आले नाही आणि त्याचे शरीर अग्निज्वालांमध्ये फेकण्यात आले नाही. (इतर पशूंचे अधिकार काढून घेण्यात आले, परंतु त्यांना आणखी काही काळ जिवंत राहण्याची परवानगी देण्यात आली.) – दानियेल ७:११-१२*

ऐकताना असं वाटतं की देवाने त्या लहान शिंगाच्या वागणुकीवर न्याय केला, तिला दोषी ठरवलं आणि शेवटी तिचा नाश करून तिला आगीत टाकलं. पण यात एक महत्त्वाची गोष्ट आहे–पिता काहीच बोलत नाही. त्यामुळे आपल्याला येथे पित्याच्या स्वभावाचं आकलन करण्यासाठी आमंत्रित केलं जातं. हे अगदी येशूने आपल्या शिष्यांशी कसा वागलं, त्यासारखंच आहे.

*एक कनानी स्त्री त्या भागातून येशूंकडे आली आणि त्यांना विनवणी करून म्हणाली, “प्रभू, दावीद राजाचे पुत्र, माझ्यावर दया करा! माझी मुलगी भूतग्रस्त झाली असून, ती पुष्कळ छळ सहन करीत आहे.” पण येशूंनी एका शब्दानेही तिला उत्तर दिले नाही; तेव्हा त्यांच्या शिष्यांनी त्यांना विनंती केली, “प्रभूजी, तिला पाठवून द्या, कारण ती आपल्यामागे सारखी ओरडत येत आहे.” – मत्तय १५:२२-२३*

येशू जेव्हा गप्प बसतो, तेव्हा शिष्य त्याच्या मौनाचा अर्थ असा लावतात की येशू त्या स्त्रीला नकार देतो. खरंतर, येशूचं मौन हे त्यांचे अंतःकरण उघड करण्यासाठी होतं.

*तुम्ही बसून आपल्या भावाविरुद्ध साक्ष देता आणि आपल्या सख्ख्या भावाची निंदा करता. तुम्ही हे करीत असता मी गप्प राहिलो, तेव्हा तुम्हाला वाटले की मी तुमच्यासारखाच आहे, परंतु आता तुम्हाला शासन करण्याचा काळ आला आहे; तुमचे आरोप मी तुमच्यापुढे ठेवणार. स्तोत्रसंहिता 50:20-21*

हीच गोष्ट दानियेल ७ मध्ये घडते. स्वर्गातील दृश्यात पिता काही बोलत नाही, पण घडणाऱ्या घटनांमधून एक गोष्ट स्पष्ट होते–त्या लहान शिंगाने जे गर्विष्ठ शब्द उच्चारले, त्याचमुळे त्या शवपदाचा शेवटी नाश होतो.

*"मग मी सतत त्याच्याकडे पाहत होतो कारण ते शिंग फुशारकीचे शब्द बोलत होते. मी सतत पाहत राहिलो जोपर्यंत चौथ्या पशूचे वध करण्यात आले नाही आणि त्याचे शरीर अग्निज्वालांमध्ये फेकण्यात आले नाही." – दानीएल ७:११*

दानीएल ७ मधील लहान शिंग, प्रकटीकरण १७ मध्ये एका स्त्रीच्या रूपात दाखवलं आहे जी एका श्वापदावर बसलेली आहे. वधू हे प्रतीक मंडळींचे आहे (यिर्मया ६:२), आणि श्वापद हे राजकीय शक्तीचं प्रतीक आहे. त्या श्वापदावर दहा शिंगं म्हणजे पृथ्वीच्या अखेरीस उभे राहणारे दहा राजे.

पण खरा प्रश्न असा आहे–ही स्त्री नष्ट कशी होते? आणि कोण तिचा नाश करतो?

*तो पशू व जी दहा शिंगे तू पाहिली, ते वेश्येचा द्वेष करतात; ते तिच्यावर हल्ला करतील आणि तिला नग्न करून तिचे मांस खातील व तिला अग्नीने जाळून टाकतील. – प्रकटीकरण १७:१६*

आपण पाहतो की लहान शिंग आणि पशुवर बसलेली स्त्री–या दोघांचाही शेवटी आगीत नाश होतो. पण हे देव करत नाही. हे पृथ्वीवरील राजे करतात. ही स्त्री म्हणजे लहान शिंगाचंच दुसरं रूप आहे. याचा अर्थ असा की, देव लहान शिंगाचा नाश करत नाही, ती स्वतःच आपल्या गर्विष्ठ आणि अहंकारी बोलण्यामुळे नष्ट होते.

*याहवेहची नीतिपूर्ण कृत्ये हीच त्यांची ओळख आहे; दुष्ट स्वतःच्याच हस्तकर्माच्या सापळ्यात अडकले आहेत – स्तोत्र ९:१६*

*म्हणून मी त्यांच्यावर माझा क्रोध ओतेन आणि माझ्या कोपाग्नीने त्यांना भस्म करेन त्यांनी जे काही केले ते मी त्यांच्याच माथ्यावर आणेन, असे सार्वभौम याहवेह जाहीर करतात." – यहेज्केल २२:३१*

देव आपला "क्रोध" कसा कार्यरत करतो हे अगदी स्पष्ट करून सांगतो—जे निर्णय माणसं, संस्था किंवा राष्ट्रं घेतात, ते शेवटी त्यांच्यावरच परत येतात. देव जबरदस्ती करत नाही. तो घटनांना त्यांच्या नैसर्गिक मार्गाने घडू देतो, जोपर्यंत माणूस स्वतःच आपल्या पेरलेल्या गोष्टींचं पीक कापतो.

*फसविले जाऊ नका; परमेश्वराचा उपहास करू शकत नाही. कारण मनुष्य जे पेरतो तेच कापतो! जो देहाकरीता पेरतो, त्याला देहापासून नाशाचे पीक मिळेल, परंतु जो कोणी पवित्र आत्म्याला संतुष्ट करण्यासाठी पेरतो त्याला पवित्र आत्म्यापासून सार्वकालिक जीवनाचे पीक मिळेल. – गलातीकरांस ६:७-८*

जसं परुशी लोकांनी एका स्त्रीला येशूकडे आणलं आणि त्याच्याकडून निर्णय मागितला, तेव्हा येशू काहीच बोलला नाही—फक्त जमिनीवर काही लिहीत राहिला. तसंच प्राचीनकालीन म्हणजे देव—दानीएल ७ मध्येही काहीच बोलत नाही. तो फक्त शांतपणे लोकांच्या अंतःकरणावर त्यांच्या कृतीचं प्रतिबिंब उमटवतो—जणू त्यांनी स्वतःच समजून घ्यावं की ते काय करत आहेत. त्यांना पश्चात्ताप करण्याची संधी असते. पण जर त्यांनी ती गमावली, तर ते स्वतःच स्वतःचा नाश करतात.

आपण जेव्हा देवाच्या सिंहासनाचं दृश्य पाहतो, तेव्हा आपल्या मनात एक चित्र तयार होतं—जसं देव न्याय देतोय, गुन्हेगारांना शिक्षा करतोय. म्हणूनच जेव्हा त्या सिंहासनाकडून अग्नी निघतो, तेव्हा आपल्याला वाटतं की हा अग्नी दुष्टांवर कोप करून त्यांना शिक्षा देण्यासाठी पाठवलेला आहे.

*"अग्नीची नदी निघून वाहत होती जी त्याच्यामधून बाहेर येत होती." – दानिएल ७:१०*

*"अग्नीची नदी" या वाक्याचा अर्थ "तेजस्वी नदी" असाही होतो. हे आपल्याला इतर सिंहासन दृश्यांशी जोडते.*

*"त्याचप्रमाणे राजासनापुढे स्फटिकासारखे स्वच्छ आणि काचेच्या समुद्रासारखे दिसणारे असे काहीतरी होते." – प्रकटीकरण ४:६*

*"मग देवदूताने मला जीवनाच्या पाण्याची नदी दाखविली. तिचे पाणी स्फटिकासारखे नितळ होते." – प्रकटीकरण २२:१*

देवाच्या सिंहासनातून वाहणारी ही नदी म्हणजे जीवन देणारी तेजस्वी नदी आहे. जिथे ही नदी वाहते, तिथे जीवन फुलतं.

*"जिथे पाणी वाहील, तिथे जिवंत प्राण्यांचे थवे राहतील."  – यहेज्केल ४७:९*

या सिंहासनाच्या दृश्यात, देव पित्याचं मौन आपल्याला एक प्रश्न विचारतं–"तो या परिस्थितीला कसा हाताळतो?" "त्याच्या न्यायाची वेळ आली आहे" (प्रकटीकरण १४:७) हे वाक्य आपल्याला सूचित करतं की आपणच त्या क्षणी देवाच्या स्वभावाचा निर्णय करत आहोत. आपण देवपित्याला येशूच्या शब्दांमधून (योहान ५:२२) पाहतो का? की मग आदामाकडून मिळालेल्या दोष लावणाऱ्या स्वभावातून पाहतो? (रोमकरांस ५:१६)

आपल्याला मागील अध्यायात सांगितल्याप्रमाणे, येशूच्या पृथ्वीवरील कार्यानंतर थोड्याच काळात मंडळीमध्ये "न्यायाची भावना" आली. सैतानाने शेवटी मंडळीमध्ये आपली जागा घेतली आणि विश्वासू लोकांवर दोष ठेवायला सुरुवात केली.

दानिएल ७ मधील न्यायाच्या दृश्यात, देव स्वतःच्या लोकांचं लहान शिंगाने लावलेल्या आरोपांपासून संरक्षण करतो.

*"मी पाहिले की, हे शिंग पवित्र लोकांशी युद्ध करीत आहे आणि त्यांचा पराभव करीत राहिले, जोपर्यंत सनातन पुरुष येईपर्यंत आणि परमोच्च परमेश्वराच्या पवित्र लोकांच्या बाजूने निर्णय घोषित होईपर्यंत, त्यांनी राज्य ताब्यात घेण्याची वेळ आली." – दानिएल ७:२१-२२*

न्याय हा देवाच्या लोकांच्या अंतःकरणांची परीक्षा घेतो. देव न्यायाधीश म्हणून बसतो, ही कल्पना अनेकदा माणसांच्या स्वभावानुसार म्हणजे दुसऱ्यांना दोष देण्याची आणि शिक्षा करण्याची इच्छा, देवावर लादली जाते. आपल्याला वाटतं की आपले शत्रू दंडित व्हावेत, त्यामुळे आपल्याला देवही त्यांना शिक्षा देईल असं वाटतं. पण देव तसा नाही. तो कोणावरही खटला चालवत नाही, उलट आपल्या विश्वासू मुलांना सैतानाच्या आरोपांपासून तो वाचवतो.

सैतान दिवसरात्र त्यांच्यावर आरोप करतो. तो त्यांचं मन दोषांनी भरून टाकतो. संत देवाकडे प्रार्थना करतात की या आरोपांपासून त्यांची सुटका होईल.

देवाचे लोक देवाकडे कृपा आणि सामर्थ्यासाठी पुकारा करतात, किंवा मग काही जण देव त्यांच्या बाजूने इतरांवर न्याय करेल अशी कल्पना करून, स्वतःच दुसऱ्यांवर दोष ठेवायला लागतात. या न्यायाच्या प्रसंगात तू काय निवडशील?

"त्या लहान शिंगाने" सतत इतरांवर न्याय केला, त्यांच्यावर आरोप ठेवले – आणि शेवटी त्याच शब्दांनी आणि कृतींनी त्याच्यावरच न्याय झाला, तो दोषी ठरला आणि नष्ट झाला. देवाला फसवता येत नाही. माणूस जर दोष देणं आणि शिक्षा करण्याची बीजं पेरतो, तर शेवटी त्यालाच तसंच भोगावं लागतं. म्हणून येशू म्हणतो, "कोणावरही न्याय करू नका," म्हणजे तुमच्यावरही न्याय होणार नाही (मत्तय ७:१). या न्यायप्रक्रियेत आपण कोणती भूमिका घ्यायची हे आपल्या हाती आहे.

जसा तू न्याय करशील... तसंच तुला न्याय दिला जाईल.

**धडा 18**

# दुष्टशक्तीचे भाष्य

ख्रिस्ताच्या मृत्यूपूर्वी, त्याने अतिशय वेदनेने हे शब्द उच्चारले:

*"एली, एली, लेमा सबक्तनी?" (म्हणजेच: “माझ्या देव, माझ्या देव, तुम्ही माझा त्याग का केलास?”) – मत्तय २७:४६*

येशूने इथे जे शब्द वापरले ते अरामी भाषेत होते, हिब्रू नव्हे. त्यामुळे अनेक लोकांचा असा समज झाला की येशू मुख्यतः अरामीत बोलत असे. The Passion of the Christ या मेल गिब्सनच्या चित्रपटातही हेच दाखवण्यात आलं आहे.

पण अनेक पुरावे असे सांगतात की येशूच्या काळात हिब्रू भाषाही बऱ्यापैकी वापरली जात होती. याचा एक उदाहरण म्हणजे येशूच्या क्रुसावर लावलेला फलक, ज्यावर तीन भाषांमध्ये मजकूर लिहिलेला होता.

*पिलाताने त्यांच्या क्रूसावर एक लेखपत्रक लावले, ते असे होते: यहूद्यांचा राजा, नासरेथकर येशू. अनेक यहूद्यांनी हे पत्रक वाचले, कारण येशूंना ज्या ठिकाणी क्रूसावर खिळले होते ते ठिकाण शहराच्या जवळ होते आणि क्रूसावरील लेख हा हिब्रू, लॅटिन व ग्रीक भाषांमध्ये लिहिलेला होता. – योहान १९:१९-२०*

पॉलनेही काही प्रसंगी लोकांना थेट हिब्रू भाषेत संबोधित केलं होतं:

*"सेनापतीची परवानगी मिळाल्यावर, पौल पायऱ्यांवर उभा राहिला आणि लोकांनी शांत राहवे, असे त्याने हाताने खुणावले. ते सर्व शांत झाल्यावर, तो इब्री भाषेत म्हणाला" – प्रेषितांची कृत्ये २१:४०*

जेव्हा येशू दमास्कस च्या रस्त्यावर जात असताना पौलाशी बोलला, तेव्हा त्याने हिब्रू भाषेत संवाद साधला:

*"आम्ही सर्वजण जमिनीवर पडलो, तेव्हा अरामी भाषेत बोलणारी वाणी मी ऐकली. ‘शौला, शौला, तू माझा छळ का करीत आहेस? पराणीवर लाथ मारणे तुला हानिकारक आहे." – प्रेषितांची कृत्ये २६:१४*

गब्बाथा आणि गोल्गोथा यांसारख्या ठिकाणांची ओळखही "हिब्रू भाषेत" असल्याचं बायबलमध्ये नमूद आहे (योहान ५:२; १९:१३, १७; प्रकटीकरण ९:११; १६:१६).

पण एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे – काही आधुनिक बायबल भाषांतरांमध्ये ‘हिब्रू’ या ग्रीक शब्दाचा अर्थ बदलून तो ‘अरामीक’ असा लावण्यात आला आहे.

*उदाहरणार्थ, "आम्ही सर्वजण जमिनीवर पडलो, तेव्हा अरामी भाषेत बोलणारी वाणी मी ऐकली."*
*– प्रेषितांची कृत्ये २६:१४*

बायबल भाषाशास्त्रज्ञ असं सांगतात की येशूच्या काळात हिब्रू भाषा सर्वसामान्य वापरातून बाहेर पडली होती, म्हणूनच "हिब्रू भाषा" म्हणजे प्रत्यक्षात अरामीक असं गृहित धरलं गेलं. पण ही भूमिका घेतल्याने बायबलमधील मूळ संदर्भाचा आणि भाषेचा अर्थच बदलतो. हिब्रू आणि अरामीक या भाषा वेगळ्या आहेत, आणि जेव्हा शास्त्रवचनांचे भाषांतर केलं जातं, तेव्हा ते हिब्रू भाषेतच केलं जातं – कारण अरामी भाषेत (तोराह) शास्त्रवचन नव्हतेच.

यामुळे परिस्थिती अधिक रंजक होते, विशेषतः जेव्हा आपण पाहतो की यहुदी लोक अरामी भाषेकडे कशा नजरेने पाहायचे...

यहुदी लोकांमध्ये हिब्रू आणि अरामीक या दोन भाषांमध्ये स्पष्ट फरक केला जात असे. हिब्रू भाषा ही केवळ शास्त्र आणि लेखनासाठीच नव्हे, तर दैनंदिन वापरासाठी आदर्श भाषा मानली जायची. मिश्नाहमध्ये असं म्हटलं आहे: "इस्राएल देशात अरामीक का वापरावी? पवित्र भाषा (हिब्रू) किंवा ग्रीक भाषा वापरा." साफ्राई आणि स्टर्न यांनी नमूद केल्याप्रमाणे, अरामीक भाषेला ना प्रतिष्ठा होती, ना लोकांची बांधिलकी. पण हिब्रू भाषेला दोन्ही गोष्टी होत्या – सन्मान आणि निष्ठा. तलमूदी काळातसुद्धा, जर शब्बाथ दिवशी एखादं अरामीक भाषेतील ग्रंथ आगीत सापडला, तर तो वाचवण्याची परवानगी नव्हती. पण तसाच ग्रंथ हिब्रू भाषेत असता, तर तो वाचवणं योग्य मानलं गेलं असतं. सभागृहात हिब्रू भाषेत धर्मग्रंथ वाचला जात असताना बाहेर जाणं चुकीचं समजलं जायचं, पण अरामीक वाचन होत असताना मात्र तसं करता यायचं. अरामीक भाषेत शास्त्र पाठ केलं, तरी ते अपूर्ण समजलं जायचं. पण जर कुणी हिब्रू भाषेतील वाचन फक्त ऐकलं, अगदी अर्थ न समजता, तरी त्याचं धार्मिक कर्तव्य पूर्ण झालं असं मानलं जायचं.

यहुदी लोकांसाठी हिब्रू हीच खरी "पवित्र भाषा" होती, तर अरामीक ही "वाईट शक्तींची भाषा" मानली जायची (झोहर ग्रंथानुसार). अरामीकला पूर्णपणे नाकारलं गेलं नव्हतं, पण तिला हिब्रूच्या तुलनेत दुय्यम स्थान होतं. हिब्रूला "पूर्वजांची भाषा" मानलं जात होतं आणि तीच दैनंदिन वापरासाठी योग्य भाषा समजली जायची. याच संदर्भात येरुशलेम तलमुद असं सांगतो:

"चार भाषा उपयोगी आहेत - ग्रीक संगीतासाठी, लॅटिन युद्धासाठी, अरामीक शोकगीतांसाठी, आणि हिब्रू बोलण्यासाठी."

अरामीक भाषेचं स्थान हे मुख्यतः “शोकगीतांसाठी” होतं. पण हिब्रू भाषेला दैनंदिन वापर आणि उपासनेसाठी अधिक महत्त्व दिलं जात होतं. त्यामुळे, एखाद्या यहुदी वडिलांनी जर आपल्या मुलाशी लहानपणापासून हिब्रूत संवाद साधला नाही आणि त्याला देवाचा नियम शिकवला नाही, तर तो मुलगा मेल्यासारखाच मानला जात असे. अरामीकविषयी रब्बींची मतं अगदी स्पष्ट होती. त्यांनी असा इशारा दिला होता:

“जो कोणी अरामीक भाषेत देवाकडे वैयक्तिक मागण्या मांडतो, त्याच्या प्रार्थनेकडे स्वर्गदूत लक्ष देत नाहीत, कारण त्यांना अरामीक भाषा समजत नाही.”

हे विधान बायबलमधील अधिकृत शिकवण नाही, पण यावरून हे लक्षात येतं की यहुदी शास्त्रज्ञांना अरामीकबद्दल किती नाराजी होती. तलमुदमध्ये यासंबंधी एक गोष्ट सांगितली आहे – गमालिएल (तोच गमालिएल, ज्याच्याकडे पौल शिकले होते - प्रेषितांची कृत्ये 22:3) मंदिराच्या अपूर्ण पायऱ्यांवर बसलेला होता.

त्याच वेळी कुणीतरी त्याला ईयोब पुस्तकाचं अरामीक भाषांतर (पहिलं आणि त्यावेळचं एकमेव तारगुम) दाखवलं. हे पाहून गमालिएल इतका नाराज झाला की त्याने त्या भाषांतराला “इमारतीच्या ढिगाऱ्याखाली गाडून टाक” असं सांगितलं. यावरून स्पष्ट होतं की येशूच्या काळातील जुदेयामध्ये, बायबलाचं अरामीक भाषांतर स्वीकारण्यास किती तीव्र विरोध होता.

जर अरामीक भाषा यहुदी लोक मृत व्यक्तीसाठी शोक व्यक्त करताना वापरत असतील आणि जर ती “दुष्ट शक्तीची भाषा” म्हणून ओळखली जात असेल, तर अशावेळी तिचा वापर म्हणजे एखाद्या अवांछित, अंधाऱ्या प्रभावाची उपस्थिती असल्याचं सूचक ठरतो.

जेव्हा येशू क्रूसावर होता, तेव्हा त्यांनी संपूर्ण जगाच्या पापांचं ओझं वाहिलं होतं. त्यांच्याभोवती दुष्ट लोकांची थट्टा चालू होती, आणि त्या क्षणी सैतान त्यांच्या मनात विचार भरवत होता की, “तुझ्या पित्याने तुला सोडलं आहे.” येशूने त्या वेळी अरामीक भाषेत उच्चारलेली वाक्य हे दर्शवतात की त्या अंधारलेल्या वेळेत ते एका परकीय, दुःखद आणि मृत्यूच्या भावनेखाली दबले गेले होते.

या संदर्भात, दानीएलच्या पुस्तकातील ७ वे अध्याय अरामीक भाषेत लिहिलेला आहे, तर ८ वा अध्याय हिब्रू भाषेत आहे—ही बाब खूपच महत्त्वाची वाटते.

दानिएल ७ मध्ये देवाकडे पाहण्याचा दृष्टिकोन जरा परकीय आणि भीतीदायक आहे. इथे न्याय, दोष आणि शिक्षेच्या परकाया भाषेतील विचारांतून देवाचं चित्र उभं राहतं. पण दानीएल ८ मध्ये जेव्हा न्यायाचं वर्णन केलं जातं, तेव्हा कुठलीही कोर्टासारखी दृश्यं नसतात. तिथं केवळ हे म्हटलं आहे:

*"तो मला म्हणाला, "यासाठी 2,300 संध्याकाळ आणि सकाळ लागतील; नंतर पवित्रस्थान शुद्ध करण्यात येईल." – दानीएल ८:१४ MRCV*

*तो मला म्हणाला, "दोन हजार तीनशे दिवस;1 त्यानंतर पवित्रस्थानाची शुद्धी होईल." – दानीएल ८:१४ MARVBSI*

*"तो मला म्हणाला, "हे सर्व दोन हजार तीनशे संध्याकाळ व सकाळ चालत राहणार नंतर वेदीची योग्य स्थापना होईल." – दानीएल ८:१४ IRVMAR*

पवित्रस्थानाच्या अतिपवित्र भागामध्ये दहा आज्ञा आणि व्यवस्थेच्या पुस्तकाशिवाय इतर कोणतीही नोंदवही नसते. त्या जागेत न्यायालयाची एकही प्रतिमा किंवा संकेत सापडत नाही. दानीएल २ ते ७ हे अध्याय अरामीक भाषेत लिहिले गेले आहेत, कारण या भागांमध्ये मुख्यतः राजकीय घटनांशी संबंधित भविष्यवाण्या आहेत आणि त्या काळात अरामीक ही सामान्य संवादाची भाषा होती. म्हणूनच या भागांचा अन्य जातीच्या लोकांशी अधिक संबंध आहे. दानीएल ७ मध्ये, देवाला न्यायाधीश म्हणून माणसाच्या दृष्टीकोनातून दाखवले गेले आहे, आणि हे अरामीक भाषेतच दिले गेले आहे—हे स्पष्ट दर्शवण्यासाठी की, हा दृष्टिकोन स्वर्गाशी सुसंगत नाही, तर अशा लोकांसाठी आहे ज्यांच्या अंतःकरणावर एक प्रकारचा पडदा आहे (२ करिंथकरांस ३:१५), कारण खरेतर, पिता कुणावरही न्याय करत नाही, कुणालाही दोषी ठरवत नाही.

अरामीक ही काल्दी व हिब्रू भाषेचे मिश्रण आहे. म्हणजेच, ती यरुशलेमच्या भाषेचा आणि बाबेलच्या भाषेचा संगम आहे—आणि ही गोष्ट फारच अर्थपूर्ण आहे. दानिएल ७ मधील न्यायप्रक्रियेमध्ये, देवाच्या न्यायपद्धतीमध्ये बाबेलच्या न्यायपद्धतीचा शिरकाव झालेला दिसतो.

दानिएल ८ मध्ये, जी हिब्रू भाषेत लिहिलेली आहे, त्यामध्ये मात्र, फक्त विस्कळीत झालेल्या गोष्टी पुन्हा योग्य स्थितीत आणल्या जातात. जेव्हा आदामने असा विचार केला की देव त्याच्या पत्नीला ठार मारेल आणि त्यामुळे देवावरच त्याने दोष ठेवला, तेव्हा त्याने आपल्या मनातील मंदिरच बिघडवून टाकले–ते संतुलनात राहिले नाही.

ज्याप्रमाणे येशूच्या मृत्यूनंतर माणसाला असा विश्वास निर्माण झाला की देव बलिदानाच्या प्रक्रियेद्वारे आपल्या पापांची क्षमा करतो–जरी ती प्रक्रिया प्रत्यक्षात देवाच्या स्वभावाशी सुसंगत नसेल–तशीच एक शिक्षात्मक न्यायप्रक्रिया माणसाला हे शिकवते की, पाप योग्य प्रकारे हाताळले जाईल आणि नष्ट केले जाईल.

या समजुतीतून माणसाला हे आमंत्रण दिलं जातं की त्याने स्वतःच्या न्यायाच्या कल्पना येशूच्या शब्दांशी ताडून पाहाव्यात–जिथे येशू स्पष्टपणे सांगतो की, “देव कुणावरही न्याय करत नाही.”

दानिएल ७ मधील देवाचं मौन आणि अरामीक भाषेचा वापर–हे एकत्र येऊन आदामच्या मनात निर्माण झालेल्या देवाच्या अंधारमय प्रतिमेला अधोरेखित करतात. याचा एक महत्त्वाचा पुरावा म्हणजे येशू जेव्हा क्रूसावर होता आणि पित्याशी त्यांचं पूर्ण विभाजन झालं होतं–तेव्हा त्यांनी “माझा देव, माझा देव” असं म्हटलं, “माझा पिता” असं नाही. पूर्ण चार शुभवर्तमानांत येशू नेहमी देवाला “माझा पिता” असं संबोधतात. परंतु क्रूसावरील हा एकमेव प्रसंग आहे जिथे ते “माझा देव” असं म्हणतात. याशिवाय, एकदाच मरीयेच्या संदर्भात ते म्हणतात: "येशू म्हणाले, “मला स्पर्श करू नको, कारण मी अद्याप पित्याकडे वर गेलो नाही. पण तू जा आणि माझ्या भावांना सांग, की ‘मी वर माझ्या पित्याकडे आणि तुमच्या पित्याकडे, माझ्या परमेश्वराकडे आणि तुमच्या परमेश्वराकडे जात आहे." (योहान २०:१७). येशूवर विश्वास ठेवणारा माणूस देवाला “पिता” म्हणून पाहतो. पण जो माणूस इतरांना दोष देण्याची वृत्ती सोडत नाही, तो शेवटी न्यायाच्या दिवशी देवाला “पित्याप्रमाणे” न पाहता “न्यायाधीशाप्रमाणे” पाहील.

ख्रिस्ती न्यायाच्या या दृश्याकडे पाहताना, आपली स्वतःचीच एक झलक आपल्याला दिसते–आम्ही दुष्टांशी कसे वागलो असतो, हे उघड होतं. देव आपल्या चुकीच्या कल्पनांवर गप्प राहतो म्हणून, आपल्याला वाटतं की आपला स्वर्गीय पिता पण आपल्यासारखाच आहे. पण जेव्हा आपण त्याच्या पुत्राचं पृथ्वीवरचं जीवन पाहतो, तेव्हा तो आपल्या चेहऱ्यावरच आपली चूक दाखवतो. येशूने केलेला प्रत्येक दयाळू चमत्कार, आपल्या चुकीच्या विचारांना एक शांत विरोध आहे. त्याच्या गालावर बसलेली प्रत्येक चापटी, जी त्याने न बोलता सहन केली, मोठ्यानं सांगते की–आपला पिता आपल्यासारखा विचार करत नाही, आणि आपल्यासारखं दोषही लावत नाही.

येशू मृत्यूच्या जवळ असताना त्याने वापरलेली भाषा आणि शब्द महत्त्वाचे होते का? त्यातून काही परकं, वेगळं असं काही सूचित झालं होतं का?

"जसा तुम्ही न्याय करता..."

**धडा 19**

# पुनरागमनापूर्वीचा न्याय: योग्य संदर्भात

जसं आपण आधी पाहिलं आहे, येशूच्या दुसऱ्या येण्यापूर्वी न्यायाचा एक काळ असतो. दानिएल अध्याय ७ मध्ये या घटनांची क्रमवार माहिती आपल्याला स्पष्टपणे दिसते. पण इथं एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो–जेव्हा देव कोणावरही शिक्षा करण्यासाठी न्याय करत नाही, तर मग या न्यायाचं स्वरूप नेमकं काय आहे?

*"कित्येक लोक ज्याला संथपणा म्हणतात, तसे प्रभू आपल्या वचनाविषयी करीत नाहीत, तर ते तुमच्याबरोबर सहनशीलतेने वागतात. कोणाचाही नाश व्हावा, अशी त्यांची इच्छा नाही, तर प्रत्येकाने पश्चात्ताप करावा अशी त्यांची इच्छा आहे." – २ पेत्र ३:९*

आपला स्वर्गीय पिता आपल्या कोणत्याही मुलाचा नाश व्हावा असं मुळीच इच्छित नाही. त्याला सगळेच वाचावेत असं वाटतं. दानिएल ७ मध्ये आपण पाहतो की, हा जो न्याय होतो, त्याच प्रक्रियेमुळे ख्रिस्ताला त्याच्या राज्याची खरी मालकी मिळते.

*“नंतर रात्री दृष्टान्तात पाहत होतो आणि मी पाहिले, मानवपुत्रासारखा आकाशात मेघारूढ होऊन येत असलेला दिसला. तो प्राचीन पुरुषाकडे गेला आणि त्याच्या उपस्थितीत त्याला सादर करण्यात आले. त्याला अधिकार, गौरव व सार्वभौम सामर्थ्य देण्यात आले; सर्व राष्ट्रांनी आणि प्रत्येक सर्व भाषा बोलणाऱ्यांनी त्याची उपासना केली. त्याचे सामर्थ्य शाश्वतचे आहे, जे कधीही ढळणार नाही आणि त्याचा कधी अंत होत नाही आणि म्हणून त्याचे राज्य हे असे राज्य आहे, ज्याचा कधीही नाश होणार नाही." – दानिएल ७:१३-१४*

ख्रिस्ताला मिळणारं राज्य हे असं आहे जिथे सगळे लोक, सर्व राष्ट्रं आणि वेगवेगळ्या भाषा बोलणारे लोक आनंदाने आणि प्रेमाने त्याची सेवा करतील. ख्रिस्ताचं प्रभुत्व हे जबरदस्तीचं नसून, त्याच्यावर असलेल्या लोकांच्या स्वच्छ, उघड्या आणि खऱ्या प्रेमावर आधारलेलं आहे.

पण सैतान मात्र या पृथ्वीवरील प्रत्येक व्यक्तीवर आपला हक्क असल्याचा दावा करतो. जो कोणी पाप करतो, तो त्याचा आहे असं तो म्हणतो. ख्रिस्त जेव्हा आपल्या मुलांना घेण्यासाठी पृथ्वीवर परत येण्याच्या तयारीत असतो, तेव्हा सैतान, जो दिवसरात्र देवासमोर त्यांच्यावर आरोप करत असतो, तो पुन्हा एकदा त्यांच्या तारणाविरोधात विरोध करायला उभा राहतो.

*तेव्हा स्वर्गातून आलेली एक उच्च स्वरातील वाणी मी ऐकली. ती म्हणाली, “परमेश्वराचे तारण, सामर्थ्य व त्यांचे राज्य आणि त्यांच्या ख्रिस्ताचा अधिकार यांचा उदय झाला आहे; कारण आमच्या बंधुजनावर आरोप ठेवणाऱ्याला स्वर्गातून पृथ्वीवर ढकलून दिले आहे. तो रात्रंदिवस*

*आमच्या परमेश्वरासमोर त्यांच्यावर दोषारोप करीत असे! पण आमच्या बंधुजनांनी कोकराच्या रक्ताने आणि आपल्या साक्षीच्या वचनाने त्याचा पाडाव केला. स्वतःच्या जिवावर प्रेम न करता त्यांनी मरण सोसले. – प्रकटीकरण १२:१०-११*

बायबल आपल्याला दाखवतं की मृतांचा न्याय नेमका कसा होतो. याचा एक उदाहरण आपल्याला मोशेच्या आयुष्यातून दिसतं.

परंतु प्रमुख देवदूत मिखाएल, जेव्हा मोशेच्या शरीरावरून सैतानाशी वादविवाद करीत असताना स्वतः त्याचा निंदासहित न्याय करण्याचे धैर्य त्याने केले नाही परंतु एवढेच म्हणाला, “प्रभू तुला धमकावो!” – यहूदा १:९

मोशेच्या मृत्यूनंतर काही काळानं, त्याला स्वर्गात उचललं गेलं. ही बायबलमध्ये नोंदलेली पहिली पुनरुत्थानाची घटना होती. बायबल शिकवतं की माणूस मरणानंतर थेट स्वर्गात जात नाही, तर तो थडग्यात झोपलेला असतो–शेवटच्या दिवसापर्यंत वाट पाहत.

*"जिवंतांना आपण मरणार हे माहीत असते, पण मेलेल्यांना काहीच माहीत नसते; त्यांना पुढे काही मोबदला नाही आणि त्यांच्या नावाचे सुद्धा स्मरण नाही." – उपदेशक ९:५*

*"तसा मनुष्य पडल्यावर पुन्हा उठत नाही; आकाश नाहीसे होईपर्यंत लोक पुन्हा उठणार नाहीत, ते झोपेतून जागे केले जाणार नाहीत. “तुम्ही केवळ मला कबरेमध्ये लपविले असते तुमचा क्रोध संपेपर्यंत मला गुप्त ठेवले असते! आपण माझ्यासाठी समय नेमून ठेवावा आणि मग माझी आठवण करावी! जर कोणी मेला तर पुन्हा जिवंत होईल का? माझ्या सर्व कठीण श्रमाच्या दिवसात माझ्या सुटकेची मी वाट पाहीन. मग तुम्ही मला आवाज द्याल आणि मी तुम्हाला उत्तर देईन; आपली हस्तकृती पुन्हा पाहावी असे तुम्हाला वाटेल." – इय्योब १४:१२-१५*

बहुतेक लोक जसं मानतात त्याविरुद्ध, आत्मा अमर (म्हणजे मरण न येणारा) नाही.

*"मनुष्य परमेश्वरापेक्षा नीतिमान असू शकतो काय? बलवान मनुष्य त्याच्या उत्पन्नकर्त्यापेक्षा अधिक शुद्ध असू शकतो काय?" – इय्योब ४:१७*

जर माणूस आधीपासूनच अमर असता, तर मग बायबलमध्ये आपल्याला अमरत्व शोधायला सांगतं तरी का?

*"जे धीराने चांगले कार्य करीत राहून गौरव, सन्मान व अविनाशीतेसाठी खटपट करतात, त्यांना ते सार्वकालिक जीवन देतील." – रोमकरांस २:७*

बायबल स्पष्ट सांगते की देवच एकटाच खऱ्या अर्थाने अविनाशी आहे.

*"परमेश्वर जे योग्य समयी त्याला पूर्ण करतील, परमेश्वर जे धन्यवादित व एकच सर्वसमर्थ, राजांचा राजा आणि प्रभूंचा प्रभू, ज्या एकालाच अमरत्व आहे, जे अगम्य प्रकाशात राहतात, ज्यांना कोणीही पाहिले नाही, आणि कोणीही पाहू शकत नाही; त्यांना सदासर्वकाळ गौरव आणि चिरकाल सामर्थ्य असो. आमेन." – १ तीमथ्य ६:१५-१६*

या विषयावर अजूनही बरंच काही सांगता येईल, पण सध्या महत्त्वाची गोष्ट ही आहे की आतापर्यंत फार थोडे लोकच मृत्यूनंतर स्वर्गात नेले गेले आहेत. देवाचे इतर जे लोक तारण पावले आहेत, त्यांना ख्रिस्ताच्या दुसऱ्या येण्याच्या वेळी पुन्हा उठवले जाईल.

*"बंधू आणि भगिनींनो, जे मरणामध्ये झोपी गेले आहेत, त्यांच्याविषयी तुम्ही अजाण नसावे, अशी आमची इच्छा आहे, यासाठी की ज्यांना आशा नाही अशा इतर मनुष्यासारखा आपण खेद करू नये. कारण येशू मरण पावले आणि पुन्हा जिवंत झाले, असा आपला विश्वास आहे, त्याअर्थी येशूंमध्ये झोपी गेले आहेत त्यांना परमेश्वर माघारी आणतील यावर आपण विश्वास ठेवतो. स्वतः प्रभू येशूंच्या वचनाप्रमाणे मी तुम्हाला सांगतो की आपण जे जिवंत आहोत आणि प्रभूच्या आगमनासमयी जिवंत असू, ते प्रभूला भेटण्यासाठी, जे आपल्यापूर्वी मरण पावले आहेत, त्यांच्या आधी, वर घेतले जाणार नाही. कारण प्रभू स्वतःच आज्ञा करणाऱ्या मोठ्या ध्वनीने, प्रधान दूताच्या वाणीने आणि परमेश्वराच्या तुतारीच्या आवाजाने स्वर्गातून खाली उतरतील. मग ख्रिस्तामध्ये जे मरण पावले आहेत, ते प्रथम उठतील. त्यानंतर, जे आपण अजून जिवंत आहोत आणि मागे राहिलेले आहोत, असे सर्वजण मेघारूढ होऊन प्रभूला भेटण्यासाठी अंतराळात घेतले जाऊ आणि प्रभूजवळ सदासर्वकाळ राहू." – १ थेस्सलनीकरांस ४:१३-१७*

मोशेचा प्रसंग हा अपवादात्मक होता – त्याला मृत्यू आल्यावर पुन्हा उठवून स्वर्गात नेण्यात आलं. हनोख आणि एलियालाही थेट स्वर्गात नेण्यात आलं होते, पण त्यांना मृत्यू आलेला नव्हता, जसं मोशेला आला होता. जेव्हा ख्रिस्त मोशेला मृत्यूपासून पुन्हा जिवंत करण्यासाठी स्वर्गातून खाली आला, तेव्हा शैतान त्याला विरोध करण्यासाठी समोर आला. त्याचा युक्तिवाद होता – की मोशेला पुन्हा जिवंत करणे योग्य आहे का?

आपण पूर्वी १२व्या अध्यायात पाहिलं होतं की, मोशेच्या जीवनाचा तपशील त्याच्या हृदयावर कोरलेला होता आणि तोच तपशील ख्रिस्ताच्या हृदयावरही कायमचा लिहिलेला होता. देवाने आपल्या संरक्षणासाठी नेमलेले देवदूत आपल्या संपूर्ण जीवनभर आपल्या सोबत असतात आणि जे काही आपण करतो त्याचे साक्षीदारही असतात. त्यामुळेच ते आपल्या जीवनाची नोंद ठेवतात.

*"याहवेहचे भय धरणाऱ्याभोवती त्यांचे देवदूत छावणी देतात आणि त्याला ते सोडवितात." –स्तोत्र ३४:७*

शैतान जेव्हा मोशेच्या जीवनावर ख्रिस्ताचा हक्क आहे का यावर वाद घालतो, तेव्हा त्या निर्णायक क्षणी मोशेच्या जीवनाची नोंदच त्याच्यावतीने बोलते. ख्रिस्ताला मोशेच्या जीवनातल्या प्रत्येक गोष्टीचं पूर्ण ज्ञान होतं, कारण देवाच्या आत्म्याच्या माध्यमातून त्याने प्रत्येक प्रसंग स्वतः पाहिला होता.

*"याहवेह, तुम्ही मला पारखले आहे आणि मला ओळखले आहे. माझे बसणे व माझे उठणे तुम्ही जाणता; दुरून देखील तुम्हाला माझा प्रत्येक विचार समजतो. माझे जाणे-येणे व विश्रांती घेणे, हे देखील तुम्ही ओळखून आहात; माझ्याबद्दलची प्रत्येक गोष्ट तुम्हाला माहीत आहे. हे याहवेह, माझ्या जिभेवर शब्द येण्यापूर्वीच, ते सर्व तुम्हाला माहीत असतात." – स्तोत्र १३९:१-४*

मोशेच्या जीवनाची नोंद हे दाखवत होती की त्याचा पूर्ण विश्वास त्याच्या तारणाऱ्यावर होता. त्याचं संपूर्ण जीवन फक्त ख्रिस्ताच्या कृपेवर आधारित होतं. मोशेने आपल्यासाठी हा निर्णय स्वतः घेतला होता, आणि तो निर्णय त्याच्या हृदयात कोरला गेला होता – तोच ख्रिस्ताच्या हृदयातही कायमचा लिहिला गेला होता.

*"मंडळीतील प्रथम जन्मलेले, ज्यांची नावे स्वर्गात नोंदलेली आहेत त्या मंडळीत तुम्ही आला आहात. सर्वांचा न्याय करणाऱ्या परमेश्वराजवळ, परिपूर्ण केलेल्या नीतिमानांच्या आत्म्याजवळ तुम्ही आला आहात." –इब्री १२:२३*

शैतानाने मोशेविरुद्ध जे आरोप केले, त्यावर येशूने शांतपणे उत्तर दिलं, "परमेश्वर तुला धमकावो" ख्रिस्ताला फक्त मोशेच्या जीवनाची नोंद त्याच्या समोर मांडावी लागली. मोशेने आपला न्याय आधीच स्वतः तपासून पाहिला होता आणि आपला जीव विश्वासाने आपल्या तारणाऱ्याच्या हाती सोपवला होता. म्हणून जेव्हा शैतान मोशेवर आरोप करायला आला, तेव्हा येशू त्याच्या बचावासाठी उभा राहिला आणि मोशेला मृत्यूच्या झोपेतून उठवण्याचा अधिकार त्याच्याकडे होता.

ही प्रक्रिया त्या प्रत्येकासाठी लागू होते जे पहिल्या पुनरुत्थानात – म्हणजेच धार्मिक लोकांच्या पुनरुत्थानात – सहभागी होतील. येशू जेव्हा आपल्या झोपलेल्या मुलांना परत जीवन देण्यासाठी येईल, त्याआधी शैतान येऊन दावा करेल की येशूला त्यांना उठवण्याचा अधिकार नाही. पण येशूच्या हृदयात जतन केलेली त्या प्रत्येक विश्वासू आत्म्याची नोंद उघड होईल – आणि ती नोंद हे सांगेल की त्यांनी स्वतःला अनंत जीवनासाठी पात्र समजलं होतं की नाही.

*"इतरांचा न्याय करू नका, म्हणजे तुमचाही न्याय होणार नाही. कारण ज्या पद्धतीने तुम्ही इतरांचा न्याय कराल, त्याच पद्धतीने तुमचाही न्याय करण्यात येईल, ज्या मापाने तुम्ही मापून द्याल, त्याच मापाने तुम्हाला मापून देण्यात येईल." – मत्तय ७:१-२*

*"मग पौल आणि बर्णबा हे निर्भयपणे बोलले: "हे परमेश्वराचे वचन प्रथम तुम्हाला देण्याचे अगत्य होते. ज्याअर्थी तुम्ही ते नाकारले आहे आणि सार्वकालिक जीवनाकरिता तुम्ही स्वतः योग्य नाहीत असे दाखविले आहे, त्याअर्थी आम्ही गैरयहूदीयांकडे वळतो." – प्रेषितांची कृत्यं १३:४६*

जे लोक आपले पाप समजून, देवाच्या कृपेवर विश्वास ठेवतात, ते इतरांवर न्याय करणं थांबवतात आणि स्वतःसाठी फक्त देवाच्या दयेवर विसंबून राहतात. जेव्हा त्यांचं आयुष्य संपायला येतं, तेव्हा ते मागे वळून आपलं आयुष्य पाहतात. त्यांना आपली चुकं, कमकुवतपणा आणि अपयश लक्षात येतात. कधी कधी त्यांना वाटतं – "माझ्या जीवनात काही चांगलं आहे का?" अशावेळी ते स्वतःच्या चांगुलपणावर नाही, तर देवाच्या अनंत दया आणि कृपेवरच पूर्ण विश्वास ठेवतात. हीच गोष्ट त्यांच्या जीवनाच्या नोंदीत साठवलेली असते – आणि जेव्हा शैतान ख्रिस्ताच्या हक्काला विरोध करतो, तेव्हा येशू ही नोंद समोर ठेवतो. कारण ही व्यक्ती त्याच्या हातांवर कोरलेली असते.

१८४४ सालापासून येशू त्यांच्या यादीची तयारी करत आहे, जे दुसऱ्या येणाच्या वेळी उठवले जाणार आहेत. या काळात शैतान प्रत्येक आत्म्यावर ख्रिस्ताचा दावा खोडून काढायचा प्रयत्न करत आहे. काही लोक असे असतात, ज्यांना ख्रिस्त वाचवू इच्छितो, पण त्यांच्या आयुष्याची नोंद दाखवते की त्यांनी अखेरपर्यंत येशूवरचा विश्वास सोडून दिला. अशा वेळी शैतानाचा दावा मान्य केला जातो – आणि तो आत्मा दुसऱ्या येणाच्या वेळी उठवला जात नाही. ख्रिस्तासाठी ही गोष्ट फार वेदनादायक असते, कारण त्यांना वाचवण्याची इच्छा असूनही, त्यांच्या जीवनाच्या नोंदीत विश्वास गमावल्याचं स्पष्ट दिसतं.

आपण उधळ्या पुत्राच्या गोष्टीत आणि दानियेल ७ मधील न्यायप्रक्रियेत पाहतो की देव कधीच कोणाविरुद्ध एकही दोषारोप करत नाही. प्रत्येकाने स्वतःच्या आयुष्याची नोंद मागे ठेवलेली

असते आणि तीच नोंद त्या व्यक्तीबद्दल साक्ष देते. ख्रिस्त प्रत्येक प्रकरण समोर आणतो कारण त्याला प्रत्येक व्यक्तीचं आयुष्य, त्यांचे विचार, भावना – सगळं अगदी बारकाईने माहीत असते. म्हणून जेव्हा शैतान देवाच्या मुलांच्या विरोधात दावे करतो, तेव्हा ख्रिस्त त्यांचं रक्षण करत उभा राहतो. शैतान हा फिर्यादी असतो, तर ख्रिस्त आपला वकील, आपल्यासाठी लढणारा. देव आणि त्याचा पुत्र शैतानाचे आरोप फेटाळतात आणि देवाच्या लोकांच्या बाजूने निर्णय दिला जातो.

*"मी पाहिले की, हे शिंग पवित्र लोकांशी युद्ध करीत आहे आणि त्यांचा पराभव करीत राहिले, जोपर्यंत सनातन पुरुष येईपर्यंत आणि परमोच्च परमेश्वराच्या पवित्र लोकांच्या बाजूने निर्णय घोषित होईपर्यंत, त्यांनी राज्य ताब्यात घेण्याची वेळ आली." – दानीएल ७:२१-२२*

या न्यायात फक्त तेच समोर येतात ज्यांनी स्वतःला ख्रिस्ताचे अनुयायी म्हणून घोषित केलं आहे. जे ख्रिस्तावर विश्वास ठेवत नाहीत, किंवा त्यांच्या आयुष्यात ख्रिस्ताच्या आत्म्याचं कुठलंही कार्य दिसून येत नाही, ते मुळातच सांगत असतात की त्यांना ख्रिस्ताने भरलेलं स्वर्गीय जीवन नको आहे. त्यांचा आत्मा स्वर्गाच्या प्रेमळ आणि न्याय न करणाऱ्या स्वभावाला स्वीकारत नाही. अशा लोकांवर शैतान आपला दावा मांडतो, आणि स्वतंत्र इच्छेच्या तत्त्वामुळे ख्रिस्त त्याला विरोध करत नाही, जरी त्याचं स्वतःचं हृदय सर्वांना वाचवायचं असेल तरी.

*"जो त्यांच्यावर विश्वास ठेवतो तो दोषरहित ठरेल, परंतु जो विश्वास ठेवीत नाही तो दोषी ठरविण्यात आला आहे, कारण त्याने परमेश्वराच्या एकुलत्या एका पुत्राच्या नावावर विश्वास ठेवण्याचे नाकारले." – योहान ३:१८*

जे लोक देवाच्या पुत्रावर विश्वास ठेवत नाहीत, त्यांच्याजवळ आपल्या स्वतःच्या आत्मदोषांपासून सुटण्याचा मार्गच राहत नाही. जेव्हा त्यांना त्यांच्या पापांचा सामना करावा लागतो, तेव्हा ते स्वतःला दोष देतात – आणि त्यांना वाटतं की आपण जगण्यासाठी अयोग्य आहोत. मग मृत्यू हीच त्यांना सुटका वाटते.

तेव्हा पृथ्वीवरील राजे, राजपुत्र, सैन्याचे उच्चाधिकारी, श्रीमंत तसेच बलवान लोक, सर्व लहान थोर माणसे, गुलाम आणि स्वतंत्र लोक, सर्वजण डोंगराच्या गुहांमध्ये व खडकांमध्ये दडून बसले. ते डोंगरटेकड्यांना उद्देशून ओरडून विनवू लागले, *“आम्हावर पडून जे राजासनावर बसले आहेत, त्यांच्या नजरेपासून आणि कोकऱ्याच्या क्रोधापासून आम्हाला लपवा! कारण त्यांच्या क्रोधाचा महान दिवस आला आहे, त्यात कोणाचा निभाव लागेल?” – प्रकटीकरण ६:१५-१७*

जेव्हा ख्रिस्त परत येतो आणि प्रधान देवदूताच्या आवाजात मोठ्याने हाक मारतो, "बाहेर या!", तेव्हा विश्वासानं झोपलेल्या संतांच्या कानांमध्ये विजयाचा तो आवाज पोहोचतो. ते जागे होतात आणि कबरांतून उठून शाश्वत जीवनात प्रवेश करतात.

पण जे लोक ख्रिस्तावर विश्वास न ठेवता मेलेत, त्यांचे कान त्या आवाजासाठी बंदच राहतात. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात देवाच्या आत्म्याच्या प्रेमळ बोलावण्याकडे दुर्लक्ष केलं होतं, म्हणून ख्रिस्ताचा आवाज त्यांच्यासाठी ओळखीचा नसतो. त्यामुळे जरी ती हाक सर्वांनाच उद्देशून असली, तरीही ते तिला प्रतिसाद देत नाहीत.

*"मी निश्चित सांगतो, अशी वेळ येत आहे आणि आलेलीच आहे की त्यावेळी मेलेले लोक परमेश्वराच्या पुत्राची वाणी ऐकतील आणि जे ऐकतील, ते जिवंत राहतील." – योहान ५:२५*

हे दुष्ट लोक त्या बोलावणीला नाकारतात, आणि म्हणूनच ते अजूनही १००० वर्षांपर्यंत मृतावस्थेतच राहतात. तेव्हा, ख्रिस्त जेव्हा पृथ्वीवर परततो, तेव्हा त्यांना पुन्हा उठवले जाते.

ख्रिस्त दुसऱ्यांदा जेव्हा येतो, तेव्हा तो आपल्या तेजस्वी, दिव्य स्वरूपात पृथ्वीला स्पर्श करत नाही. जर तो असे करतो, तर सर्व लोक (दुष्टसुद्धा) पुनरुत्थित झाले असते, जसं १००० वर्षांनंतर होणार आहे. त्यामुळे ख्रिस्त फक्त आकाशातून हाक मारतो, आणि फक्त विश्वासानं मेलेल्यांनाच उठवतो.

*"त्यानंतर, जे आपण अजून जिवंत आहोत आणि मागे राहिलेले आहोत, असे सर्वजण मेघारूढ होऊन प्रभूला भेटण्यासाठी अंतराळात घेतले जाऊ आणि प्रभूजवळ सदासर्वकाळ राहू." – १ थेस्सलनीकर ४:१७*

*याहवेहचा दिवस येत आहे, ज्या दिवशी तुमची संपत्ती लुटली जाईल आणि तुमच्याच भिंतीच्या आत त्याची वाटणी केली जाईल. मी यरुशलेमविरुद्ध युद्ध करण्यास सर्व राष्ट्रांना एकत्र करेन; नगर हस्तगत केले जाईल आणि घरे लुटली जातील, स्त्रियांवर बलात्कार करण्यात येईल. नगरीतील अर्धे लोक बंदिवासात जातील, परंतु उरलेले लोक नगरीतच राहतील. मग याहवेह बाहेर पडून लढाईच्या दिवशी करतात तसे, त्या राष्ट्रांशी युद्ध करतील. त्या दिवशी त्यांचे पाय यरुशलेमच्या पूर्वेस असलेल्या जैतुनाच्या पर्वतावर उभे राहतील आणि जैतूनांचा पर्वत पूर्वपश्चिम दुभागून मध्ये एक मोठे खोरे निर्माण होईल, अर्धा पर्वत उत्तरेकडे व अर्धा पर्वत दक्षिणेकडे सरेल. – जखर्याह १४:१-४*

*"नंतर मी, "एक नवी पृथ्वी व एक नवे आकाश" पाहिले, कारण पहिले आकाश व पहिल्या पृथ्वीचे अस्तित्व राहिले नसून त्यात समुद्र अस्तित्वात नव्हते. तेव्हा मी नवे यरुशलेम म्हणजे पवित्र नगरी, स्वर्गातून परमेश्वरापासून उतरतांना पाहिली, ती वरासाठी शृंगारलेल्या वधूप्रमाणे सजविलेली होती." – प्रकटीकरण २१:१-२*

जेव्हा येशूचा आत्मा त्यांच्या अंतःकरणाशी बोलत नाही, तेव्हा दुष्ट लोकांची खरी भावना स्पष्ट होते – त्यांना देव आणि धर्मनिष्ठ लोकांबद्दल द्वेष वाटतो आणि त्यांना शहरातील लोकांचा नाश करायचा असतो.

*हा हजार वर्षांचा काळ संपल्यावर सैतानाला तुरुंगातून सोडण्यात येईल, आणि तो पृथ्वीच्या चार कोपऱ्यातील गोग व मागोग राष्ट्रांस ठकविण्यास व त्यांना लढाईसाठी एकत्र करण्यास बाहेर जाईल. त्यांची संख्या समुद्र किनाऱ्यावरील वाळूच्या कणांइतकी आहे. त्यांनी पृथ्वीवर सर्वत्र फिरून पवित्र जणांची छावणी व परमेश्वराला प्रिय असलेले नगर वेढले, परंतु स्वर्गातून अग्नी उतरला आणि त्याने त्यांना भस्म केले. – प्रकटीकरण २०:७-९*

या अग्नीबद्दल अधिक सविस्तर अभ्यास "Consuming Fire" या पुस्तिकेमध्ये fatheroflove.info या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

थोडक्यात सांगायचं झालं, तर – शेवटी पाप्याचे विनाश हे देवाच्या कोपामुळे होत नाही, तर त्याच्या स्वतःच्या अपराध बोधामुळे होतो. देवाच्या आणि येशूच्या उपस्थितीत, जेव्हा त्याच्यापुढे त्याच्या संपूर्ण आयुष्याची नोंद ठेवलेली असते, तेव्हा तो स्वतःच स्वतःला दोषी ठरवतो. त्याच्या मनावर, आत्म्यावर आणि अंतःकरणावर जे दोषीपणा आणि पश्चात्तापाचं ओझं येतं, ते इतकं तीव्र असतं की तेच त्याचा अंत करतात. ही अंतर्गत, आत्मिक यातना ही शारीरिक वेदनेपेक्षा हजारपट तीव्र आणि असह्य असते.

*तुम्ही भुशाची गर्भधारणा करता, तुम्ही पेंढीला जन्म देता; तुमचा श्वास हा अग्नी आहे, जो तुम्हाला भस्म करतो. लोक जळून राख होतील; कापलेल्या काटेरी झुडूपांप्रमाणे ते जाळले जातील." – यशया ३३:११-१२*

एकूण सारांश असं सांगता येईल की, आपण दानिएल ७ मध्ये पाहिलेल्या न्यायासभेच्या दृष्टांताचा अर्थ आता अधिक स्पष्टपणे समजतो. ही न्यायप्रक्रिया सुरू होते कारण सैतान मृत्युमुखी गेलेल्यांपैकी एकालाही गमवू इच्छित नाही. ज्याप्रमाणे रोमन पहारेकऱ्यांना येशूच्या थडग्याजवळ तैनात करण्यात आलं होतं – जेणेकरून कोणालाही येशू पुनरुत्थित झाला असा दावा

करता येऊ नये – तसंच सैतानही धर्मनिष्ठ मरण पावलेल्यांच्या थडग्यांभोवती अंधारात पहारे घालतो, त्यांना पुन्हा जिवंत होण्यापासून रोखण्यासाठी.

पण ख्रिस्त सैतानाला झिडकारतो, कारण त्या माणसाच्या जीवनाची नोंद स्पष्टपणे दाखवते की त्याचा विश्वास खरा होता. सैतान ज्या आत्म्याचा दावा करतो, तो आत्मा खरोखर ख्रिस्ताच्या विश्वासात होता.

जे लोक येशूच्या स्वभावातून आपल्या स्वर्गीय पित्याकडे विश्वासाने पाहतात, त्यांना हे समजते की खरा देव कोणावरही दोष ठेवत नाही किंवा शिक्षा देत नाही. सैतानच खरा आरोप करणारा आहे. तो आपल्याला दोषी ठरवतो, आणि आपलेच दोष देवावर लादण्याचा प्रयत्न करतो, जेणेकरून आपण असं समजू की देव आपल्याला शिक्षा देतो. पण देवाने येशूला न्यायासाठी नाही, तर आपला खरा स्वभाव दाखवण्यासाठी पाठवलं. (योहान ३:१७) न्यायाच्या वेळी, देव काहीच बोलत नाही. तो आपल्यालाच ठरवू देतो की आपण त्याला कसा समजतो – आणि त्यानुसारच आपण स्वतःला न्याय देतो. म्हणूनच येशूचे शब्द पुन्हा एकदा खरे ठरतात:

*"कारण ज्या पद्धतीने तुम्ही इतरांचा न्याय कराल, त्याच पद्धतीने तुमचाही न्याय करण्यात येईल" – मत्तय ७:२*

## धडा 20

# याकोबाच्या संकटाचा काळ

मागील अध्यायात आपण अशा लोकांच्या न्यायप्रक्रियेबद्दल पाहिलं जे ख्रिस्ताच्या येण्याआधी मरण पावले आणि नंतर मृतातून उठवून हवेत ख्रिस्ताला भेटायला गेले. पण जे लोक ख्रिस्तावर विश्वास ठेवून त्याच्या येण्याच्या वेळी जिवंत आणि शिल्लक असतील, त्यांचं काय? त्यांच्या बाबतीत न्यायप्रक्रिया कशी होते? कारण प्रत्येकाला ख्रिस्ताच्या न्यायासनासमोर उभं राहावंच लागणार आहे.

*"आता या गोष्टी त्यांच्यासाठी उदाहरणादाखल झाल्या आणि ज्या आपणावर युगाचा शेवट येऊन ठेपला आहे, त्या आपल्याला इशारा म्हणून लिहून ठेवण्यात आल्या आहेत." – 1 करिंथकरांस 10:11*

बायबलमधील कथा आपल्याला–जे शेवटच्या काळात जगत आहोत–हे समजून घेण्यासाठी मदत करतात की, ख्रिस्ताच्या पुनरागमनापूर्वी न्यायप्रक्रिया कशी कार्य करते, जशी दानिएल 7 मध्ये वर्णन केली आहे.

आपण 10व्या अध्यायात एका स्त्रीची कथा पाहिली होती–जी व्यभिचार करताना पकडली गेली होती–आणि तिच्यावर ती जिवंत असताना न्यायप्रक्रिया कशी पार पडली. देवाचे अनुयायी असल्याचा दावा करणाऱ्या लोकांनी तिला ख्रिस्तापर्यंत आणलं. जसं त्या काळी यहूदी नेत्यांनी केलं, तसंच आजही अनेक ख्रिश्चन लोक इतरांना सांगत असतात की, "तुमच्या पापांमुळे देव तुम्हाला नरकात टाकेल." त्यांच्या बोलण्यामुळे आणि वागणुकीमुळे जे आरोपी असतात ते जणू ख्रिस्ताच्या पायाजवळ त्या स्त्रीप्रमाणे फेकले जातात. अनेक जण अशा परिस्थितीत राग किंवा हिंसक प्रतिक्रिया देतात, पण काही लोक अशा आरोपांना गांभीर्याने घेतात, आणि ख्रिस्ताकडे क्षमेसाठी येतात.

म्हणूनच शेवटच्या काळात, ख्रिस्ती चर्चेस जगासमोर पापांची जाणीव करून देण्यात आणि न्याय दिनाविषयी लोकांना सावध करण्यात आपली भूमिका बजावतील. जरी या मंडळींना देवाच्या खऱ्या स्वभावाची समज चुकीची असेल, तरीही ते पापाविषयी लोकांच्या अंतःकरणात खंत निर्माण करतात.

बायबल सांगते की शेवटच्या काळात अशी एक संकटांची वेळ येणार आहे, जी मानवाच्या इतिहासात कधीच अनुभवली गेली नाही. कोविड-१९ शी संबंधित घटना, वांशिक हिंसाचार, आणि

पर्यावरणाची झपाट्याने होत असलेली हानी यामुळे हे संकटाचे क्षण आता जवळ आल्यासारखे वाटू शकतात.

*“त्यावेळी तुमच्या लोकांचा रक्षक, समर्थ अधिपती मिखाएलचा उदय होईल. राष्ट्रांच्या सुरुवातीपासून आजतागायत कधीही आलेला नाही असा संकटाचा काळ येईल. परंतु त्यावेळी तुझ्या लोकांपैकी—ज्यांची नावे पुस्तकात नोंदलेली आहेत—त्या सर्वांची मुक्तता होईल." – दानिएल १२:१*

जेंव्हा लोक पाहतील की जग भरभरून कोसळत आहे, आणि नैसर्गिक आपत्ती व सामाजिक उधळपट्टी माणसांच्या रोजच्या आयुष्यात परिणाम करत आहेत, तेंव्हा अनेक जण विचार करू लागतील – “हे सगळं आपल्या पापांमुळेच तर होत नाही ना?” त्या वेळी दोन प्रकारचे धार्मिक लोक पुढे येतील.

*गुन्हेगारांपैकी एकजण त्यांची निंदा करून म्हणाला, “तू ख्रिस्त आहेस ना? तर मग स्वतःला आणि आम्हालाही वाचव.” पण दुसऱ्या गुन्हेगाराने पहिल्याला दटावून म्हटले, “तुला परमेश्वराचे भय वाटत नाही काय, तू सुद्धा तीच शिक्षा भोगीत आहेस? 41आपल्या दुष्ट कृत्यांमुळे आपणास झालेली मरणाची शिक्षा अगदी यथायोग्य आहे. पण याने तर काहीही चूक केली नाही.” मग तो येशूंना म्हणाला, “अहो येशू, आपण आपल्या राज्यात याल, तेव्हा माझी आठवण ठेवा.– लूक २३:३९-४२*

हे दोघंही येशूसोबत क्रुसावर लटकवले गेले होते. त्यापैकी एकाने मान्य केलं की त्याच्यावर संकट त्याच्या स्वतःच्या पापांमुळे आलं आहे. दुसऱ्याने मात्र रागाने येशूला नाकारणं पसंत केलं आणि तक्रार केली की जर खरोखरच तो ख्रिस्त असेल, तर त्याने स्वतःलाही आणि त्यांनाही वाचवायला हवं. एक जण पश्चात्तापाने आणि आशेने वळला, तर दुसरा जण रागाने, अहंकाराने व पश्चात्ताप न करता तसाच राहिला.

पौल म्हणतो की शेवटचे दिवस हे जणू एखाद्या बाळंतिणीला प्रसूती वेदना सुरू होण्यासारखे असतील.

*कारण तुम्हाला हे पक्के ठाऊक आहे की जसा चोर रात्री येतो तसा प्रभूचा दिवस येईल. “शांतता आणि सुरक्षितता,” असे लोक म्हणत असतानाच, ज्याप्रमाणे गर्भवती स्त्रीला प्रसूती वेदना होतात, त्याचप्रमाणे त्यांच्यावर अचानक नाश ओढवेल आणि त्यातून ते सुटणार नाहीत. – १ थेस्सलनीकाकरांस ५:२-३*

हीच उपमा वापरत यिर्मया म्हणतो:

*“याहवेह म्हणतात: “ ‘त्यांचा भयभीत आक्रोश ऐकू येत आहे– शांती नव्हे, तर दहशत. विचारून पाहा: पुरुष मुले प्रसवू शकतात काय? मग प्रसूती वेदनांनी व्याकूळ झालेल्या स्त्रियांप्रमाणे आपल्या पोटावर हात ठेऊन मेल्यागत फिक्के पडलेल्या चेहऱ्याचे बलवान पुरुष मला का दिसत आहेत? हाय हाय! तो दिवस किती भयंकर असेल! इतर कोणताही दिवस असा नसेल. याकोबासाठी तो संकटकाळ असेल. पण तो यातून वाचून बाहेर पडेल." – यिर्मया ३०:५-७*

मानवजातीच्या मनात जे रोखून ठेवलेलं नैराश्य आहे, ते शेवटी एक तीव्र संतापात फूटेल आणि मोठ्या प्रमाणावर विध्वंस घडेल. या काळात अनेकांचा मृत्यू होईल.

*"तुला अंधकाराच्या आतंकाचे भय वाटणार नाही, किंवा दिवसा सुटणाऱ्या बाणांचेही नाही. अंधारात दबा धरून राहणाऱ्या मरीचे, किंवा भर दुपारी येणाऱ्या आपत्तीचेही भय वाटणार नाही. हजार लोक तुझ्याजवळ पडले, आणि दहा हजार तुझ्या उजव्या बाजूला पडले, तरी ती संकटे तुझ्या जवळदेखील येणार नाहीत." – स्तोत्र ९१:५-७*

जगात जेव्हा अशांती आणि संकटं वाढायला लागतील, तेव्हा लोक त्या वाईट घटनांसाठी कोणाला तरी दोषी धरायला सुरुवात करतील. आणि अशा वेळी जगातील धार्मिक नेते उपासनेसंबंधी एक कठोर निर्णय घेतील.

मग मी दुसरा एक पशू पाहिला. तो पृथ्वीतून वर येत होता. त्याला कोकऱ्याच्या शिंगांसारखी दोन शिंगे होती, पण त्याचा आवाज अजगरासारखा होता. प्राणघातक जखम बरी झालेल्या त्या पहिल्या पशूच्या प्रतिनिधी सारखा सर्व अधिकार त्याने चालविला व सर्व जगास त्या पहिल्या पशूला नमन करविले. त्याने महान चमत्कार केले, सर्वांच्या डोळ्यांदेखत आकाशातून पृथ्वीवर अग्निज्वाला आणल्या. कारण पहिल्या पशूच्या प्रतिनिधी प्रमाणे या पशूने अद्‌भुत चिन्हे करून पृथ्वीवरील रहिवाशांना फसविले. तलवारीने प्राणांतिक जखम होऊनही पुन्हा जिवंत झालेल्या त्या पहिल्या पशूची मोठी मूर्ती उभारावी, असा त्याने जगातील लोकांना हुकूम केला. या पहिल्या पशूच्या मूर्तीमध्ये प्राण घालून तिला बोलण्याची शक्ती देण्याचीही दुसऱ्या पशूला परवानगी देण्यात आली होती. मग खुद्द त्या मूर्तीनेच हुकूम सोडला: “जो कोणी त्या पशूच्या मूर्तीला नमन करण्याचे नाकारील, त्याला ठार मारले जाईल.” त्याने असेही फर्मान काढले की लहान थोर, *श्रीमंत व गरीब, स्वतंत्र व दास या सर्वांनी आपल्या उजव्या हातावर किंवा कपाळावर एक खूण गोंदून घ्यावी. त्या पहिल्या पशूची खूण किंवा त्याच्या नावाचा सांकेतिक आकडा त्यांच्यावर*

*असल्याशिवाय कोणालाही विकत घेता येणार नाही किंवा विकता येणार नाही. – प्रकटीकरण १३:११-१७*

या भविष्यवाणीकडे सखोलपणे जाण्याचा हेतू या पुस्तकाचा भाग नाही. अधिक माहिती हवी असल्यास fatheroflove.info या संकेतस्थळावर The Great Controversy हे पुस्तक जरूर वाचा.

